# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**सत्र–३ : पेपर क्रमांक** DSC-05

# आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत

**(Modern Sociological Theory)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१६
**तृतीय आवृत्ती :** २०१७
**चतुर्थ सुधारित आवृत्ती :** २०२१
**सुधारित आवृत्ती :** २०२३
एम. ए. भाग २ (सत्र ३ : आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-599-8

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**समाजशास्त्र अभ्यासमंडळ**

अध्यक्ष – **डॉ. अर्चना राजकुमार कांबळे**
द न्यू कॉलेज, १०६२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती प्रतिमा एस. पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. प्रल्हाद एम. माने**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. आनंद लक्ष्मण गाडीवड्ड**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
  ता. कालग, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती भाग्यश्री मल्लिकार्जुन पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, (केएमसी) कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती सविता माधवराव गिरे**
  दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज,
  वडूज, ता. खटाव, जि. सातारा
- **डॉ. वसंत कृष्णा मोरे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. कृष्णाजी मारूती देसाई**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **डॉ. संदिप मुरलीधर चौधरी**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  एसबीइएस कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स,
  छत्रपती संभाजी नगर
- **डॉ. सुगत शेशराव बनसोडे**
  श्री. शिव-शाहू कॉलेज सरूड,
  ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर
- **डॉ. मधुकर गंगाराम धतूरे**
  विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,
  ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. अभिजित पाटील**
  ७ए-३०१, अशोक नगर, दादलानी पार्क जवळ,
  बाळकुम, ठाणे (वेस्ट)-४००६०८

# प्रस्तावना

पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी म्हणजेच एम. ए. ला जून २०१३ पासून सत्र परीक्षा सुरू झालेली आहे. सत्र ३ आणि सत्र ४ साठी एकूण आठ पेपर्स अभ्यासावे लागणार आहेत. द्वितीय वर्षासाठी एकूण आठ पेपर्स (सत्र ३ व ४ साठी) असून त्यापैकी चार आवश्यक (Compulsory) आणि चार ऐच्छिक (Elective) पेपर्स आहेत.

एम. ए. समाजशास्त्र विषयाला नियमित आणि दूरशिक्षण केंद्रामार्फत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी आवश्यक पेपर DSC-05 सत्र-३ ''आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत'' (Modern Sociological Theory) याचा प्रमुख संपादक म्हणून मनःपूर्वक स्वागत करतो.

सदर आवश्यक पेपरचा प्रमुख संपादक (Chief Editor) या नात्याने सदर पेपरची ही पुस्तिका तयार करण्यासाठी विविध महाविद्यालयातील माझ्या सर्व लेखक मित्रांनी जे मोलाचे योगदान दिले आहे त्यामुळेच मला सदरची पुस्तिका संपादित करणे शक्य झाले. अशा सर्व लेखक मित्रांचे मी सुरुवातीलाच मनापासून आभार मानतो.

''आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत'' या आवश्यक पेपरमध्ये सत्र क्र. ३ साठी चार युनिटचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने समाजशास्त्रीय सिद्धांत, प्रकार्यवाद, संघर्षवादी सिद्धांत, स्त्रीवादी सिद्धांत या युनिटचा समावेश केला आहे. अर्थातच एम. ए. समाजशास्त्र विषयाला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना या शास्त्राच्या सैद्धांतिक मांडणीचा योग्य व वास्तव असा परिचय होण्यास खूप मोलाची मदत होणार आहे असे माझे प्रामाणिक मत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाने एम. ए. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्यासाठी स्वयं अध्ययन पुस्तिका (SIM) देण्याच्या हेतूने लेखकांची सूची तयार केली. ''आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत'' या पेपरसाठी अनेक लेखक मित्रानी मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळेच सदरची पुस्तिका बऱ्यापैकी तयार करण्याचे अवघड काम मला पूर्ण करता आले.

शेवटी प्रमुख संपादक या नात्याने मी सर्वप्रथम मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. (डॉ.) डी. के. मोरे, समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे मी प्रामाणिकपणे कबूल करू इच्छितो. वरील सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, जि. सातारा

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत**
**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३<br>घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. एस. एल. मोहिते**<br>असो. प्रोफेसर,<br>माजी पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागप्रमुख,<br>सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा | १, ३ |
| **प्रा. चंद्रकांत खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली. | २ |
| **प्रा. उषा पाटील**<br>महावीर महाविद्यालय, कोल्हापूर | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | समाजशास्त्रीय सिद्धांत | १ |
| २. | प्रकार्यवाद | २२ |
| ३. | संघर्षवाद सिद्धांत | ६४ |
| ४. | स्त्रीवादी सिद्धांत | ७७ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# समाजशास्त्रीय सिद्धांत

## (Sociological Theory)

**घटक संरचना :**

१.०. उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ समाजशास्त्रीय सिद्धांत : अर्थ, स्वरूप आणि घटक किंवा पैलू

१.२.१.१ स्वयं अध्यनासाठीचे प्रश्न.

१.२.२ समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रकार आणि कार्ये

१.२.२.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

१.२.३ सिद्धांत आणि संशोधन यामधील परस्पर संबंध

१.२.३.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक संज्ञा.

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे.

१.६ सरावासाठीचे प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठीची पस्तके.

## १.० उद्दिष्टे :

प्रमुख समाजशास्त्रीय विचार प्रवाह (Major Schools of Sociological Thought) या एम. ए. भाग २ समाजशास्त्र सत्र क्र. ३ साठी असणाऱ्या सक्तीच्या पेपर मध्ये आपणास एकूण चार घटकांचा अभ्यास करावयाचा आहे. यामध्ये सर्वात प्रथम घटक म्हणून समाजशास्त्रीय सिद्धांत, त्यानंतर प्रकार्यवाद, संघर्षवादी सिद्धांत आणि प्रतिकात्मक आंतरक्रियावाद इत्यादी घटकांचा विस्तृत आढावा घ्यावा लागणर आहे.

समाजशास्त्राचा उदय केव्हा आणि कसा झाला हे जाणून घेताना सर्वात प्रथम आपणास सिद्धांत म्हणजे काय?

आणि समाजशास्त्रात कोणकोणते सिद्धांत महत्त्वपूर्ण ठरले गेले याचा अभ्यास करावा लागेल. अर्थातच अशा अभ्यासासाठी आपणास समाजशास्त्रीय सिद्धांताचा भाग म्हणून १८ व्या शतकातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा प्रभाव सिद्धांत निर्मितीवर कसा झाला हे जाणून घ्यावे लागेल. फ्रेंच विचारवंत ऑगस्त कॉम्त याने सर्वात प्रथम समाजाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला समाजशास्त्र असे संबोधिले. यामुळे ऑगस्त कॉम्तकडे 'समाजशास्त्राचे जनकत्व' (Father of Sociology) जाते.

अनेक समाजिक संशोधकांनी विविध समाजशास्त्रीय सिद्धांत मांडले. उदा. ऑगस्त कॉम्तचा विज्ञानवाद किंवा प्रत्यक्षवाद, हर्बर्ट स्पेन्सरचा समाज सेंद्रिय सिद्धांत, एमिल डुरखाईमचा श्रमविभाजन आणि आत्महत्येचा सिद्धांत, चार्लस् कुलेचा प्राथमिक गट अथवा प्राथमिक समूहाचा सिद्धांत तर कार्ल मार्क्सचा वर्ग संघर्ष सिद्धांत यासारखे महत्त्वपूर्ण सिद्धांत सांगता येतील. अर्थातच या सर्व समाजशास्त्रीय सिद्धांताद्वारे समाज आणि समाजातील विविध सामाजिक व राजकीय घटकांची अनुभवनिष्ठ, वस्तुनिष्ठ व विज्ञाननिष्ठ माहिती मिळविण्यासाठी खूप उपयोग झाला. अशा सिद्धांताने समाज आणि समाजशास्त्राचे वास्तव अध्ययन करणे शक्य झाले. त्यामुळे आपल्या असे निदर्शनास येते की, महाविद्यालयीन आणि विद्यापीठ स्तरावर समाजशास्त्रीय सिद्धांताचा समावेश समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये केला आहे.

## १:१ प्रस्तावना :

समाजशास्त्राचे विद्यार्थी म्हणून जेव्हा तुम्ही एम.ए. भाग १ मध्ये (सत्र क्र. १ आणि सत्र क्र. २) ''अभिजात समाजशास्त्रीय परंपरा'' या सक्तीच्या पेपरमध्ये समाजशास्त्रीय सिद्धांताचा उगम या सिद्धांताच्या उदयामागची पार्श्वभूमी जाणून घेण्यासाठी 'रुसो', माँटेस्क्यू सारख्या अभ्यासकांच्या सामाजिक विचारापासून समाजांबद्दलच्या सामाजिक विचार मांडणीची प्रक्रिया कशी सुरू झाली? तसेच विविध सभाजशास्त्रीय सिद्धांत मांडणीवर त्यावेळच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा प्रभाव कसा पडला? हे जाणून घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर आपणास ''प्रमुख समाजशास्त्रीय विचार प्रवाह'' या पेपरमध्ये समाजशास्त्रीय सिद्धांत या प्रथम घटकात समाजशास्त्रीय सिद्धांताचा अर्थ, स्वरूप आणि घटक, शास्त्रीय सिद्धांताचे प्रकार आणि कार्ये तसेच सिद्धांत आणि संशोधन यामधील परस्पर संबंध इत्यादी उपघटकांचा आढावा घ्यावा लागणार आहे.

## १.२ विषय विवेचन :

समाजशास्त्राचा उदय आणि विकास कसा झाला यासदंर्भात विवेचन करत अताना आपणास सिद्धांत आणि समाजशास्त्रीय सिद्धांत यामध्ये कसा फरक आढळून येतो? विज्ञानाच्या कोणत्या कसोट्या समाजशास्त्रात आढळून येतात? समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रमुख घटक कोणते आहेत? तसेच समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रमुख प्रकार व त्यांची प्रमुख कार्ये कोणती आहेत? आणि सिद्धांत व संशोधन यामध्ये कोणकोणते परस्पर संबंध आढळून येतात? इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींचा विस्तृत आणि वास्तव परामर्श घ्यावा लागेल.

### १.२.१ समाजशास्त्रीय सिद्धांत : अर्थ, स्वरूप आणि घटक किंवा पैलू (Sociological Theory : Meaning, Natue and Elements) :

समाजशास्त्रीय सिद्धांताचा अर्थ समजावून घेण्यापूर्वी आपणास सिद्धांत म्हणजे काय ? आणि विज्ञानाच्या कोणत्या कसोट्या समजाशास्त्रात आढळून येतात? या गोष्टींचा अभ्यास करावा लागेल.

❖ **सिद्धांत म्हणजे काय?**

समाजशास्त्रीय सिद्धांत अभ्यासण्यापूर्वी नैसर्गिक शास्त्रांच्यामध्ये (पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र) सिद्धांताचा अर्थ कसा स्पष्ट केला आहे हे पाहणे आवश्यक आहे. सामान्यपणे तार्किक स्वरूपाच्या विधानाला सिद्धांत ही संज्ञा लावली जाते. प्रा. फ्रान्सीस अब्राहम यांच्या मते, ''सिद्धांत म्हणजे कोणत्याही घटनेबाबतचे बुद्धि प्रामाण्यवादी किंवा बुद्धीच्या निकषावर आधारीत विधान होय.'' तर प्रा. गुड व हॅट यांच्या मते ''सिद्धांत व तथ्ये यांच्या सततच्या क्रिया आणि प्रतिक्रिया यातूनच विज्ञानाचा विकास होत असतो.'' सिद्धांताच्या वरील प्रमुख व्याख्या विचारात घेता असे दिसून येते की, ''विविध घटनांच्यामधील आंतर संबंध स्पष्ट करणारे आणि त्यांची व्यवस्थित मांडणी किंवा क्रम लावणारे सूत्र म्हणजे सिद्धांत होय.'' सिद्धांतामुळे पूर्वकथन करता येते. तसेच दोन घटकातील परस्पर संबधाबाबत निश्चित असे विधान करता येते. उदा. जड वस्तु वर फेकली तरी ती गुरुत्वाकर्षणमुळे खाली येते अथवा कोणत्याही सजीव प्राणि मात्राला जगण्यासाठी ऑक्सीजन वायुची गरज भासते.

प्रस्तुत घटकामध्ये आपणास समाजशास्त्रीय सिद्धांताचा अर्थ, स्वरूप आणि घटकांचा अभ्यास करावा लागणार आहे. त्यासंदर्भातील सखोल विवेचन खालीलप्रमाणे करता येईल.

❖ **समाजशास्त्रीय सिद्धांताचा अर्थ किंवा व्याख्या :**

स्थूलमानाने विचार करता सर्व सामाजिक शास्त्रांमध्ये समाजातील विविध घटना किंवा घडामोडींच्या बाबतीत जे सामान्य विधान केले जाते त्यास समाजशास्त्रीय सिद्धांत असे संबोधिले जाते. त्यावरून असे म्हणता येईल की, एखाद्या सामाजिक घटनेचा वैज्ञानिक दृष्टीकोनातून अभ्यास केल्यानंतर जे निष्कर्ष येतात त्याला समाजशास्त्रीय सिद्धांत अशी संज्ञा वापरली जाते. तरी देखील समाजशास्त्रीय सिद्धांताच्या विविध विचारवंतांनी सांगितलेल्या खालील व्याख्या अभ्यासल्या असता आपणास अशा सिद्धांताचा निश्चित अर्थ समजू शकेल.

**१) प्रा. आर. के मर्टन :** ''समाजशास्त्रीय सिद्धांत ही संज्ञा अशा तर्कशास्त्रीय अर्थसंबधावर आधारीत विधानांच्या संचाकडे निर्देश करते की, जी विधाने समानतेतून उगम पावण्याची किंवा आकाराला येण्याची शक्यता असते.''

**२) टालकॉट पार्सन्स :** ''सैद्धांतिक व्यवस्था म्हणजे अनुभविक संदर्भावर आधारीत प्रमुख बाबींचे तर्कशास्त्रीय परस्परावलंबी सामान्यीकरण करण्याची व्यवस्था होय.''

**३) जॉर्ज होमन्स :** होमन्स यांनी समाजशास्त्रीय सिद्धांताची व्याख्या करताना यामध्ये खालील गोष्टींचा

उल्लेख केला त्याच्या मते, ''कोणत्याही प्रकारच्या समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये १) संकल्पनांचा संच असतो २) सिद्धांतामधील प्रत्येक विधान कमीत कमी दोन घटकातील संबंध अनुमानित करते आणि ३) सिद्धांताच्या विधानातील सत्य असत्यता ही अनुभवाच्या कसोटीवर तपासून पाहता येईल.''

**४) थॉमस वॉर्ड :** ''समाजशास्त्रीय सिद्धांत म्हणजे तर्कशास्त्रावर आधारीत संकल्पना आणि विधाने यांची अनुमानित व्यवस्था असून यामध्ये दोन किंवा दोनपेक्षा अधिक निवडक पैलूचा अथवा दृष्टीकोनांचा संबध विषद केला जातो.''

समाजशास्त्रीय सिद्धांताच्या वरील प्रमुख व्याख्याअभ्यासल्या असता असे निदर्शनास येते की, समाजशास्त्रीय सिद्धांत ही संकल्पना बहुविध स्वरूपाची असून त्यासंबधी निश्चित असे विधान करणे अवघड आहे. प्रत्येक समाजशास्त्रीय सिद्धांत हा भौतिकशास्त्रातील सिद्धांताप्रमाणे कठोर निकषाद्वारे अनुभविक पडताळा पाहण्यास योग्य ठरत नाही, याचाच अर्थ समाजशास्त्रीय सिद्धांत हे तथ्याच्या आकलन शक्तीच्या विरोधात अनुभविक सांकेतिक बाजूवर उभे असतात.

## ❖ समाजशास्त्रीय सिद्धांताचे स्वरूप :

समाजशास्त्रीय सिद्धांताच्या वरील सर्व व्याख्या अभ्यासल्या असता त्यावरून, प्रा. फ्रान्सीस अब्राहम यांनी समाजशास्त्रीय सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट करताना खालील अनेक महत्त्वपूर्ण बाबी विचारात घेतल्या आहेत. फ्रान्सीस अब्राहम यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांत ही एक प्रतिकात्मक रचना असून ती एक प्रकारची कल्पक अशी सिद्धी आहे. तसेच समाजशास्त्रीय सिद्धांत म्हणजे अमूर्त संकल्पनात्मकतेची अशी योजना आहे की, जी सांकेतिक रचनांच्या साहाय्याने आनुभविक सत्यतेच्या निरीक्षणात्मक विषयाला कल्पनांच्या उच्च पातळीवर मागे टाकते. यादृष्टीने विचार करता आपणास समाजशास्त्रीय सिद्धांताचे स्वरूप पाहताना समाजशास्त्रीय सिद्धांताची खालील अनेक ढळक वैशिष्ट्ये दिसून येतात. त्याचा देखील अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ❖ समाजशास्त्रीय सिद्धांताची वैशिष्ट्ये :

थॉमस वॉर्ड यांनी समाजशास्त्रीय सिद्धांताचे स्वरूप जाणून घेण्यासाठी समाजशास्त्रीय सिद्धांताची ठळक वैशिष्ट्ये अभ्यासणे आवश्यक आहे असे मत मांडले. त्यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांताची बहुसंख्य वैशिष्ट्ये उपदेशात्मक असून ती अनुभवाच्या आधारे पडताळा पाहण्यामध्ये अग्रेसर ठरतात.

समाजशास्त्रीय सिद्धांताची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) समाजशास्त्रीय सिद्धांत हे सार्वत्रिक स्वरूपाचे असतात. याचाच अर्थ असे सिद्धांत सर्व प्रकारच्या सामाजिक परिस्थितीत लागू होणारे असतात.

२) समाजशास्त्रीय सिद्धांत हे त्या त्या समाजाचे स्वरूप, परंपरा आणि आवश्यकता या आधारावर निर्माण केले जातात. उदा. एमिल डुरखाईमचा आत्महत्येचा सिद्धांत अथवा चार्लस् हॉर्टन कुलेचा प्रतिबिंबित 'स्व' कल्पनेचा सिद्धांत.

३) समाजशास्त्रीय सिद्धांत हे व्यवहाराच्या कसोटीवर घासून पाहता येत नसले तरी विषय आकलनासाठी त्यांची खूप गरज भासते.

४) समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये कालानुरूप किंवा परिस्थितीनुसार योग्य ते परिवर्तन होऊ शकते.

५) जे समाजशास्त्रीय सिद्धांत वैज्ञानिक स्वरूपाचे आहेत त्यांचे प्रयोगात्मक किंवा अनुभविक परीक्षण केले जाऊ शकते.

समाजशास्त्रीय सिद्धांताची वरील सर्व ठळक वैशिष्ट्ये अभ्यासली असता आपणास अशा सिद्धांताचे स्पष्ट स्वरूप समजू शकते. त्या आधारे असा निष्कर्ष निघू शकेल की, पूर्वस्थापित समाजशास्त्रीय सिद्धांताचे आज नवीन स्वरूपात परिक्षण करण्याची गरज आहे. अशा सिद्धांताना वैज्ञानिक नियमांच्या साहाय्याने योग्य तथ्यांची सिद्धता होणे आवश्यक आहे. तसेच सद्यकालीन गंभीर अशा सामाजिक समस्यांचा अभ्यास करून नवनवीन सिद्धांत मांडून ते पुन्हा पुन्हा तपासून पाहिले पाहिजेत उदा. दूरदर्शनचा तरूण पिढीवर होणारा परिणाम, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील वाढता दहशतवाद, चंगळवादी प्रवृत्ती, पर्यावरण असंतुलनाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यासारख्या असंख्य स्वरूपाचा समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये अभ्यास करण्याची खूप गरज आहे. असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

❖ **समाजशास्त्रीय सिद्धांताचे घटक किंवा पैलू** (Elements of Sociological Theory) :

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ हॅरी जॉन्सन यांच्या मते, समाजशास्त्र हे एक सामान्य सामाजिक शास्त्र असून या शास्त्राकडून मानव समाजाचा आणि या समाजामध्ये घडून येणाऱ्या विविध घटनांचा अनुभवनिष्ठ, वस्तुनिष्ठ व विज्ञाननिष्ठ असा अभ्यास करून संबंधित घटनेला जबाबदार असणाऱ्या कारणांचा अभ्यास करण्यात आला. अशा अभ्यासावरून हे शास्त्र समस्या निर्मूलनासाठीचे उपाय किंवा मार्ग सुचविते. त्यामुळेच समाजशास्त्राला विज्ञानाचा दर्जा प्राप्त झाला आहे. समाजशास्त्रीय सिद्धांत या प्रथम प्रकरणामध्ये अपाणास समाजशशस्त्रीय सिद्धांताचे प्रमुख पैलू अथवा घटक या उपघटकाचा अभ्यास करावयाचा असल्याने त्यासंर्भात विज्ञानाची जी अनेक वैशिष्ट्ये समाजशास्त्रामध्ये आढळून येतात त्यांचा मागोवा घेणे गरजेचे आहे. विज्ञानाची समाजशास्त्रामध्ये आढळून येणारी वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर असे स्पष्ट होते की, समाजशास्त्र हे देखील एक सैद्धांतिक शास्त्र असून या शास्त्राद्वारे साजात उद्‌भवलेल्या विविध सामाजिक घटनांच्या संदर्भात तर्कशास्त्रीय परस्पर संबधी विधाने व्यक्त करता येतात. अशी विधाने पूर्णपणे अनुभव, वस्तुस्थिती आणि प्रत्यक्षवाद यावर आधारीत असल्याने त्यांना समाजशास्त्रीय सिद्धांताचे घटक किंवा पैलू म्हणून ओळखले जाते.

अमेरिकन समाजाशस्त्रज्ञ **हॅरी जॉन्सन** यांनी विज्ञानाची जी चार ठळक वैशिष्ट्ये समाजशास्त्रात आढळून येतात त्यांनाच समाजशास्त्रीय सिद्धांताचे चार प्रमुख घटक किंवा पैलू मानले. ते खालीलप्रमाणे सांगितले आहेत.

**१) समाजशास्त्र हे अनुभवनिष्ठ असे शास्त्र आहे :**

हॅरी जॉन्सन यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांताचा प्रथम घटक किंवा पैलू म्हणजे समाजाशस्त्र हे

अनुभवनिष्ठ असे शास्त्र असून संशोधकाला जे जे अनुभव येतात अशा अनुभवांच्या आधारे समाजशास्त्रीय सिद्धांत मांडले जातात. उदा. गरीबी आणि गुन्हेगारी प्रवृत्ती, निरक्षरता आणि वाढते जनन प्रमाण, औद्योगीकरणातील वाढ आणि 'वेश्याप्रवृत्ती यासारख्या सामाजिक घटना केवळ अनुभवाच्या आधारे समाजशास्त्रीय सिद्धांत म्हणून ओळखल्या जातात. थोडक्यात समाजशास्त्राकडून निरीक्षण, अनुभवनिष्ठता आणि कारणमिमांसा इत्यादींच्या आधारे सामाजिक घटनेचा अभ्यास केला जातो. साहजिकच अभ्यासकाचे निष्कर्ष हे काल्पनिक स्वरूपाचे नसतात तर ते अनुभवनिष्ठ असेच असू शकतात.

**२) समाजशास्त्र हे सैद्धांतिक शास्त्र आहे :**

हॅरी जॉन्सन यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांताचा दुसरा ठळक घटक किंवा पैलू म्हणजे समाजशास्त्र हे सैद्धातिक शास्त्र असल्याने हे शास्त्र समाजातील विविध समस्यांचे तार्किक संबंध स्पष्ट करते आणि त्या आधारे गुंतागुंतीच्या घटनांचे विविध अंगी निरीक्षण करून संशोधनात्मक अभ्यास करते. तसेच हे शास्त्र आपल्या अभ्यास विषयातील कार्यकारण परस्पर संबध स्पष्ट करून विषयाचे उद्दिष्ट प्रतिपादन करते. त्यामुळेच समाजाशस्त्रीय सिद्धांताचा हा दुसरा पैलू अथवा घटक सर्वात महत्त्वपूर्ण समजला जातो.

**३) समाजशास्त्रीय सिद्धांत हे परस्परावलंबी असतात :**

समाजशास्त्रीय सिद्धांताचा तिसरा पैलू किंवा घटक म्हणजे समाजशास्त्रीय सिद्धांत हे परस्परावलंबी असतात. याचाच अर्थ या शास्त्रातील सिद्धांत हे नवीन तत्त्वाच्या आधाराने त्यामध्ये सुधारणा करतात अथवा यामधील नवीन सिद्धांत हे प्रस्थापित सिद्धांतात दुरुस्ती करतात. उदा. प्राचिन काळी भारतीय ग्रामीण समाज हा खूपच रूढीप्रिय जीवन जगत होता. त्याच्यामध्ये नवीन जीवन प्रणाली चटकन स्वीकारली जात नव्हती. परंतु सद्यकालीन परिस्थितीत ग्रामवासियांच्या मध्ये ग्रामनगर स्थलांतर प्रवृत्ती अथवा नवीन जीवनप्रणालीचा स्वीकार असा दृष्टीकोन औढळून येत आहे. त्यामुळे जातीव्यवस्थेची बंधने शिथील होऊ लागली आहेत.

**४) समाजशास्त्रीय सिद्धांत हे सामाजिक क्रियांचे स्पष्टीकरण तथ्यावर आधारीत देतात :**

हॅरी जॉन्सन यांनी सामाजिक क्रियांचे स्पष्टीकरण तथ्यावर आधारीत हा समाजशास्त्रीय सिद्धांताचा शेवटचा पैलू अथवा घटक स्पष्ट केला. जॉन्सनच्या मते, समाजशास्त्रज्ञांच्याकडून समाजातील विशिष्ट सामाजिक क्रिया चांगल्या की वाईट हे न सांगता त्यांच्याकडून सामाजिक क्रियांचे स्पष्टीकरण तथ्यावर आधारीत दिले जाते. त्यामुळेच असे सिद्धांत अथवा घटनांचे स्पष्टीकरण हे अनुभवनिष्ठ व वास्तव असेच असते.

हॅरी जॉन्सन यांनी समाजाशस्त्रीय सिद्धांताचे वरील चार प्रमुख पैलू अथवा घटक विशद करून प्रत्येक समाजशास्त्राच्या अभ्यासकाने या पैलूंचा आधार घेऊन सामाजिक घटना अथवा घडामोडींचा अभ्यास केला तर साहजिकच समाजशास्त्राचा विकास निश्चित दिशेने होत जाईल असे स्पष्ट मत मांडले. या अर्थाने समाजशास्त्रीय सिद्धांताचे वरील सर्व पैलू अथवा घटक महत्त्वपूर्ण असल्याचे निदर्शनास येते.

समाजशास्त्रीय सिद्धांताचा अर्थ अथवा विविध व्याख्या, या सिद्धांताचे स्वरूप अथवा अशा सिद्धांतांची ठळक वैशिष्ट्ये आणि त्यांचे विविध घटक किंवा पैलू इत्यादी संदर्भातील वरिल विवेचन विचारात घेता असे

स्पष्ट होते की, नैसर्गिक शास्त्रांमधील सिद्धांतापेक्षा समाजशास्त्रीय सिद्धांताचे स्वरूप वेगळे आहे. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र यासारखी नैसर्गिक शास्त्रे प्रायोगिक स्वरूपाची असल्याने या शास्त्राकडून काढले जाणारे निष्कर्ष हे 'त्रिकालाबाधित सत्य (Univeral truth) असे असतात. परंतु समाजशास्त्रातील वर्ग संघर्ष, आत्महत्या, 'श्रमविभाजन', 'स्व प्रतिबिंबित संकल्पना' आणि 'सामाजिक आंतरक्रियावाद' यासारखे सिद्धांत हे परिवर्तनशील अथवा गतीशील स्वरूपाचे असतात. अर्थात असे समाजशास्त्रीय सिद्धांत अनुभवनिष्ठता, वस्तुनिष्ठता, विज्ञाननिष्ठता आणि घटनांचा कार्यकारण परस्परसंबध विचारात घेवून सांगितले जात असल्याने अशा सिद्धांतांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

**१.२.१.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

१) 'समाजशास्त्राचे जनकत्व' कोणत्या फ्रेंच विचारवंताकडे जाते?

२) ऑगस्त कॉम्तने कोणता महत्त्वपूर्ण सिद्धांत मांडला?

३) समाजशास्त्रीय सिद्धांताकडून संशोधनयुक्त माहिती कशी मिळविली जाते?

४) समाजशास्त्रीय सिद्धांताचा उगम व उदय जाणून घेण्यामध्ये कोणत्या अभ्यासकांची विचार मांडणी खूप उपयुक्त ठरली ?

५) ''सिद्धांत म्हणजे कोणत्याही घटनेबाबतचे बुद्धीप्रामाण्यवादी किंवा बुद्धीच्या निकषावर आधारीत विधान होय'' अशी सिद्धांताची व्याख्या कोणी सांगितली ?

६) आर. के. मर्टन यांच्या मते, सिद्धांत ही संज्ञा कशावर आधारीत आहे ?

७) 'समाजशास्त्रीय सिद्धांत म्हणजे तर्कशास्त्रावर आधारीत संकल्पना आणि विधाने यांची अनुमानिक अवस्था' असा विचार कोणी मांडला?

८) समाजशास्त्रीय सिद्धांताची कोणतीही दोन ठळक वैशिष्ट्ये सांगा.

९) समाजशास्त्रीय सिद्धांताचे किती प्रमुख घटक आढळून येतात?

१०) समाजशास्त्र हे कसे शास्त्र आहे?

**१.२.२ समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रकार आणि कार्ये** (Types and Functions of Sociological Theory) :

समाजशास्त्रीय सिद्धांत या प्रथम घटकातील समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रकार आणि कार्ये हा दुसरा उपघटक आहे. समाजशास्त्रीय सिद्धांताचे वर्गीकरण अनेक समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारे केले आहे. यासंदर्भात विचारवंतांच्यामध्ये एक वाक्यता आढळत नाही. अनेक समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्रीय सिद्धांताचे वेगवेगळे प्रकार सांगितले असून त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

**१) जॉर्ज सी होमन्स :**

जॉर्ज होमन्स या समाजशास्त्रज्ञाने समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रमाणक सिद्धांत आणि अप्रमाणक सिद्धांत हे दोन प्रकार सांगितले आणि पुढे त्याचे उपप्रकारात विभाजन केले आहे.

आकृती क्र. १

होमन्स यांनी सांगितलेले समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रकार

| १) प्रमाणक सिद्धांत | २) अ-प्रमाणक सिद्धांत |
|---|---|
| उपप्रकार | उपप्रकार |
| अ) एक बाजू असलेले प्रमाणक सिद्धांत | अ) संरचनात्मक अप्रमाणक सिद्धांत |
| ब) दोन अथवा अनेक बाजू असणारे प्रमाणक सिद्धांत | ब) कार्यात्मक अप्रमाणक सिद्धांत |
| | क) मानसशास्त्रीय अप्रमाणक सिद्धांत |

प्रमाणक सिद्धांताचे दोन आणि अप्रमाणक सिद्धांताचे तीन उपप्रकार असून या सर्व सिद्धांत प्रकारांचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

**१) प्रमाणक सिद्धांत :**

जॉर्ज होमन्स यांच्या मते, जे सिद्धांत उपयोगी अथवा व्यावहारिकदृष्ट्या उपयुक्त असतात त्यांना प्रमाणक सिद्धांत असे संबोधिले जाते. अशा प्रमाणक सिद्धांताचे एक बाजू असलेले प्रमाणक सिद्धांत आणि दोन किंवा अधिक बाजू असणारे प्रमाणक सिद्धांत हे दोन उपप्रकार आढळून येतात.

**अ)** एक बाजू असणाऱ्या प्रमाणक सिद्धांतामध्ये सामाजिक व्याप्ती आणि सामाजिक गट हे विशिष्ट ध्येय साध्य करण्यासाठी कोणत्या प्रकारचे वर्तन करतात याचे स्पष्टीकरण केले जाते. उदा. उपयोगी समाजशास्त्राचे सिद्धांत.

**ब)** दोन अथवा अनेक बाजू असणाऱ्या प्रमाणक सिद्धांतामध्ये दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तीमधील आंतरक्रिया ही दुसऱ्या प्रमाणकमान्य वर्तनाशी कशी निगडीत आहे याचे स्पष्टीकरण केले जाते.

**२) अप्रमाणक सिद्धांत :**

जॉर्ज होमन्स यांनी समाजशास्त्रीय सिद्धांताचा अप्रमाणक सिद्धांत हा दुसरा प्रकार सांगितला. तसेच त्याचे संरचनात्मक, कार्यात्मक आणि मानसशास्त्रीय अप्रमाणक सिद्धांत हे तीन उपप्रकार सांगितले. त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**अ) संरचनात्मक अप्रमाणक सिद्धांत :** जॉर्ज होमन्स यांच्या मते, ''ज्या समाजशास्त्रीय सिद्धांताच्या प्रकाराकडून सामाजिक वर्तनामध्ये अस्तीत्वात असलेल्या काही मूलभूत घटकांचे स्पष्टीकरण केले जाते. त्याला संरचनात्मक अप्रमाणक सिद्धांत म्हटले जाते. अशा सिद्धांतांमुळे सामाजिक संरचनेला किंवा समाज व्यवस्थेला विशिष्ट आकार प्राप्त होतो.

**ब) कार्यात्मक अप्रमाणक सिद्धांत :** अप्रमाणक सिद्धांताच्या कार्यात्मक अप्रमाणक सिद्धांतामध्ये जोपर्यंत समाजातील मूलभूत घटकांच्या आधारे विविध कार्याद्वारे समाजात समतोल राहिल तोपर्यंतच समाज टिकून राहील अथवा संशोधकाला आपले ध्येय गाठता येईल असा विचार मांडण्यात आला.

**क) मानसास्त्रीय अप्रमाणक सिद्धांत :** अप्रमाणक सिद्धांताच्या या उपप्रकारामध्ये उच्च श्रेणीची काही विधाने स्पष्ट केली जातात. उदा. मानवी समाजाचा एक सभासद म्हणून व्यक्तीचे वर्तन अथवा व्यक्ती वर्तनातील बदल हा सामाजिक बदल नसून तो विशिष्ट व्यक्तीचे वर्तन म्हणून ओळखला जातो.

**२) अलविन बॉसकॉफ :**

बॉस कॉफ या समाजशास्त्रज्ञाने त्यांच्या ''आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत'' या पुस्तकामध्ये समाजशास्त्रीय सिद्धांताचे १) अ-सामाजिक सिद्धांत आणि २) लघुत्ववादी सामाजिक सिद्धांत हे दोन प्रकार सांगितले. त्याचा आढावा खालीलप्रमाणे विशद केला.

**अ) अ-सामाजिक सिद्धांत :** ''ज्या समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये सामाजिक घटनांचे भौतिक घटकांच्या आधारे अथवा नैसर्गिक शक्तींच्या संदर्भात विश्लेषण केले जाते अशा सिद्धांताला अ-सामाजिक सिद्धांत असे म्हटले जाते.''

**ब) लघुत्ववादी सामाजिक सिद्धांत :** ''ज्या समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये प्रतिपादन केलेले सिद्धांत हे पारंपारिक संज्ञाना भौतिक व जीवशास्त्राची निर्मिती म्हणून ओळखले जातात. त्यांना लघुत्ववादी सामाजिक सिद्धांत असे म्हटले जाते.''

**३) हेल्मट वाग्नर :**

हेल्मट वाग्नर या समाजशास्त्रज्ञाने समाजशास्त्रीय सिद्धांताचे खालील तीन प्रकारामध्ये विभाजन केले आहे. उदा. प्रत्यक्षवादी, विश्लेणात्मक आणि अ-वैज्ञानिक समाजशास्त्रीय सिद्धांत इत्यादी. त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले.

**१) प्रत्यक्षवादी समाजशास्त्रीय सिद्धांत :**

प्रत्यक्षवादी विचारवंतांच्या मते, समाजशास्त्र हे एक नैसर्गिक शास्त्र असून या शास्त्राकडून मानव परिस्थिती विज्ञान, रचनात्मक कार्यात्मक वाद, सामाजिक वर्तनवाद यासारखे सिद्धांत मांडले जातात. त्यामुळेच समाजशास्त्राला ऑगस्त कॉम्तने प्रत्यक्षवादी अथवा विज्ञानवादी शास्त्र असे संबोधिले.

**२) विश्लेणात्मक अथवा स्पष्टीकरणात्मक समाजशास्त्रीय सिद्धांत :**

हेल्मट वाग्नर या समाजशास्त्रज्ञाने विश्लेणात्मक अथवा स्पष्टीकरणात्मक हा समाजशास्त्रीय सिद्धांताचा

दुसरा प्रकार सांगितला. अनेक संशोधक अथवा स्पष्टीकरणात्मक समाजशास्त्रीय सिद्धांत मांडणाऱ्या विचारवंतांच्या मते, समाजशास्त्र हे नैसर्गिक शास्त्र नसून ते एक सामाजिक शास्त्र आहे. हे शास्त्र सामाजिक क्रिया आणि आंतरक्रिया तसेच सामाजिक मानसशास्त्र यासंबंधीचे स्पष्टीकरणात्मक सिद्धांत मांडते.

**३) अ-वैज्ञानिक समाजशास्त्रीय सिद्धांत :**

अ-वैज्ञानिक समाजशास्त्रीय सिद्धांत हा तिसरा प्रकार असून हा प्रकार सांगणाऱ्या विचारवंतांच्या मते, समाजशास्त्र हे प्रत्यक्षवादी अथवा स्पष्टीकरणात्मक विज्ञान नसून हे शास्त्र सामाजिक तत्त्वज्ञान विषयक तसेच मानवी सुधारणात्मक सिद्धांत प्रतिपादन करते. संशोधकांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांताचा हा प्रकार अ-वैज्ञानिक म्हणून ओळखला जातो.

समाजशास्त्रीय सिद्धांताच्या वरील प्रकाराशिवाय डॉन मार्टिन डेल या विचारवंताने आपल्या "The Nature and types of Sociological Theory" या पुस्तकामध्ये समाजशास्त्रीय सिद्धांताचे १) संघर्ष सिद्धांत, २) स्वरूपात्मक सिद्धांत, ३) सामाजिक व्यवहारवाद, ४) प्रत्यक्षवादी सिद्धांत आणि, ५) समाजशास्त्रीय प्रकार्यवाद हे प्रमुख प्रकार सांगितले. प्रत्यक्षवादी सावयवी सिद्धांत सर्वात प्रथम हर्बर्ट स्पेन्सरने मांडला. संघर्ष सिद्धांत कार्ल मार्क्सने मांडला. सामाजिक व्यवहारावाद सिद्धांत मॅक्स वेबर व टालकॉट पार्सन्स यांनी मंडला तर समाजशास्त्रीय प्रकार्यवाद सिद्धांत रॉबर्ट मर्टन, रॅडाक्लिफ ब्राऊन आणि विल्फ्रेडो पॅरेटो इत्यादी समाजशास्त्रज्ञानी मांडला.

समाजशास्त्रीय सिद्धांताचे वरील विविध विचारवंतांनी वेगवेगळे प्रकार सांगितले. अर्थात या प्रकारासंबंधी विचारवंताच्या मध्ये एकमत नाही. तरी देखील समाजशास्त्रीय सिद्धांताचे वरील विविध प्रकार विचारात घेता असे निदर्शनास येते की, या सर्व सिद्धांताद्वारे समाजाचे वास्तव, अनुभवनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ असे आकलन होण्यास खूपच मदत झालेली आहे. रॉबर्ट मर्टन यांचा प्रमाणक शुन्यतेचा सिद्धांत, ऑगस्त कॉम्तचा विज्ञानवादाचा सिद्धांत, जॉर्ज होमन्स यांचा सामाजिक वर्तनाचा सिद्धांत आणि विलफ्रेडो पॅरेटो यांचा श्रेष्ठीजन अभिसरणाचा सिद्धांत याद्वारे मानवी विविध घटना किंवा घडामोडींची प्रयोगाशिवाय अधिक वास्तव माहिती मिळू शकते. त्यामुळेच अशा समाजशास्त्रीय सिद्धांताना आज देखील खूप महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

❖ **समाजशास्त्रीय सिद्धांताची कार्ये अथवा महत्त्व** (Functions or Importance of Sociological Theory) :

**डॉ. मॉरिस कोहेन** या विचारवंताने समाजशास्त्रीय सिद्धांताची प्रमुख व महत्त्वपूर्ण विविध कार्ये खालीलप्रमाणे सांगितली आहेत की, ज्यामुळे अशा सिद्धांतांना समाजात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते -

**१) समाजशास्त्रीय सिद्धांत हे संभाव्य समस्या सुचित करतात आणि नवीन अभ्यासाला जन्म देतात**

**डॉ. मॉरिस कोहेन** यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांताचे सर्वात प्रथम आणि महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे हे सिद्धांत समाजामध्ये प्राप्त परिस्थितीत कोणत्या संभाव्य समस्या आहेत हे सुचित करतात, तसेच या

सिद्धांताद्वारे नवीन शोधात्मक अभ्यासाला एक प्रकारची दिशा मिळते. उदा. भारतासारख्या देशात सर्वात गंभीर समस्या वाढते जनन प्रमाण ही असून सर्वांगिण विकासासाठी ''आम्ही दोन आमचे एक'' असा नवीन शोधात्मक आणि गरजेचा मार्ग सुचित केला जातो. यालाच अनुभविक संशोधन असे म्हटले जाते. नवीन सिद्धांत बांधणीमध्ये असा विचार म्हणजे एक प्रकारचे मार्गदर्शक तत्त्वच असल्याचे दिसून येते.

**२) गृहीत तथ्यांच्या आधारे संशोधनाच्या फलनिष्पतीत वाढ करणे :**

संभाव्य समस्या सुचित करणे याबरोबरच समाजशास्त्रीय सिद्धांताचे दुसरे महत्त्वपूर्व कार्य म्हणजे हे सिद्धांत गृहीत तथ्यांच्या आधारे संशोधनाच्या फलनिष्पतीत वाढ करतात. याचाच अर्थ हे सिद्धांत ऐतिहासिक विश्लेषण आणि निरीक्षणावर आधारीत असल्याने जास्तीत जास्त वास्तव माहिती मिळवून देतात. उदा. गरीबी किंवा दारिद्र्य आणि गुन्हेगारीची प्रवृत्ती व मादक पदार्थ सेवन प्रवृत्ती. अशा सिद्धांताने उपलब्ध तथ्ये पडताळून पाहता येतात, त्यामुळेच समाजशास्त्रीय सिद्धांताचे हे कार्य महत्त्वपूर्ण मानले जाते.

**३) समाजशास्त्रीय सिद्धांताने संशोधनाला योग्य मार्गदर्शन मिळते :**

डॉ. कोहेन यांच्या मते, कोणत्याही समाजशास्त्रीय संशोधनाला इतरांच्या योग्य मार्गदर्शनाची सतत गरज भासते. यासंदर्भात विचार करता समाजशास्त्रीय सिद्धांताचे हे अतिशय महत्त्वाचे कार्य असल्याचे दिसून येते. उदा. संशोधकाने कोणती आवश्यक तथ्ये गोळा करावीत आणि कोणत्या तथ्यांच्याकडे दुर्लक्ष करावे यासंदर्भातील योग्य मार्गदर्शन हे केवळ समाजशास्त्रीय सिद्धांताकडूनच मिळत असल्याने अशा सिद्धांताना मानव समाजात सातत्याने महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. अर्थात त्यासाठी संशोधकाकडे सूक्ष्मदृष्टी असावी लागते.

**४) अनुभविक निष्कर्ष आणि सामान्य ज्ञान यामध्ये दुवा प्रस्थापित करणे :**

डॉ. मॉरिस कोहेन यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांत हे अनुभवनिष्ठता आणि वस्तुनिष्ठता यावर आधारीत असल्याने असे सिद्धांत नेहमीच अनुभविक सिद्धांत व सामान्य ज्ञान यामध्ये दुवा साधण्याचे कार्य करतात. याचा फायदा म्हणजे समाजशास्त्रीय संशोधनातील अर्थपूर्णता वाढीस लागते. उदा. वाढते औद्योगिकीकरण आणि झोपडपट्टीची समस्या अथवा निरक्षरता व रूढीपरंपरांचा पगडा आणि वाढते जनन प्रमाण. थोडक्यात वरील समाजशास्त्रीय सिद्धांत हे अनुभविक सामान्यीकरण आणि समाजाची वास्तव स्थिती यामध्ये नेहमीच मध्यस्थीची भूमिका पार पाडतात. त्यामुळे अशा संशोधनाने वास्तव माहिती मिळू शकते.

**५) विषयाची सुव्यवस्थित मांडणी केली जाते :**

डॉ. कोहेन यांच्या मते, समाजाशास्त्रीय सिद्धांत हे विषयाची सुव्यवस्थित मांडणी करतात. तसेच अशा मांडणीमधील सोयीस्कर संकल्पनात्मक संबंध विशद करतात. तथ्य समूहातील नियम आणि त्यांची सुव्यवस्थित मांडणी यामुळे अशा सिद्धांताना एकप्रकारची प्रमाणबद्धता प्राप्त होते. याचाच अर्थ विविध समाजशास्त्रीय सिद्धांत हे संघटनात्मक चौकटीमध्ये मांडले जात असल्याने प्राप्त परिस्थितीत समाजशास्त्रीय सिद्धांताना खूप महत्त्व निर्माण झाल्याचे दिसून येते.

**६) ज्ञानातील उणीवांची जाणीव करून दिली जाते :**

समाजशास्त्रीय सिद्धांताचे आपल्या ज्ञानामधील उणिवांची अभ्यासकाला जाणीव करून देणे हे देखील एक महत्त्वाचे कार्य समजले जाते. याचा अर्थ कोणताही समाजशास्त्रीय संशोधक हा प्रत्येक कार्यामध्ये आणि माहिती मिळविण्यामध्ये परिपूर्ण नसतो. तो स्वत:ला आलेल्या अनुभवाने आणि अंर्तज्ञानाने एखाद्या घटनेची माहिती मिळवितो. अर्थात अशी माहिती कधीच परिपूर्ण नसते. तिच्यामध्ये कोणती ना कोणती अपूर्णता असते. अशावेळी समाजशास्त्रीय संशोधकाला सिद्धांताच्या माध्यमातून माहिती एकत्र करता येते. तसेच अशा माहितीद्वारे सामान्यीकरण आणि पूर्वकथन करता येते. उदा. पालक किंवा धर्मपिता अथवा सुईन किंवा दाई यांच्यामध्ये एकत्र भूमिका वठविण्याचे कार्य केले जाते. त्यामुळेच अशा सिद्धांताना महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

**७) चौकशीचे माध्यम किंवा साधन म्हणून समाजशास्त्रीय सिद्धांताचा उपयोग :**

डॉ. मॉरिस कोहेन यांनी समाजशास्त्रीय सिद्धांताचे चौकशीचे माध्यम अथवा साधन हे देखील एक महत्त्वपूर्ण कार्य असल्याचे नमूद केले. त्यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांत हे संशोधन आराखडा तयार करणे, तथ्य संचलनाला संस्थात्मक रूप देणे आणि संकलित तथ्यांचे मोजमाप करणे यासारखी अनेक महत्त्वाची कार्ये पार पडतात. त्यामुळेच अशा सिद्धांताना चौकशीचे माध्यम अथवा साधन म्हणून अतिशय महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

समाजशास्त्रीय सिद्धांतांची वरील अनेक महत्त्वपूर्ण कार्ये अभ्यासल्यानंतर अशा सिद्धांताबाबत शेवटी असे म्हणता येईल की, समाजशास्त्रातील सिद्धांतांचे अथवा संशोधनाचे निष्कर्ष हे परिस्थितीसापेक्ष, अनुभवनिष्ठ, वस्तुनिष्ठ आणि समाजसापेक्ष असल्याने संशोधनाचा पडताळा पाहता येतो. त्यामुळे अर्थातच समाजशास्त्रीय अभ्यासाला एक विशिष्ट दिशा प्राप्त होते. नवीन सिद्धांत बांधणीला अशी माहिती अथवा संशोधन खूप मार्गदर्शक ठरते. एकूणच समाजशास्त्रीय सिद्धांतांना खूप महत्त्व निर्माण झाल्याचे दिसून येते.

**१.२.२.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

१) जॉर्ज होमन्स यांनी समाजशास्त्रीय सिद्धांताचे कोणते दोन प्रकार सांगितले ?

२) अलविन बॉसकॉफ यांनी कोणता ग्रंथ लिहिला ?

३) कोणत्या समाजशास्त्रज्ञाने समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रत्यक्षवादी, विश्लेषणात्मक आणि अ-वैज्ञानिक हे तीन प्रकार सांगितले?

४) "The Nature and Types of Sociological Theory" हा ग्रंथ कोणी लिहिला?

५) प्रत्यक्षवादी सावयवी सिद्धांत सर्वात प्रथम कोणी मांडला?

६) समाजशास्त्रीय प्रकार्यवाद सिद्धांत कोणी मांडला?

७) समाजशास्त्रीय सिद्धांताद्वारे कोणकोणत्या गोष्टी शक्य होतात.

८) समाजशास्त्रीय सिद्धांतांना चौकशीचे माध्यम किंवा साधन म्हणून कोणी उल्लेख केला?

९) डॉ. मॉरिस कोहेन यांनी समाजशास्त्रीय सिद्धांताची सांगितलेली कोणातीही दोन कार्ये लिहा.

१०) डॉ. मॉरिस कोहेन यांच्या मते, ज्ञानातील उणिवांची जाणिव कोणामुळे होत असते ?

**१.२.३ सिद्धांत आणि संशोधन यामधील परस्पर संबध** (Relationship between Theory and Research) **:**

समाजशास्त्रीय सिद्धांत या प्रथम घटकातील सिद्धांत आणि संशोधन हा तिसरा उपघटक असून यामध्ये आपणास सिद्धांत आणि संशोधन याचा अर्थ किंवा व्याख्या आणि या दोहोतील परस्परसंबध समजावून घ्यावा लागेल.

अनेक समाजशास्त्रज्ञांनी सिद्धांत आणि संशोधन हे एकमेकांवर अधिक प्रमाणात अवलंबून आहेत असे म्हटले आहे. समाजशास्त्रातील संशोधन हे अनुभवाधिष्ठीत तसेच वास्तवतेवर आधारीत असल्याने अशा संशोधनातूनच प्रयोगाशिवाय सिद्धांत मांडले जातात. याचा अर्थ सिद्धांताची सुरूवात सामाजिक घटनांच्या अभ्यासातून अथवा संशोधनातून होत असते. जेव्हा संशोधन अनुभवनिष्ठतेवर आधारीत असते तेव्हा अधिक प्रमाणात सिद्धांताची विश्वसनीयता वाढत जाते. त्यामुळेच रॉबर्ट मर्टन या विचारवंताने सिद्धांत आणि संशोधन हे एकमेकावर अवलंबून असल्याचे मत व्यक्त केले आहे.

याठिकाणी आपणास प्रथमत: सिद्धांत आणि संशोधन याचा अर्थ आणि या दोहोतील परस्परसंबध जाणून घ्यावा लागेल.

❖ **सिद्धांताचा अर्थ किंवा व्याख्या** (Meaning or Definitions of Theory) :

सिद्धांताचा निश्चित अर्थ समजावून घेण्यासाठी खालील प्रमुख व्याख्या अभ्यासाव्या लागतील.

**१) प्रा. गुड व हॅट :**

''सिद्धांत व तथ्ये यांच्या सततच्या क्रिया आणि प्रतिक्रिया यातूनच विज्ञानाचा विकास होत असतो.''

**२) प्रा. डॉ. नाडगोंडे :**

''निरनिराळ्या घटनांच्यामधील आंतरसंबध स्पष्ट करणारे आणि त्यांची व्यवस्थित मांडणी किंवा क्रम लावणारे सूत्र म्हणजे सिद्धांत होय.''

**३) टालकॉट पार्सन्स :**

''सिद्धांत म्हणजे आनुभविक संदर्भावर आधारीत प्रमुख बाबींचे तर्कशास्त्रीय परस्परावलंबी सामान्यीकरण होय.''

सिद्धांताच्या वरील प्रमुख व्याख्या विचारात घेता असे निदर्शनास येते की, एखाद्या समस्येविषयी मिमांसा करताना घटकांच्या परस्पर संबंधाविषयीचे जे प्रतिपादन निश्चित स्वरूपात केले जाते त्यालाच

सिद्धांत असे म्हटले जाते. समाजशास्त्रीय सिद्धांत हे तथ्यांच्या किंवा संकलीत माहितीच्या आंतरसंबंधातून अथवा अर्थपूर्ण मांडणीमधून व्यक्त केले जातात. याचा अर्थ असे सिद्धांत अनुभवनिष्ठ असतात, तसेच ते निरीक्षण आणि वस्तुनिष्ठता याच्या निकषावर अवलंबून असतात. त्यामुळेच ते नैसर्गिक शास्त्रांप्रमाणे त्रिकालाबाधीत सत्य नसले तरी तर्कामधून व अनुभूतीमधून व्यक्त केले जात असल्याने समाजशास्त्रीय संशोधनामध्ये अशा सिद्धांताना महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते.

थोडक्यात असे म्हणता येईल की, समाजशास्त्रातील सिद्धांत हे घटनांची कार्यकारण मिमांसा करून मांडले जात असल्याने अशा सिद्धांताचा कोणताही पडताळा पाहता येतो. उदा. दारिद्र्य आणि मादक पदार्थ सेवन प्रवृत्ती, निरक्षरता व रूढीपरंपरांचा पगडा आणि वाढते जनन प्रमाण यासारखे सिद्धांत पडताळून पाहता येतात. असे सिद्धांत तथ्यांच्या आधारे मांडले जात असल्याने विशिष्ट परिस्थिती आणि अशा परिस्थितीचे परिणाम समजून येण्यास सिद्धांताची खूप मदत होते.

❖ **सिद्धांतामधील आवश्यक बाबी (सिद्धांत कसा असावा यासंदर्भातील समाजशास्त्रज्ञांची मते)**

समाजाशास्त्रज्ञांच्या मते, अनुमान म्हणजे सिद्धांत नव्हे, कारण अनुमाने ही घटनेबद्दल ज्ञान मिळवून काढली जातात. त्यामुळे अशा अनुमानाना सिद्धांत म्हणता येत नाही. उदा. ढगाळ वातावरणांमुळे पाऊस पडणार असे ठामपणे मत मांडता येत नाही. असे असले तरी समाजशास्त्रातील सिद्धांत हे कसे असावेत? अथवा अशा सिद्धांतामध्ये कोणकोणत्या आवश्यक बाबी असल्या पाहिजेत यासंदर्भात विचारवंतांनी खालील प्रमुख तीन बाबी विषद केल्या.

१) सिद्धांत हा प्रामुख्याने औपचारिक पद्धतीने प्रतिपादन केला पाहिजे.

२) सिद्धांत हा कोणत्याही प्रकारच्या वैज्ञानिक कसोटीला उतरला पाहिजे.

३) कोणत्याही सिद्धांतामध्ये भविष्य कथन करण्याची शक्ती हा महत्त्वाचा निकष असला पाहिजे.

सिद्धांतामध्ये वरील तीन बाबी असतील तर निश्चितच असा सिद्धांत घटनांचा कार्यकारण परस्परसंबध स्पष्ट करण्यामध्ये यशस्वी होईल. तसेच अभ्यासकाने घटनेच्या संदर्भात काढलेला निष्कर्ष पडताळून पाहता येईल. थोडक्यात समाजशास्त्रातील सिद्धांत हे अनुभवनिष्ठ असल्याने अशा सिद्धांताना समाजामध्ये अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

❖ **संशोधनाचा अर्थ किंवा व्याख्या** (Meaning or Definitions of Research) :

सिद्धांत व संशोधन यामधील परस्परसंबध पाहण्यापूर्वी सिद्धांताप्रमाणे संशोधनाचा निश्चित अर्थ अथवा त्यासंदर्भातील विविध व्याख्या समजावून घेतल्या पाहिजेत.

'संशोधन' या मराठी संज्ञेला इंग्रजीमध्ये Research असे म्हणतात. Re म्हणजे पुन्हा पुन्हा आणि Search म्हणजे शोध घेत राहणे. यावरून संशोधन हा शब्द तयार झाला असे विचारवंतांचे मत आहे. त्यांच्या मते ''नवीन तत्त्व शोधून काढणे, त्याची पुनः प्रचिती पाहणे आणि त्या तत्त्वाची सातत्याने चिकित्सा करणे म्हणजे संशोधन होय.''

संशोधनाचा निश्चित अर्थ समजावून घेण्यासाठी संशोधनाच्या खालील ठळक व्याख्या अभ्यासाव्या लागतील.

**१) एल. व्ही. लेहमन आणि ए. व्ही. एच् मोरी :**

''संशोधन म्हणजे नवीन ज्ञान मिळविण्यासाठी केले जाणारे पद्धतशीर प्रयत्न होत.''

**२) न्यू सेंच्युरी शब्दकोश :**

''नवीन तत्त्व अगर नवीन बाब शोधून काढण्यासाठी सातत्याने काळजीपूर्वक केलेली चिकित्सा म्हणजे संशोधन होय.''

**३) वेबस्टर शब्दकोश :**

''संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये (माहिती) शोधण्यासाठी आणि जुन्या तथ्यांचे परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय.''

**४) मोझर :**

''सामाजिक घटना आणि सामाजिक समस्या यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबद्ध प्रयत्न म्हणजे संशोधन होय.''

**५) स्लेसिंजर व स्टीफन्सन :**

''प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढविणे, ज्ञानात सुधारणा करणे आणि ज्ञान प्रमाणित करणे म्हणजे संशोधन होय.''

संशोधनाच्या वरील विविध व्याख्या अभ्यासल्या असता त्यावरून असे स्पष्ट होते की, संशोधन ही एक पद्धतशीर व वैज्ञानिक प्रक्रिया असून या प्रक्रियेद्वारे सामाजिक जीवनासंबंधी नवीन तथ्यांचा शोध घेतला जातो. अथवा जुन्या तथ्यांचे पुर्नस्पष्टीकरण केले जाते. त्यामुळे मानव समाजात अशा संशोधनाची नितांत गरज भासते.

❖ **संशोधन प्रक्रियेचे स्वरूप किंवा उद्दिष्ट्ये** (Nature or Aims of Research) :

संशोधन या संदर्भातील वरील व्याख्या अभ्यासल्यानंतर आपणास संशोधन प्रक्रियेचे स्वरूप माहित करून घेणे आवश्यक आहे. या प्रक्रियेमध्ये खालील ठळक उद्दिष्टांचा समावेश होतो.

**१) सामान्यीकरण :**

संशोधन प्रक्रियेचे सर्वात महत्त्वपूर्ण उद्दिष्ट म्हणजे सामान्यीकरण हे होय. कोणताही संशोधक संशोधन करताना विशिष्ट वस्तु, संकल्पना अथवा तथ्ये शास्त्रीय पद्धतीने हाताळतो. त्यावरून सामान्य निष्कर्ष काढतो अथवा सिद्धांत मांडतो. तसेच विशिष्ट परिस्थितीचे कोणते आणि कसे परिणाम होतील याचे निदान करतो. याचा फायदा म्हणजे अशा संशोधनाने एखाद्या घटनेचे संभाव्य दुष्परिणाम टाळता येतात. उदा. वाढते

जननप्रमाण, झोपडपट्टी, प्रदूषण, स्त्री भ्रूणहत्या इत्यादींचे मानव समाजावर होणारे दुष्परिणाम संशोधनाने टाळणे शक्य हाते.

**२) उपलब्ध ज्ञानाची सत्यता पुन:प्रमाणित करणे :**

संशोधन प्रक्रियेचे सामान्यीकरणाप्रमाणेच उपलब्ध ज्ञानाची सत्यता पुन:प्रमाणित करणे हे दुसरे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आढळून येते. समाजशास्त्रज्ञांच्या मते, ज्याप्रमाणे कोणताही संशोधक वर्तमान ज्ञानामध्ये जशी भर घालतो त्याचप्रमाणे अशा ज्ञानाला विशिष्ट प्रमाणित प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतो. यामुळे प्रस्थापित ज्ञानातील विसंगती उजेडात आणणे शक्य होते. त्यामुळे अशा संशोधनाची गरज भासते.

**३) सिद्धांत निर्मिती आणि ज्ञानाची कक्षा विस्तारणे :**

संशोधनातून विशिष्ट निष्कर्ष काढला जातो व त्यामुळे ज्ञान कक्षा विस्तारली जाते. अशा ज्ञान प्राप्तीला सिद्धांतभिमूखता प्राप्त होते. तसेच अशा ज्ञानाचा व्यवहारामध्ये उपयोग होतो. त्यामुळे संशोधनाची नवीन ज्ञान प्राप्तीसाठी सातत्याने आवश्यकता भासते.

सिद्धांत व संशोधन प्रकियेचे अर्थ आणि संशोधन प्रक्रियेची ठळक उद्दिष्ट्ये अभ्यासल्यानंतर या दोहोतील परस्परसंबंध खालीलप्रमाणे आढळून येतो.

**रॉबर्ट मर्टन** या विचारवंताने सिद्धांत आणि संशोधन या दोहोतील सहसंबंध स्पष्ट करण्यापूर्वी असे म्हटले आहे की, सिद्धांताची सुरूवात ही संशोधनातून होत असते. जेव्हा अनुभविक संशोधनाची गती तीव्र होते तेव्हा सिद्धांताची विश्वसनीयता वाढत जाते. अर्थातच अशा सिद्धांताने अनुभविक संशोधनाला दिशा दिली जाते. त्यामुळेच सिद्धांत आणि संशोधन यामध्ये सातत्याने सहसंबध असल्याचे दिसून येते ते खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले.

**१) कार्यकारण संबंधाचा शोध :**

रॉबर्ट मर्टन या विचारवंताच्या मते, सिद्धात आणि संशोधन यामधील महत्त्वपूर्ण सहसंबंध म्हणजे संशोधनामध्ये मानवी वर्तन आणि मानवाच्या क्रिया, प्रतिक्रिया यामधील कार्यकारण संबंध स्पष्ट केले जातात आणि अशा संशोधनाच्या आधारे सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. शिक्षण प्रसाराने कुटुंब नियोजन प्रवृत्ती वाढत असेल तर तसा सिद्धांत मांडणे सोईस्कर होते. त्याचप्रमाणे गुन्हेगारीची प्रवृत्ती, वाढते औद्योगिकरण आणि झोपडपट्टीची समस्या यामधील सहसंबंध अभ्यासण्यासाठी संशोधन आणि त्याद्वारे अंतीम निष्कर्ष अथवा सिद्धांत मांडतात. कार्यकारण संबधाचा शोध हा अतिशय आवश्यक असतो.

**२) वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग :**

रॉबर्ट मर्टन यांच्या मते, संशोधन आणि सिद्धांत यामधील दुसरा महत्त्वपूर्ण संबंध म्हणजे या दोहोमध्ये वैज्ञानिक पद्धतीचा आणि तिच्या विविध अवस्थांचा (टप्पे) उपयोग केला जातो. उदा. समस्येची निवड, निरीक्षण, वर्गीकरण, सिद्धांत कल्पना, सामान्यीकरण आणि पूर्वकथन इ. अर्थातच यामुळे जास्तीत जास्त वास्तव असा निष्कर्ष किंवा सिद्धांत मांडणे शक्य होते. संशोधन व त्याद्वारे सिद्धांत याची खूप गरज भासते.

**३) सामाजिक घटनांचा अभ्यास :**

समाजशास्त्रीयदृष्ट्या विचार करता, संशोधन आणि सिद्धांत यामधील महत्त्वपूर्ण सहसंबंध म्हणजे संशोधनाचा संबंध सामाजिक घटनांशी येत असतो. अशा सिद्धांताच्या माध्यमातून व्यक्तीचे वर्तन, विविध आंतरक्रिया, समूह अथवा गटाच्या समस्या इ. चा अभ्यास करून समाजशास्त्रीय सिद्धांत स्पष्ट केला जातो. त्यामुळेच सिद्धांत आणि संशोधन यामध्ये परस्परसंबंध असल्याचे दिसून येते.

**४) नवीन तथ्यांचा शोध आणि जुन्या तथ्यांचे परीक्षण :**

रॉबर्ट मर्टन यांनी सिद्धांत आणि संशोधन यामधील परस्परसंबंध स्पष्ट करताना या दोहोमध्ये नवीन तथ्यांचा शोध आणि जुन्या तथ्यांचे परीक्षण केले जाते असे मत मांडले आहे. याचा अर्थ समाजशास्त्रीय संशोधनाने नवनवीन ज्ञान संपादन करता येते. तसेच जुन्या माहितीचे परीक्षण करता येते, त्याद्वारे नवीन सिद्धांत मांडला जातो. त्यामुळेच संशोधन आणि सिद्धांत या दोहोत सहसंबंध असल्याचे निदर्शनास येते.

**५) संख्यात्मक विश्लेण :**

रॉबर्ट मर्टनने संशोधन आणि सिद्धांत या दोहोतील सहसंबंध स्पष्ट करताना विविध सामाजिक घटनांचा संख्यात्मक अभ्यास करण्यासाठी संशोधन आणि त्याद्वारे निष्कर्ष किंवा सिद्धांत मांडण्याची गरज असते असा विचार मांडला. याचा अर्थ संशोधन आणि सिद्धांत याद्वारे मिळविलेल्या तथ्यांचे किंवा माहितीचे वर्गीकरण करता येते. तसेच अशा संख्यात्मक अभ्यासाद्वारे भविष्य कथन करता येते. साहजिकच विविध समस्यांची वास्तवता समजते, आणि त्याद्वारे सामाजिक निष्कर्ष काढता येतात. अर्थातच संशोधन आणि सिद्धांत यामध्ये सहसंबंध असल्याचे दिसून येते.

**१.२.३.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

१) समाजशास्त्रातील संशोधन कशावर आधारीत असते ?

२) समाजशास्त्रातील सिद्धांताची सुरुवात कशामधून होत असते?

३) कोणत्या विचारवंताने सिद्धांत आणि संशोधन हे एकमेकावर अवलंबून असल्याचे मत व्यक्त केले आहे?

४) 'आनुभविक संदर्भावर आधारीत प्रमुख बाबींचे तर्कशास्त्रीय परस्परावलंबी सामान्यीकरण म्हणजे सिद्धांत होय'' अशी सिद्धांताची व्याख्या कोणी केली आहे?

५) समाजशास्त्रातील सिद्धांत कसे मांडले जातात ?

६) समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये कोणत्या तीन बाबी महत्त्वपूर्ण मानण्यात आल्या?

७) संशोधनाची सामान्य व्याख्या कशी करता येईल?

८) संशोधन प्रक्रियेची प्रमुख उद्दिष्ट्ये कोणती आहेत ?

९) रॉबर्ट मर्टन यांनी सिद्धांत आणि संशोधन यातील सहसंबंध स्पष्ट करताना कोणत्या महत्त्वपूर्ण बाबींचा उल्लेख केला?

१०) समाजशास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून कशाचा अभ्यास करून त्याद्वारे सिद्धांत मांडले जातात?

## १.३ सारांश :

'प्रमुख समाजशास्त्रीय विचार प्रवाह' या एम.ए. भाग २ समाजशास्त्र सत्र ३ या पेपरमध्ये समाजशास्त्रीय सिद्धांत या प्रथम घटकात सिद्धांताचा अर्थ, स्वरूप, पैलू किंवा घटक तसेच समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रकार व कार्ये आणि सिद्धांत व संशोधन या दोहोतील परस्परसंबंध इ. उपघटकांचा अभ्यास केल्यानंतर या संदर्भात सारांश रूपात असे म्हणता येईल की, समाजशास्त्रीय सिद्धांतावर १८ व्या शतकातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा खूप प्रभाव पडला आहे.

सिद्धांत म्हणजे विविध घटनांच्यामधील आंतर संबंध स्पष्ट करणारे आणि त्यांची व्यवस्थित मांडणी किंवा क्रम लावणारे सूत्र होय. समाजशास्त्रीय सिद्धांतामुळे पूर्वकथन करता येते, तसेच दोन घटकातील परस्पर संबंधाबाबत निश्चित विधान करता येते. त्यामुळेच अशा समाजशास्त्रीय सिद्धांतांना महत्त्व निर्माण झाल्याचे दिसून येते.

समाजशास्त्रीय सिद्धांताच्या विविध व्याख्यांच्यावरून असे स्पष्ट होते की, समाजशास्त्रीय सिद्धांत ही संकल्पना बहुविध स्वरूपाची असून त्यासंबंधी निश्चित असे विधान करणे अवघड आहे. फ्रान्सीस अब्राहम यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांत ही एक प्रतिकात्मक रचना असून ती एक प्रकारची कल्पक अशी सिद्धी आहे. असे सिद्धांत सार्वत्रिक स्वरूपाचे असतात, तसेच ते अनुभव आणि वास्तवता यावर आधारीत असल्याने जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ असे निष्कर्ष काढणे शक्य होते. असे सिद्धांत विषय आकलनासाठी खूप उपयुक्त ठरतात. मात्र अशा सिद्धांताचे नवीन स्वरूपात परीक्षण करण्याची गरज असल्याबद्दल अनेकांनी विचार मांडले.

समाजशास्त्रीय सिद्धांताचा विस्तृत आढावा घेतल्यानंतर अशा सिद्धांताचे अनुभवनिष्ठता, सिद्धांतभिमूखता आणि परस्परावलंबन हे प्रमुख पैलू किंवा घटक आढळून येतात. तसेच अशा सिद्धांताचे अनेक विचारवंतांनी वेगवेगळे प्रकार कथन केले आहेत. त्याच बरोबर अनेक महत्त्वपूर्ण कार्ये विशद केली आहेत. त्यामध्ये नवीन अभ्यासाला चालना, संशोधनासाठी योग्य मार्गदर्शन, अनुभविक निष्कर्ष व सामान्य ज्ञान यामध्ये दुवा प्रस्थापित करणे, तसेच विषयाची सुव्यवस्थीत मांडणी इत्यादी कार्यांचा समावेश केला असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळेच डॉ. मॉरिस कोहेन यांनी अशा समाजशास्त्रीय सिद्धांतांना **चौकशीचे माध्यम किंवा साधन** असा उल्लेख केला. सिद्धांत आणि संशोधन यामधील परस्परसंबंध या शेवटच्या उपघटकामध्ये अनेक समाजशास्त्रज्ञांनी सिद्धांत आणि संशोधन हे एकमेकांवर अधिक प्रमाणात अवलंबून आहेत असे म्हटले आहे. याचा अर्थ समाजशास्त्रीय सिद्धांताची सुरूवात ही सामाजिक घटकांच्या अभ्यासातून होत असल्याने अशा सिद्धांतांची विश्वसनीयता सतत वाढत जाते. त्यामुळेच रॉबर्ट मर्टन यांनी या दोहोतील संबंध स्पष्ट करताना पुढील मत मांडले. त्यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांताची सुरूवात ही मुलत: सामाजिक घटनांच्या संशोधनातून होत

असते. अर्थातच अशा सिद्धांतांची विश्वसनीयता वाढत जाते. त्यामुळेच सिद्धांत आणि संशोधन यामध्ये सहसंबंध असल्याचे दिसून येते.

## १.४ पारिभाषिक संज्ञा :

**१) सावयवी सिद्धांत :** मानवी शरीर आणि समाजरचना यांच्यामधील साम्य स्पष्ट करण्यासाठी या संकल्पनेची निर्मिती.

**२) प्रत्यक्षवाद :** आधुनिकतेची जोड अथवा विज्ञान निष्ठतेला प्राधान्य.

**३) सुक्ष्मलक्षी आढावा :** अत्यंत बारकाईने केला जाणारा अभ्यास.

**४) अनुभवनिष्ठता :** संशोधकाला जे जे अनुभव येतात त्या आधारे घटनांचा अभ्यास.

**५) वस्तुनिष्ठता :** सत्य अथवा वास्तव स्थिती विचारात घेऊन केला जाणारा अभ्यास.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**१.२.१.१**

१) ऑगस्त कॉम्त

२) विज्ञानवाद किंवा प्रत्यक्षवाद

३) अनुभवनिष्ठता व वस्तुनिष्ठतेद्वारे

४) रुसो व माँटेस्क्यू

५) फ्रान्सीस अब्राहम

६) तर्कशास्त्रीय अंर्तसंबंधावर

७) थॉमस वॉर्ड

८) सार्वत्रिक परिस्थितीनुसार परिवर्तन, विज्ञाननिष्ठता, अनुभवानिष्ठतेवर आधारीत.

९) चार

१०) अनुभवनिष्ठ व सैद्धांतिक.

**१.२.२.१**

१) प्रमाणक आणि अप्रमाणक सिद्धांत

२) आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत.

३) हेल्मट वाग्नर

४) डॉन मार्टिन

५) हर्बर्ट स्पेन्सर

६) रॉबर्ट मर्टन, रॅडक्लिफ ब्राऊन

७) समाजाचे वास्तव, अनुभवनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ आकलन होते.

८) डॉ. मॉरिस कोहेन

९) संशोधनाला योग्य मार्गदर्शन, संशोधनाच्या फलनिष्पतीत वाढ, निष्कर्ष व सामान्य ज्ञान यामध्ये दुवा, विषयाची सुव्यवस्थित मांडणी.

१०) समाजाशास्त्रीय सिद्धांतामुळे.

**१.२.३.१**

१) सिद्धांत व संशोधन परस्पर संबध.

२) सामाजिक घटनांच्या अभ्यासातून अथवा संशोधनातून

३) रॉबर्ट मर्टन

४) टालकॉट पार्सन्स

५) घटनांची कार्यकारण मिमांसा करून तथ्यांच्या आधारे मांडले जातात.

६) औपचारिक पद्धत, वैज्ञानिक कसोटी आणि भविष्य कथन

७) ''नवीन तत्त्व शोधून काढणे, त्याची पुन:प्रचिती पाहणे आणि त्या तत्त्वाची सातत्याने चिकित्सा करणे म्हणजे संशोधन होय.''

८) सामान्यीकरण, सिद्धांत निर्मिती, ज्ञान कक्षा वाढविणे आणि उपलब्ध ज्ञानाची सत्यता पुन:प्रमाणित करणे.

९) कार्यकारण संबंधाचा शोध, वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग, सामाजिक घटनांचा अभ्यास आणि संख्यात्मक विश्लेषण.

१०) व्यक्तीचे वर्तन, आंतरक्रिया, समूह अथवा गटांच्या समस्या इ.चा अभ्यास.

## १.६ सरावासाठीचे प्रश्न :

१) समाजशास्त्रीय सिद्धांताचा अर्थ आणि त्याचे पैलू किंवा घटक थोडक्यात विशद करा.

२) समाजशास्त्रीय सिद्धांताचे विविध प्रकार स्पष्ट करा.

३) समाजशास्त्रीय सिद्धांताची विविध कार्ये अथवा त्याचे महत्त्व लिहा.

४) थोडक्यात उत्तरे लिहा.

अ) समाजशास्त्रीय सिद्धांताचे स्वरूप.

ब) समाजशास्त्रीय सिद्धांताचे प्रकार.

क) समाजशास्त्रीय सिद्धांताचे घटक किंवा पैलू

ड) सिद्धांत आणि संशोधन सह-संबंध.

## १.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके :


१. Aron Raymond - "Main Currents in Sociological Thoughts, Vol - I & II Pergain, 1965-67

२. Alexander, Jeffrey C : Twenty Lectures : Sociological theory since world war II, New York : Columbia University, Press 1987.

३. Collins Randall : Sociological Theory (Indian edition) Jaipur and New Delhi : Rawat Publication, 1997.

४. Coser, Lewis A : Masters of Sociological Thoughts 2nd Edition Rawat Publication.

५. George, Ritzer : Sociological Theory (International Editions 2000) New York : Mc Graw Hill 2000.

६. George, Ritzer : Classical Sociological Theory, 2nd Edition, Mc Graw Hill, 1996

७. Turner, Jonathon H : The structure of Sociological Theory : (4th Edition ) Jaipur and New Delhi, Rawat Publication. 1995.

८. Zeitlin, Irving M : Rethinking Sociology : A critique of contemporary theory (Indian Edition) Jaipur and New Delhi, Rawat Publication.

९. कुलकर्णी पी. के. : 'प्रगत समाजशास्त्रीय सिद्धांत' श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.

१०) वैद्य नी. स. : समाजशास्त्रीय विचारपरंपरा.

११) आगलावे प्रदीप : श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

१२) तोष्णीवाल, एस्. आर : उच्चतर समाजशास्त्रीय सिद्धांत, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुलै २००१.


❖❖❖

## घटक – २

# प्रकार्यवाद

## (Functionalism)

**घटक संरचना :**

२.०. उद्दिष्ट्ये

२.१. प्रास्ताविक

२.२. विषय विवेचन

२.२.१ प्रकार्यवाद : बौद्धिक पाळेमुळे आणि आधार

२.२.२ टालकॉट पार्सन्स : क्रिया व्यवस्था, प्रतिमान चल, एजीआयएल आणि सामाजिक परिवर्तन

२.२.३ रॉबर्ट मर्टनचे प्रकार्यात्मक विश्लेषणाचे संहितीकरण

२.२.४ प्रकार्यवाद : प्रमुख टीका.

२.३. सारांश

२.४. पारिभाषिक संज्ञा

२.५. स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६. स्वाध्याय (सरावासाठीचे प्रश्न)

२.७. अधिक अभ्यासासाठी संदर्भग्रंथ

### **२.० उद्दिष्टे** (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास :

- प्रकार्यवादाची बौद्धिक मुळे व आधार समजावून घेता येतील.
- टालकॉट पार्सन्सचे क्रिया व्यवस्था, प्रतिमान परिवर्त्ये, एजीआयएल (AGIL) सामाजिक परिवर्तन याविषयीचे विचार स्पष्ट करता येतील.
- राबर्ट मर्टनचे प्रकार्यवादी विश्लेषणाचे संहितीकरण विशद करता येईल.
- प्रकार्यवादावरील प्रमुख टीकांचे आकलन होईल.

## २.१ प्रास्ताविक (Introduction)

या घटकात तुम्ही प्रकार्यवाद (Functionalism) या समाजशास्त्रीय सिद्धांताचा अभ्यास करणार आहात. समाजशास्त्र हे एक सामान्य सामाजिक विज्ञान (General Social Science) असून त्यामध्ये समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो. समाजाचा वैज्ञानिक अभ्यास करताना समाजशास्त्रज्ञांनी विविध सिद्धांत प्रतिपादन केलेले आहेत. उदा. उत्क्रांतीवादी सिद्धांत, संघर्ष सिद्धांत, प्रतिकात्मक आंतरक्रियावादी सिद्धांत, प्रघटनावादी सिद्धांत, विनिमय सिद्धांत, संरचनावादी सिद्धांत इत्यादी. प्रकार्यवाद हा देखील असाच एक सिद्धांत आहे. या घटकात (प्रकरणात) तुम्ही प्रकार्यवादी सिद्धांताचे स्वरुप समजावून घेणार आहात.

## २.२ विषय विवेचन (Presentation of Subject matter)

प्रास्ताविकेत म्हटल्याप्रमाणे या दुसऱ्या घटकात तुम्ही प्रकार्यवाद या सिद्धांताचे स्वरुप समजावून घेणार आहात. विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे चार विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात प्रकार्यवादाची बौद्धिक पाळेमुळे व आधार यांची चर्चा करण्यात येईल. दुसऱ्या विभागात प्रकार्यवादी सिद्धांताच्या संदर्भात टालकॉट पार्सन्स् यांनी मांडलेल्या क्रिया व्यवस्था, प्रतिमान परिवर्त्ये, एजीआयएल आणि सामाजिक परिवर्तन या संकल्पनांचे विवेचन करण्यात येईल. तिसऱ्या विभागात रॉबर्ट मर्टनचे प्रकार्यात्मक विश्लेषणाचे संहितीकरण याविषयीचे विचार स्पष्ट करण्यात येतील, तर चौथ्या विभागात प्रकार्यवादावर करण्यात येणाऱ्या प्रमुख टीका स्पष्ट करण्यात येतील.

### २.२.१ प्रकार्यवाद : बौद्धिक पाळेमुळे आणि आधार किंवा गृहितके (Functionalism : Intellectual Roots and Premises)

प्रकार्यवाद हा समाजशास्त्रातील एक महत्त्वाचा सिद्धांत असून तो साधारणतः १९२० नंतर समाजशास्त्रात उदयास आला आणि १९४० च्या व १९५० च्या दशकात समाजशास्त्रज्ञांमध्ये विशेषतः अमेरिकन समाजशास्त्रांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरला. किंग्जले डेव्हिस यांनी असे नमूद केले आहे की, समाजशास्त्रीय वाङमयातील १/४ भाग हा प्रकार्यवादी सिद्धांताने व्यापलेला आहे. १९५० च्या अगोदर अमेरिकन समाजशास्त्रांमध्ये अशी धारणा निर्माण झाली होती की, जोपर्यंत एखादा समाजशास्त्रज्ञ प्रकार्यवादावर आपले विचार मांडत नाही किंवा प्रकार्यात्मकदृष्टीने समाजाचे अध्ययन करीत नाही तोपर्यंत तो नामांकित समाजशास्त्रज्ञ ठरत नाही. १९५० नंतर मात्र हळूहळू प्रकार्यवादाच्या लोकप्रियतेचा ऱ्हास होत गेला आणि आज त्याचा कोणीही पुरस्कर्ता राहिलेला नाही. मात्र प्रकार्यवादाच्या जागी नव-प्रकार्यवाद (Neo-functionalism) उदयास आलेला आहे.

या ठिकाणी आपण सर्वप्रथम प्रकार्यवादाची बौद्धिक पाळेमुळे व आधार किंवा गृहितके (premises) अभ्यासणार आहोत. त्यासाठी प्रथम प्रकार्यवाद म्हणजे काय व प्रकार्यवादाचे सामान्य स्वरुप काय आहे हे थोडक्यात समजावून घेऊ या.

**❖ प्रकार्यवादाचा अर्थ –**

प्रकार्यवाद हा एखाद्या बहुरुपी व्यक्तीसारखा आहे ज्याची विविध रुपे किंवा प्रकार आहेत. उदा. सावयवी

प्रकार्यवाद, समाजशास्त्रीय प्रकार्यवाद इत्यादी. तसेच प्रकार्यवादी सिद्धांत हा संरचनात्मक सिद्धांत (Structural Functional theory) सामाजिक व्यवस्था सिद्धांत (Social system theory), समतोलाचा किंवा संतुलनाचा सिद्धांत (Equilibrium theory) इत्यादी नावाने देखील ओळखला जातो. त्यामुळे प्रकार्यवादाचा नेमका अर्थ स्पष्ट करणे अवघड जाते.

असे असले तरी सर्वच प्रकार्यवाद्यांचे कांही निश्चित मुद्यांवर एकमत आहे व त्याआधारे आपणास प्रकार्यवादाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येतो.

१) समाज ही परस्परसंबंधित व परस्परावलंबी संतुलीत अशी अनेक भागांची (parts) मिळून बनलेली व्यवस्था (Equilibrium system) असून या व्यवस्थेतील प्रत्येक भाग हा समाजाची कोणती ना कोणती तरी गरज भागविण्याचे कार्य (Function) पार पाडीत असतो व त्यामुळे समाजाचे अस्तित्त्व, सातत्य व संतुलन प्रतिकूल परिस्थितीतही टिकून राहते, असे प्रतिपादन करणारा सिद्धांत म्हणजे प्रकार्यवाद होय.

२) **विल्यम स्कॉट** यांनी प्रकार्यवादाचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे. ''सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेमध्ये सामाजिक व सांस्कृतिक घटना जी कार्ये पार पाडतात, त्या कार्याच्या संदर्भात त्यांचे केलेले विश्लेषण म्हणजे प्रकार्यवाद होय. प्रकार्यवादात समाज ही परस्परसंबंधित असलेल्या विविध भागांची एक व्यवस्था आहे, अशी कल्पना केली जाते व या व्यवस्थेतील कोणताही एक भाग समष्टीपासून अलग करुन समजावून घेतला जाऊ शकत नाही. कोणत्याही एका भागात बदल झाल्यास त्या बदलामुळे कांही प्रमाणात असंतुलन (असमतोल) निर्माण होते व त्याचा परिणाम म्हणून व्यवस्थेच्या इतर भागांमध्येही बदल होतात आणि संपूर्ण व्यवस्थेचे कांही प्रमाणात पुनर्संघटन घडून येते.''

### ❖ प्रकार्यवादाचे समान्य स्वरुप –

प्रकार्यवादाचा पुरस्कार विविध शास्त्रज्ञांनी केलेला असून त्यांनी प्रकार्यवादाचे स्वरुप विविध तऱ्हेने स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे प्रकार्यवादाचे नेमके स्वरुप स्पष्ट करण्यात अडचणी येतात. तथापि, प्रकार्यवादाचे सामान्य स्वरुप आपणास पुढीलप्रमाणे थोडक्यात स्पष्ट करता येते.

समाजाचे पद्धतशीर व वैज्ञानिक दृष्टिकोनातून अध्ययन करण्यासाठी समाज ही एक संरचना किंवा व्यवस्था असून त्या संरचनेद्वारे किंवा व्यवस्थेद्वारे निश्चित अशी काही कार्ये पार पाडली जातात, या मुद्यापासून सुरुवात केली पाहिजे असे प्रकार्यवादी शास्त्रज्ञ म्हणतात. समाज ही एक व्यवस्था आहे व एक व्यवस्था म्हणून समाज आपले अस्तित्त्व सातत्याने कसे कायम टिकवून ठेवतो, समजात सातत्य कसे राहाते ही प्रकार्यवादी शास्त्रज्ञांपुढील प्रमुख समस्या आहे. या समस्येच्या निराकरणार्थ प्रकार्यवादी शास्त्रज्ञ पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देतात.

समाजाचा अभ्यास करताना समाजाचे विविध भाग असून ते परस्परसंबंधीत व परस्परावलंबी असल्याने समाजात एक प्रकारची व्यवस्था निर्माण होते हे लक्षात घेतले पाहिजे. या व्यवस्थेमुळेच सामाजिक जीवनात विशिष्ट स्वरुपाची सुव्यवस्था, (order) स्थिरता (constancy), सुसंगती (consistancy), संतुलन (Equilibrium) निर्माण होते. समाजातील विविध व्यक्ती, समुह, संस्था, संघटना, नियमने व मुल्ये हे समाजाच्या व्यवस्थेचे भाग

असून त्यांच्यामध्ये निश्चित असे परस्परसंबंध असतात. या प्रत्येक भागास विशिष्ट असे अपेक्षित कार्य असते. व प्रत्येक भागाचे हे अपेक्षित कार्य इतर भागांच्या कार्यांना व संपूर्ण समाजाच्या कार्याला पोषक व पूरक असे असते. समाजाच्या विविध भागांच्या कार्यात सुसंगती असते. त्यामुळे समाजाची उद्दिष्टे वा हेतू साध्य होतात, समाजाच्या गरजांची पूर्तता होते व त्यामुळे समाजव्यवस्था टिकून राहाते. अशाप्रकारे समाजाचे विविध भाग आपापली कार्ये सुरळीतपणे पार पाडतात, त्यामुळे समाजाच्या गरजांची पूर्तता होते. परिणामी, समजाचे अस्तित्त्व व सातत्य टिकून राहाते. समाजव्यवस्थेच्या विविध भागांच्या कार्यांना महत्त्व देवून समाजाचा अभ्यास करणाऱ्या या सिद्धांतास प्रकार्यवाद म्हणतात.

थोडक्यात प्रकार्यवादी सिद्धांतानुसार समाज ही परस्परसंबंधीत व परस्परावलंबी असलेल्या विविध भागांची एक संघटीत व्यवस्था आहे. या व्यवस्थेच्या कांही गरजा आहेत. या गरजांची पद्धतशीरपणे पूर्तता झाली तरच समाजाचे अस्तित्त्व व सातत्य टिकून राहाते. समाजव्यवस्थेच्या प्रत्येक भागाचे निश्चित असे एक कार्य असते; व त्याचे हे कार्य समाजाची कोणती तरी गरज पूर्ण करते. सर्व भागांनी आपापली कार्ये पार पाडल्याने समाजाच्या सर्व गरजांची पूर्तता होते व समाजाचे अस्तित्व प्रतिकूल परिस्थितीतही सातत्याने टिकून राहाते.

या ठिकाणी Function या इंग्रजी शब्दासाठी 'प्रकार्य' हा जो मराठी शब्द वापरलेला आहे, त्यास एक निश्चित अर्थ असून तो अर्थ व्यवहारातील अर्थाहून भिन्न आहे. रॉबर्ट मर्टन यांनी Function शब्दाचे वेगवेगळे पाच अर्थ सांगितलेले आहेत.

१) Function म्हणजे एखादी सार्वजनिक सभा, सण, उत्सव होय. उदा. आपण म्हणतो की उद्याच्या Function मध्ये कुलगुरु प्रमुख पाहुणे आहेत. येथे Function म्हणजे कार्यक्रम (Programme) असा अर्थ होतो.

२) Function म्हणजे विविध व्यावसायिकांचे (work) कार्य होय. उदा. कामगाराचे कार्य, व्यवस्थापकाचे कार्य इत्यादी.

३) Function म्हणजे कृती (activities) होय. उदा. राज्यपालाचे कार्य,

४) Function म्हणजे विविध घटकांमधील परस्परसंबंध (relationship among variables) होय. उदा. विविध घटकामध्ये कार्यात्मक स्वावलंबन (functional dependence) असते.

५) Function म्हणजे समाजव्यवस्था टिकून राहण्यासाठी पार पाडले जाणारे कार्य म्हणजेच विधायक कार्य होय. या विधायक कार्यासच समाजशास्त्रीय भाषेत प्रकार्य असे म्हणतात.

वरील पाच अर्थापैकी पाचव्या प्रकारच्या अर्थाने Function हा शब्द प्रकार्यवादात वापरला जातो. थोडक्यात समाजव्यवस्था टिकून राहण्यासाठी तिच्या भागाकडून/घटकाकडून दिले जाणारे योगदान म्हणजे त्या भागाचे/घटकाचे प्रकार्य होय असा प्रकार्याचा अर्थ आहे.

## ❖ **प्रकार्यवादाची पाळेमुळे** (Roots of Functionalism)

प्रकार्यवादाचा अर्थ व सामान्य स्वरूप समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही प्रकार्यवादाची बौद्धिक पाळेमूळे अभ्यासणार आहात.

प्रकार्यवाद सिद्धांत हा उत्क्रांतीवादी सिद्धांतास विरोध करण्याच्या भूमिकेतून पुढे आला असे मानले जाते. १९ व्या शतकात समाज, सामाजिक संस्था यांच्या अभ्यासासाठी उत्क्रांतीवादी सिद्धांत मांडला गेला. समाज तसेच सामाजिक संस्था ह्या साध्या अवस्थेकडून संकीर्ण अवस्थेकडे हळुहळू व टप्प्याटप्प्याने (विविध अवस्थांमधून) उत्क्रांत होत आलेल्या आहेत असे विचार समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञ यांनी १८६० ते १९२० या कालावधीत मांडले. या विचारांनाच स्थुलमानाने उत्क्रांतीवादी सिद्धांत (Evolution The ory) असे म्हणतात. १९२० नंतर मात्र उत्क्रांतीवादातील दोष, उणिवा, अडचणी अभ्यासकांच्या लक्षात आल्याने हा सिद्धांत मागे पडला. आणि समाजाच्या वैज्ञानिक अभ्यासासाठी प्रकार्यवादी सिद्धांत अधिक उपयुक्त मानला जाऊ लागला. विशेषतः अमेरिकन समाजशास्त्रज्ञांमध्ये हा सिद्धांत अत्यंत लोकप्रिय झाला. टालकॉट पार्न्सन्स, रॉबर्ट मर्टन, किंग्जले डेव्हिस, इत्यादी अमेरिकन समाजशास्त्रज्ञ व रॅडक्लिफ ब्राऊन(ब्रिटिश) व ब्रोनिस्लॉ मॅलिनोस्की हे सामाजिक मानवशास्त्रज्ञ प्रकार्यवादाचे प्रमुख पुरस्कर्ते मानले जातात.

प्रकार्यवादी सिद्धांत हा जरी १९२० नंतर जोरदारपणे पुरस्कृत केला गेला असला तरी त्याची बौद्धिक पाळेमुळे ही ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर, डुरखीम, पॅरेतो, या अभिजात समाजशास्त्रज्ञांच्या विचारात दिसून येतात. त्यांच्याही पूर्वी प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ चार्लस् डार्विन याच्याही विचारात प्रकार्यवादाचे दर्शन होते. प्रारंभीच्या या शास्त्रज्ञांनी मानव समाजास जीवस्वरूप मानले व त्यानुसार प्रकार्यवादाचे विवेचन केले. सजीवाचे शरीर ही एक संरचना (शरीरसंरचना) किंवा शरिरव्यवस्था आहे. ही शरीरव्यवस्था अनेक अंगांची किंवा इंद्रियांची किंवा अवयवाची मिळून बनलेली आहे. हे अवयव परस्परसंबंधीत व परस्परावलंबी आहेत. तसेच प्रत्येक अवयवाचे विशिष्ट असे कार्य आहे व प्रत्येक अवयवाने आपापले कार्य पार पाडले की शरीराच्या गरजांची पूर्तता होते व शरीराचे अस्तित्त्व टिकून राहाते. समाज हा देखील सजीवाच्या शरीराप्रमाणेच आहे. समाज ही एक व्यवस्था असून ती अनेक भागांची ( उदा. समूह, संस्था, संघटना इ. नी) मिळून बनलेली आहे. हे भाग परस्परसंबंधित व परस्परावलंबी आहेत. तसेच या प्रत्येक भागाचे विशिष्ट असे कार्य आहे व या प्रत्येक भागाने आपापले कार्य पार पाडले की समाजाच्या गरजांची पूर्तता होते व समाजाचे अस्तित्त्व टिकून राहते. अशा या सिद्धांतास सावयवी प्रकार्यवाद असे म्हणतात.

अर्थात सावयवी प्रकार्यवादाची पाळेमूळे ही अत्यंत प्राचीन आहेत. प्राचीन भारतीय ऋषींनी चातुर्वर्ण व्यवस्थेचे वर्णन करताना समाजास पुरुष मानले. ऋग्वेदातील एका ऋचेत असे म्हटले आहे की 'विराट पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहुपासून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य व पायापासून शुद्र निर्माण झाले.' समाजजीवनाच्या अस्तित्त्वासाठी आवश्यक असलेली प्रमुख कार्ये पार पाडण्यासाठी निर्मात्याने चार वर्ण निर्माण केलेले आहेत. हे चार वर्ण परस्परसंबंधीत, परस्परावलंबी व परस्परपुरक कार्ये पार पाडणारे आहेत.

पाश्चिमात्त्य विचारातही ऑगस्त कॉम्टच्या पूर्वीच सावयवी प्रकार्यवादाची कल्पना प्रचलित असल्याचे आढळते.

या ठिकाणी आपण प्रकार्यवादाची पाळेमुळे ज्या प्रमुख विद्वानांच्या विचारात आहेत त्यांचा थोडक्यात परिचय करून घेऊ या.

**१) चालर्स डार्विन :**

या ब्रिटिश जीवशास्त्रज्ञाने १८५९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आपल्या On the Origin of Species या ग्रंथात जीवांचा विकास हा साध्या अवस्थेकडून गुंतागूतीच्या अवस्थेकडे हळुहळू झाला असा सिद्धांत मांडला. या सिद्धांतालाच उत्क्रांतीवादाचा सिद्धांत (Theory of Evolution) असे म्हणतात. डार्विनने असेही प्रतिपादन केले की, आनुवंशिकता व परिस्थिती यांच्या आधारे प्रत्येक जीव हा आपले अस्तित्त्व व सातत्य टिकविण्याचा प्रयत्न करतो. जीवांचा विकास वा उत्क्रांती ही संरचनात्मक-कार्यात्मक पद्धतीने झाला असे डार्विनने प्रतिवादन केले. त्याच्या या प्रतिपादनात प्रकार्यवाद्याचे मूळ आहे.

**२) ऑगस्त कॉम्ट (१७९८-१८५७) -**

प्रकार्यवादाचे मूळ हे समाजशास्त्राचा जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऑगस्त कॉम्टच्या विचारातही आढळते. कॉम्टच्या काळात फ्रेंच राज्यक्रांतीमुळे (१६८९) फ्रान्ससह संपूर्ण युरोपमध्ये अशांतता व अव्यवस्था निर्माण झाली होती. त्यामुळे लोकांचे प्रचंड हाल होत होते. अशा स्थितीत कॉम्टला असे वाटू लागले की, समाजात सुव्यवस्था निर्माण झाली पाहिजे म्हणजे लोकांना आपली उद्दिष्टे साध्य करता येतील. अशी सुव्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी लोकांमध्ये बंधुभाव, ऐक्य निर्माण झाले पाहिजे. कॉम्टच्या या विचारातूनच प्रकार्यवादाचा प्रारंभ झाला. क्रॉम्टने सावयवी म्हणजेच सजीव व समाज यांना समान स्तरावर ठेवले. ज्याप्रमाणे सजीवाच्या शरीराचे विविध अवयव, इंद्रिये वा अंगे ही प्रकार्यात्मकदृष्टीने परस्परांशी जोडलेले असतात. त्याप्रमाणेच समाजाचीही विविध अंगे (भाग किंवा घटक) ही त्यांच्या प्रकार्याद्वारे परस्परांशी जोडलेली असतात. कॉम्टने समाजातील प्रत्येक सामाजिक संस्थेच्या कार्याचा विचार हा संपूर्ण समाजव्यवस्थेच्या संदर्भात केला. थोडक्यात कॉम्टच्या विचारानुसार प्रकार्यवाद हा एक प्रकारचा सावयववाद (organism) आहे.

**३) हर्बर्ट स्पेन्सर (१८२० ते १९०३) :**

डार्विनच्या जैविक उत्क्रांतीवादाचा प्रभाव स्पेन्सरवर पडला व त्याने उत्क्रांतीचा सिद्धांत हा समाजासह सर्व घटकांना (असेंद्रीय, सेंद्रीय व अतिसेंद्रीय घटकांना) लागू केला. त्याच्या मते, मानव समाज हा सजीवाप्रमाणेच अनिश्चित, असंबंद्ध अशा एकजिनसीपणाकडून सापेक्षतः निश्चित, सुसंबद्ध अशा बहुजिनसीपणाकडे हळुहळू उत्क्रांत होत आलेला आहे. स्पेन्सरने समाजाविषयीचा सेंद्रीय सिद्धांत (organic theory of society) मांडला. त्याच्या मते, समाज हा सजीवाच्या शरीरासारखा आहे. सजीवाचे शरीर हे विविध अवयवांनी बनलेले असते व ते अवयव परस्परावलंबी असतात. शरीर जिवंत राहावे म्हणून शरीराचा प्रत्येक अवयव निश्चित असे प्रकार्य पार पाडीत असतो, शरीर टिकून राहावे म्ळणून कांहीतरी योगदान देत असतो. स्पेन्सर म्हणतो. समाजही असाच सजीवाच्या शरीरासारखा आहे. समाज हा अनेक घटकांचा/भागांचा मिळून बनलेला आहे. सामाजिक समूह, संस्था, संघटना, मंडळे, नियमने, प्रथा इत्यादी हे समाजाचे भाग आहेत. हे भाग परस्परसंबंधित व परस्परावलंबी

आहेत. यातील प्रत्येक भाग समाजाचे अस्तित्त्व टिकावे म्हणून निश्चित असे प्रकार्य पार पाडीत असतो, कांहीतरी योगदान देत असतो. स्पेन्सरने असेही प्रतिपादन केले की, उत्क्रांतीच्या प्रारंभीच्या अवस्थेत शरीराची अंगे परस्परांशी एकरुप झालेली असतात, त्यांना परस्परांपासून अलग करता येत नाही. मात्र उत्क्रांतीची प्रक्रिया जसजसी पुढे जाते तसतसे शरीराची अंगे ही अलग अलग होतात. एक अंग दुसऱ्याचे प्रकार्य पार पाडू शकत नाही. समाजाचेही असेच आहे. समाजाच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या प्रारंभिक अवस्थेत समाजाची विविध अंगे (उदा. कुटूंब, धर्म, राज्य इ.) ही परस्परांशी एकरुप झालेली असतात, त्यांना परस्परांपासून अलग करता येत नाही. मात्र समाजाची उत्क्रांती जसजसी पुढे जाते तसतसे ही अंगे अलगअलग होतात. एक अंग दुसऱ्याचे प्रकार्य पार पाडू शकत नाही. उदा. आजच्या संकीर्ण व बहुजिनसी समाजात कुटुंबसंस्था, राज्यसंस्थेचे वा शिक्षणसंस्थेचे प्रकार्य पार पाडू शकत नाही. तथापि, शरीराच्या अंगाप्रमाणे समाजाच्या अंगातही कार्यात्मक संबंध (functional relationship) असतो. अशाप्रकारे स्पेन्सरने मांडलेला सामाजिक उत्क्रांतीवाद व समाजाचा सेंद्रिय सिद्धांत यामध्ये प्रकार्यवादाचे मूळ आढळते. म्हणूनच स्पेन्सरला **प्रकार्यवादाचा जनक** म्हणतात.

**४) एमिल डुरखीम (१८५८ ते १९१७) :**

समाजशास्त्रीय प्रकार्यवादाचा जनक म्हणून जरी स्पेन्सरला ओळखले जात असले तरी समाजशास्त्रात प्रकार्यवादाचा खरा विकास घडवून आणण्याचे कार्य डुर्खीमने केले. त्याने सर्वप्रथम प्रकार्यवाद ही संकल्पना समजाच्या वैज्ञानिक अभ्यासास लागू केली. डुर्खीमच्या मते, समाजशास्त्रात सामाजिक तथ्यांचा (social facts) अभ्यास होतो. सामाजिक एकता, श्रमविभाजन, आत्महत्या, धर्म, ज्ञान, मुल्ये, विचार, इत्यादींचे विश्लेषण त्याने सामाजिक तथ्याच्या संकल्पनेच्या आधारेच केले आहे. त्याने सामाजिक तथ्यांचे १) सर्वसामान्य (Normal) सामाजिक तथ्ये व २) विकृतीशास्त्रीय (Pathological) सामाजिक तथ्ये असे दोन प्रकार पाडले आहेत. त्यापैकी सर्वसामान्य सामाजिक तथ्ये ही समाजाचे संघटन करण्याचे, समाजात एकता निर्माण करण्याचे प्रकार्य पार पाडतात असे डुर्खीम म्हणतो. डुर्खीम श्रमविभाजन, कुटुंब, धर्म इत्यादी सामाजिक संस्थांना सामाजिक तथ्ये मानतो. या सामाजिक संस्था समाजात ऐक्य (Solidarity) निर्माण करण्याचे प्रकार्य कशा पार पाडतात याचे त्याने विश्लेषण केले आहे. Division of Labour in Society (1893) या आपल्या ग्रंथात डुर्खीमने सामाजिक तथ्याचे प्रकार्यात्मक विश्लेषण केले आहे. तो म्हणतो, समाजाच्या काही प्रकार्यात्मक पूर्वावश्यकता (functional pre-requisities) आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाची पूर्वावश्यकता म्हणजे समाजातील विभिन्न घटकांमध्ये (व्यक्ति व समूहांत) सामाजिक ऐक्य निर्माण करुन समाजाची व्यवस्था टिकवून ठेवणे ही आहे. श्रमविभाजन ही पूर्वावश्यकता पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडते. श्रमविभाजनाने समाजाच्या विविध गरजा पूर्ण करण्याच्या कार्यांचे वाटप विविध व्यक्ती व समूहांत होते. विशिष्ट व्यक्ती वा समुह हा विशिष्ट कार्य पार पाडतो. म्हणजेच श्रमविभाजनामुळे समाजात विभेदीकरण होते. तथापि, त्यामुळे समाजातील विविध व्यक्ती व समूह हे आपल्या विविध गरजांच्या पूर्ततेसाठी परस्परांवर अवलंबून राहतात व त्यामुळे ते परस्परांना सहकार्य करतात, त्यांच्यात परस्परसंबंध निर्माण होतात व यातूनच त्यांच्यात सामाजिक ऐक्य निर्माण होते. अशाप्रकारे श्रमविभाजन लोकांत व समूहात ऐक्य निर्माण करते व त्यामुळे समाजव्यवस्था टिकून राहते. डुर्खीमने यांत्रिक एकता व सेंद्रिय एकता यातील फरक प्रकार्यात्मक दृष्टीकोनातून दाखविलेला आहे.

डुर्खीमने त्याच्या "The Elementary Forms of Religious Life" (१९१२) या ग्रंथात देखील धर्माचे प्रकार्यात्मक दृष्टीकोनातून विवेचन केलेले आहे. ऑस्ट्रेलियातील 'अरुंटा' या आदिम जमातीतील देवकप्रथेचे (Totemism) अध्ययन करुन डुर्खीमने असा निष्कर्ष काढला आहे की, धर्म हा सामाजिक ऐक्य निर्माण करतो, ते ऐक्य मजबूत करतो व कायम टिकवून ठेवतो. भिन्न भिन्न इच्छा-आकांक्षा, हितसंबंध, गरजा असणाऱ्या लोकांना धर्म समान श्रद्धा (विश्वास), विधी (कर्मकांड), संस्कार, दृष्टिकोन इत्यादी पुरवितो व या गोष्टी लोकांनी आत्मसात कराव्यात अशी शिकवण देतो. परिणामी समान श्रद्धा व दृष्टीकोन बाळगणाऱ्या व समान विधी व संस्कार कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या लोकांमध्ये मानसिक ऐक्य निर्माण होते व यातूनच सामाजिक ऐक्याची निर्मिती होते. थोडक्यात धर्म हा समाजातील लोकांना एकतेच्या सुत्रात बांधण्याचे प्रकार्य पार पाडतो.

आपल्या आत्महत्या (Lee Suicide) (१८९७) या ग्रंथातही डुर्खीमचा प्रकार्यवादी दृष्टिकोन दिसून येतो. तो म्हणतो, आपल्या सदस्यांमध्ये प्रेम, सहकार्य, परस्परावलंबन, सहानुभूती निर्माण करण्याचे प्रकार्य कुटूंब पार पाडते व या भावनांच्या आधारावरच सर्व सदस्यांना एका सूत्रात बांधून ठेवते. जे कुटूंब हे प्रकार्य यशस्वीपणे पार पाडू शकत नाही, त्याचे सदस्य आत्महत्या करण्याची अधिक शक्यता असते.

अशाप्रकारे विविध सामाजिक तथ्यांच्या संदर्भात डुर्खीमने प्रकार्यवादी सिद्धांत स्पष्ट केलेला आहे.

**५) मॅलिनोस्की आणि ब्राऊन –**

प्रसिद्ध सामाजिक मानवशास्त्रज्ञ ब्रोनिस्ला मॅलिनोस्की आणि रॅडाक्लिफ ब्राऊन यांनीही प्रकार्यवादाचा पुरस्कार केला. मॅलिनोस्कीने पॅसिफिक महासागरातील ट्रॉब्रिआंड बेटावरील आदिम जमातीचा क्षेत्रकार्य पद्धतीद्वारे अभ्यास केला. या जमातीत 'कुल' या नावाने प्रचलित असलेल्या ''विविध वस्तू एकमेकांस भेट देण्याच्या व घेण्याच्या पद्धतीचे'' सामाजिक जीवनाच्या विविध अंगावर (उदा. धर्म, आप्तसंबंध, कलाकौशल्ये, कायदा, व्यापार इ.) काय परिणाम होतात याचे स्पष्टीकरण केले आणि या जमातीत कुलाचे प्रकार्य काय आहे हे दाखवून दिले. मॅलिनोस्कीने संस्कृती किंवा सांस्कृतिक व्यवस्थेचा प्रकार्यात्मक दृष्टीने अभ्यास केला. तो संस्कृतीस मानवाच्या गरजापूर्तीचे साधन मानतो. तो म्हणतो, प्रत्येक समाजाची स्वतःची अशी एक संस्कृती असते. ही संस्कृती अनेक घटकांची मिळून बनलेली असते. हे सर्व घटक परस्पर संबंधित व परस्परावलंबी असतात. प्रत्येक घटकास निश्चित असे प्रकार्य असते. म्हणजेच संस्कृतीमधील प्रत्येक घटक मानवाची कोणती ना कोणती गरज पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडीत असतो. जोपर्यंत एखादा घटक त्याचे प्रकार्य पार पाडीत राहतो, तोपर्यंत त्याचे त्या संस्कृतीत अस्तित्व टिकून असते. मात्र जेव्हा एखाद्या घटकाचे मानवाच्या गरजापूर्तीच्या दृष्टीने असलेले प्रकार्य संपुष्टात येते, तेव्हा त्या घटकाचे अस्तित्त्व ही धोक्यात येते. उदा. पूर्वी धनुष्यबाण हा सांस्कृतिक घटक मानवाच्या संरक्षणाची गरज पूर्ण करीत असे. आज संरक्षणाची अद्ययावत साधने निर्माण झाल्याने धनुष्यबाणाचे संरक्षणाच्या दृष्टीने असलेले महत्त्व संपुष्टात आलेले आहे. त्यामुळे आधुनिक संस्कृतीत धनुष्यबाणाचे अस्तित्त्व धोक्यात आलेले आहे. पुढे मॅलिनोस्की असेही म्हणतो की, ज्याप्रमाणे मानवाच्या विविध गरजा परस्परसंबंधित आहेत, त्याचप्रमाणे विविध गरजा भागविणारे सांस्कृतिक घटक हे ही स्वतंत्र नसून परस्परसंबंधित आहेत. त्यांच्यात प्रकार्यात्मक संबंध (Functional relations) आहेत. एका घटकाचे प्रकार्य हे दुसऱ्याच्या प्रकार्याशी संबंधित आहे. कोणताही घटक इतर घटकांशिवाय आपले प्रकार्य पार पाडू शकत नाही. उदा. 'पेन' हा एक

सांस्कृतिक घटक आहे. तो मानवाची 'लेखन' ही गरज पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडतो. मात्र त्याचे हे प्रकार्य 'कागद' या दुसऱ्या सांस्कृतिक घटकाशी संबंधित आहे. कागद नसेल तर पेन या घटकास आपले प्रकार्य पार पाडता येत नाही. याउलट पेन नसेल तर कागदाच्या अस्तित्त्वासही कांही अर्थ असत नाही. अशाप्रकारे संस्कृतीच्या विविध घटकात अर्थपूर्ण असे प्रकार्यात्मक संबंध असतात. मॅलिनोस्की म्हणतो की, समाजाचे यथार्थ अध्ययन करण्यासाठी त्याच्या संस्कृतीमध्ये असलेली संघटित एकता (integrated unity) टिकविण्यासाठी तिचा प्रत्येक घटक कोणते प्रकार्य पार पाडतो हे समजावून घ्यावे लागते. प्रत्येक समाजाच्या संस्कृतीचे बाह्य रुप हे इतर समाजाच्या संस्कृतीहून भिन्न असते. पण संस्कृतीचे मूलभूत कार्य हे मात्र सर्व समाजात समानच आहे व ते म्हणजे मानवाच्या गरजा भागविण्याचे प्रकार्य पार पाडणे हे होय. अशाप्रकारे मॅलिनोस्कीने आपले प्रकार्यवादी विचार मांडलेले आहेत.

मॅलिनोस्कीप्रमाणेच ब्राऊन यांचे विचार आहेत. ब्राऊनने अंदमान बेटावरील आदिवासींचा क्षेत्रकार्य पद्धतीने अभ्यास केला व त्याआधारे आपला प्रकार्यवादी दृष्टिकोन स्पष्ट केला. ब्राऊनने आपल्या प्रकार्यवादी विचारात समाजाच्या संकल्पनेस केंद्रीय स्थान दिले आहे. त्याने सावयवी व समाज यांच्यातील साम्य मानलेले आहे. ते म्हणतात, समाज हा सावयवासारखा आहे. सावयवीचा प्रत्येक भाग वा घटक सावयवाची कोणती ना कोणती गरज पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडीत असतो. समाज ही असाच आहे. त्याच्या संस्कृतीतील प्रत्येक घटक समाजाची कोणती तरी गरज पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडीत असतो. ''संस्कृतीचा एखादा घटक संपूर्ण सामाजिक जीवनात जी भूमिका बजावतो व त्यामुळे समाजाचे संरचनात्मक सातत्य टिकविण्यासाठी जी मदत करतो त्याला त्या घटकाचे प्रकार्य असे म्हणतात.'' अशी ब्राऊनने प्रकार्याची व्याख्या दिलेली आहे. १९५२ मध्ये प्रकाशित केलेल्या "Structure and Function in a Primitive Society" या आपल्या ग्रंथात ब्राऊन म्हणतात की, प्रकार्याच्या संकल्पनेत संरचनेची संकल्पना अंतर्भूत आहे. विविध घटकांमध्ये असलेल्या परस्परसंबंधांच्या व्यवस्थेस संरचना म्हणतात आणि या संरचनेचे सातत्य हे या घटकांनी पार पाडावयाच्या प्रकार्यावर अवलंबून आहे.

मॅलिनोस्कीप्रमाणेच ब्राऊनही सांस्कृतिक घटकांच्या प्रकार्यावर भर देतात. मात्र त्यांच्यात महत्त्वाचा फरक आहे. मॅलिनोस्की हे सांस्कृतिक घटकाद्वारे पार पाडल्या जाणाऱ्या प्रकार्यामुळे व्यक्तीचे अस्तित्त्व टिकून राहाते या मुद्यावर भर देतात, तर ब्राऊन मात्र व्यक्तीऐवजी समाजाचे अस्तित्व टिकून राहाते या मुद्यावर भर देतात.

**६) इतर समाजशास्त्रज्ञ –**

वरील प्रमुख विचारवंताखेरीज इतरही कांही समाजशास्त्रज्ञ आहेत, जे प्रकार्यवादी म्हणून ओळखले जात नाहीत, मात्र त्यांच्या विचारात प्रकार्यवादी दृष्टिकोन दिसून येतो. उदा. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ **विल्यम ग्रॅहम सम्नर** यांनी लोकरुढी व लोकनितींचे सामाजिक जीवनातील प्रकार्य विशद करुन सांगितले. **चार्लस् कुले** यांनीही समाजाची सावयवाशी तुलना केली. तसेच त्यांनी प्राथमिक समुहांचे सामाजिक संघटन व सामाजिक ऐक्य टिकविण्याच्या संदर्भातील असलेले प्रकार्य स्पष्ट केले. **विल्फ्रेड पॅरेटोने** देखील समाजव्यवस्था ही एखाद्या सजीवासारखी कार्य करते असे प्रतिपादन केले. त्याच्या मते, समाजव्यवस्थेचे विविध घटक हे परस्परावलंबी असून ते परस्परांवर प्रभाव टाकतात. या घटकांना निश्चित अशा भूमिका असतात व ते त्या भूमिकांच्याद्वारे

समाजव्यवस्थेस प्रभावित करतात. पॅरेटो म्हणतात की, हे विविध घटक समाजव्यवस्थेचा समतोल राखण्यासाठी विविध कार्ये पार पाडतात. याशिवाय जर्मन समाजशास्त्रज्ञ **वॉनवीज** यांनी संस्कृतीच्या अभ्यासासाठी प्रकार्यवाद स्विकारला तर **सोरोकीन** (रशिया) यांनी संस्कृतीच्या समन्वयाच्या संदर्भात प्रकार्यवाद स्विकारण्याची चर्चा केलेली आहे.

❖ **प्रकार्यवादाचे आधार किंवा गृहितके** (Premises of Functionalism) -

प्रकार्यवादाचा अर्थ, सामान्य स्वरुप व बौद्धिक मुळे विचारात घेतल्यानंतर प्रकार्यवादाचे आधार किंवा गृहितके कोणती आहेत, याची कल्पना येते. ही गृहितके पुढीलप्रमाणे;

**१) समाजाचे सावयवी स्वरुप –**

प्रकार्यवादात हे गृहीत धरलेले आहे की, समाज हा सावयवासारखा आहे. सावयवाचे विभिन्न अवयव परस्परावलंबी असतात व असे अवयव सावयवाच्या गरजा पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडतात. त्यामुळे सावयावाचे अस्तित्त्व व सातत्य टिकून राहते. समाजसुद्धा असाच आहे. समाजाचे विविध घटक असून ते परस्परावलंबी असतात. व हे घटक समजाच्या गरजापूर्तीचे कार्य करीत असतात. त्यामुळे समाजाचे अस्तित्त्व टिकून राहाते. थोडक्यात सावयवाप्रमाणेच समाजाच्या विविध घटकात प्रकार्यात्मक संबंध असतात.

**२) समाज एक व्यवस्था –**

प्रकार्यवादात असे मानले जाते की, समाज ही एक सुसंघटीत, स्थिर, एकात्म अशी व्यवस्था असून या व्यवस्थेचे बहुतांशी सदस्यांमध्ये कांही मुलभूत मुल्यांच्या संदर्भात सहमती असते.

**३) संतुलनाची स्थिती –**

प्रकार्यवादात असेही गृहीत धरले जाते की, समाजाची मूळ प्रवृत्ती ही संतुलन (समतोल) टिकवून ठेवण्याची असते. समाजात परिवर्तने घडून आली तरी समाजव्यवस्था या परिवर्तनाशी जुळवून घेते व आपले मुळचे संतुलन किंवा समतोलाची स्थिती पुनःकायम राखते.

**४) प्रकार्य व अपकार्य –**

प्रकार्यवादात असे गृहीत धरले जाते की, समाजव्यवस्थेच्या प्रत्येक घटकाचे स्वतःचे असे प्रकार्य व अपकार्य असते. प्रकार्य हे समाजव्यवस्थेचे संतुलन टिकवून ठेवते तर अपकार्य हे संतुलनास अडथळा निर्माण करते, संतुलनावर आघात करते.

❖ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.**

१. फंक्शन (Function) या इंग्रजी शब्दाचे वेगवेगळे पाच अर्थ कोणी सांगितले आहेत?

अ) ऑगस्त कॉम्त ब) हर्बर्ट स्पेन्सर

क) एमिल डुर्खीम ड) रॉबर्ट मर्टन

२. समाजशास्त्रीय प्रकार्यवादाचा जनक कोणास मानले जाते?

अ) चालर्स डार्विन ब) हर्बर्ट स्पेन्सर

क) ऑगस्त कॉम्त ड) टालकॉट पार्सन्स

३. कोणत्या सिद्धांतास विरोध करण्याच्या भूमिकेतून प्रकार्यवादी सिद्धांत पुढे आला?

अ) उत्क्रांतीवाद ब) संरचनावाद

क) संघर्षवाद ड) मार्क्सवाद

४. कोणत्या समाजशास्त्रज्ञाने सामाजिक तथ्यांच्या संदर्भात प्रकार्यवादी सिद्धांत स्पष्ट केलेला आहे?

अ) ऑगस्त कॉम्त ब) हर्बर्ट स्पेन्सर

क) एमिल डुर्खीम ड) मॅक्स वेबर

५. खालीलपैकी कोणता सामाजिक मानवशास्त्रज्ञ प्रकार्यवादी आहे?

अ) मॅलिनोस्की ब) लेविस्ट्रॉस

क) नॅडेल ड) एडवर्ड टायलर

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रकार्यवादाचा अर्थ सांगा.

२. सामाजिक उत्क्रांतीवाद कोणी मांडला?

३ प्रकार्यवादी दृष्टिकोनातून धर्माचे विश्लेषण कोणी केले आहे?

४. टॉब्रीअँड बेटावरील आदिवासींचा क्षेत्रकार्य पद्धतीद्वारे कोणी अभ्यास केला?

५. 'स्ट्रक्चर अँड फंक्शन इन प्रिमिटीव्ह सोसायटी' हा ग्रंथ कोणी लिहिला?

## २.२.२ टालकॉट पार्सन्स् (१९०२–१९७९)

प्रकार्यवादाची मुळे अभ्यासल्यानंतर आता तुम्ही अमेरिकन प्रकार्यवादी समाजशास्त्रज्ञ टोलकॉट पार्सन्स्चे विचार अभ्यासणार आहात. पार्सन्स् हे विश्वविख्यात असे प्रकार्यवादी समाजशास्त्रज्ञ आहेत. त्यांचा प्रकार्यवाद हा विश्लेषणात्मक प्रकार्यवाद म्हणून ओळखला जातो. कारण त्यांनी सामाजिक व्यवस्था (social system) या संकल्पनेचे विश्लेषण करुन आपले प्रकार्यवादी विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते, समाज ही एक व्यवस्था आहे. तिला ते सामाजिक व्यवस्था म्हणतात. ''क्रिया करणाऱ्या व्यक्ती व्यक्तींमधील (actors) आंतरक्रियेच्या प्रक्रियांची व्यवस्था म्हणजे सामाजिक व्यवस्था होय.'' अशी व्याख्या त्यांनी केलेली आहे.

सामाजिक व्यवस्थेचे अस्तित्त्व व सातत्य दीर्घकाळ कसे टिकून राहाते हा पार्सन्स् पुढील महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी ते सामाजिक व्यवस्थेचे विश्लेषण करतात. ते म्हणतात, सामाजिक व्यवस्थेचे विश्लेषण केल्यास आपल्या हे लक्षात येते की, सामाजिक व्यवस्था ही परस्पर संबंधित अशा असंख्य घटकांची मिळून बनलेली असून हा प्रत्येक घटक व्यवस्थेच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने निश्चित असे प्रकार्य पार पाडतो. त्यामुळेच सामाजिक व्यवस्थेचे अस्तित्व व सातत्य टिकून राहाते. पार्सन्सच्या प्रकार्यवादाचे संक्षिप्त स्वरुप असे आहे. त्यांचा प्रकार्यवाद हा व्यवस्था विश्लेषण म्हणूनही ओळखला जातो.

पार्सन्सच्या मते, समाजाचे वास्तविक अध्ययन हे प्रकार्यवादी दृष्टिकोनातूनच होऊ शकते. पार्सन्सचा प्रकार्यवाद समजावून घेण्यासाठी त्यांनी मांडलेला सामाजिक क्रियेचा सिद्धांत, प्रतिमान चलाची संकल्पना, सामाजिक व्यवस्थेच्या प्रकार्यात्म्क समस्या (AGIL) आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रकार्यवादी विश्लेषण यांचा प्रकार्यात्मक अभ्यास तुम्ही येथे करणार आहात.

## ❖ पार्सन्सचा सामाजिक क्रियेचा सिद्धांत –

पार्सन्स्ने मांडलेला सामाजिक क्रियेचा सिद्धांत हा समाजशास्त्रातील एक महत्त्वाचा सिद्धांत मानला जातो. पार्सन्स्ने हा सिद्धांत दोन वेगवेगळ्या वेळा मांडलेला आहे. सर्वप्रथम त्यांने १९३७ मध्ये प्रकाशित केलेल्या The Structure of Social Action या ग्रंथात हा सिद्धांत मांडला. त्यानंतर त्याने १९५१ मध्ये आपला शिष्य व सहकारी **ई.ए. शिलस** समवेत Towards A Theory of Social Action हा ग्रंथ, तर १९६० मध्ये हा ग्रंथ प्रकाशित केला. नंतरच्या या तीन ग्रंथात त्याने सामाजिक क्रियेच्या सिद्धांतात कांही महत्त्वपूर्ण बदल करुन या सिद्धांताचा विस्तार केला.

The Structure of Social Action या ग्रंथात पार्सन्सने अर्थशास्त्रज्ञ अल्फ्रेड मार्शल, रिकार्डो, ॲडम स्मिथ आणि समाजशास्त्रज्ञ पॅरेतो, दूर्खीम आणि वेबर यांच्या विचारांचे विश्लेषण करून त्यातील उणिवा दाखवून दिलेल्या आहेत. या उणिवामुळेच पार्सन्सने उपयोगितावाद, प्रत्यक्षवाद व आदर्शवाद या तीन सिद्धांतांना समाजशास्त्रीय सिद्धांताचा आधार मानलेले नाही. अर्थात पार्सन्स्वर वेबरचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी वेबरकडून अनेक गोष्टी स्वीकारलेल्या आहेत. वेबरने आपल्या सामाजिक क्रियेच्या सिद्धांतात असे प्रतिपादन केलेले आहे की, कर्ता हा आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 'मूल्य व विवेक' यांचा उपयोग करतो. पार्सन्स्ने मात्र विवेकावर फारसा भर दिलेला नाही तथापि, वेबर प्रमाणेच पार्सन्स् हे मान्य करतात की, क्रिया करण्यामागे जो अर्थ असतो तो अर्थ कर्ता स्वतःच निश्चित करीत असतो. पार्सन्स्चा सामाजिक क्रियेचा सिद्धांत समजावून घेताना आपणांस पुढील मुद्यांचा विचार करावा लागतो.

अ) सामाजिक क्रियेचा अर्थ :

ब) सामाजिक क्रियेतील घटक.

क) सामाजिक क्रिया व्यवस्था.

ड) सामाजिक क्रियेच्या सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण.

या प्रत्येक मुद्याची आपण तपशिलाने चर्चा करणार आहोत.

**अ) सामाजिक क्रियेचा अर्थ** :

पार्सन्सचा सामाजिक क्रियेचा सिद्धांत हा ऐच्छिक क्रिया सिद्धांत आहे. कारण कर्ता हा आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपलब्ध पर्यायापैकी त्याला जो पर्याय योग्य वाटेल त्याची निवड करतो. म्हणून पार्सन्स सामाजिक क्रियेची व्याख्या पुढीलप्रमाणे देतात 'सामाजिक क्रिया हे असे वर्तन आहे की, ज्याचा हेतू हा कोणतेही उद्दिष्ट साध्य करणे हा असतो.' जेंव्हा व्यक्ती एखादे वर्तन करते (उदा. हसणे, गाणे, चालणे इ.) तेंव्हा कमीजास्त प्रमाणात शक्ती खर्च होत असते. परंतू जर ऐवढ्यावरच वर्तन समाप्त होत असेल तर शक्ती शिवाय कर्त्याला अधिक जादा कांही खर्च करावे लागत नाही. परंतू जर या वर्तनामुळे एखादा उद्देश(लक्ष्य) साध्य होत असेल तर ते वर्तन सामाजिक क्रिया ठरते. थोडक्यात वर्तनास उद्दिष्ट प्राप्तीची जोड दिली की, ते वर्तन सामाजिक क्रिया ठरते असे पार्सन्स म्हणतात. थोडक्यात असे म्हणता येते की, सामाजिक क्रिया= वर्तन + उद्दिष्टपूर्ती पुढे इ.ए.शिल्स समवेत १९५१ मध्ये संपादित केलेल्या "Towards a General Theory of Action" या ग्रंथात पार्सन्सची सामाजिक क्रियेची सविस्तर व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे. 'क्रिया ही कर्ता, परिस्थिती यांच्या व्यवस्थेतील अशी प्रक्रिया आहे की, जिथे एखाद्या व्यक्तीगत कर्त्याकरीता किंवा सामूहिक रुपातील घटक व्यक्तींकरीता प्रेरणात्मक महत्त्व असते. (Action is a process in the action-situation system which has motivetional significane to the induividual actor or in the case of collectively, its component individuals)"

**ब) सामाजिक क्रियेचे घटक** (Elements of Social Action) :

सामाजिक क्रियेमध्ये पुढील ४ घटक गुंतलेले असतात.

**१) कर्ता** (Actor) - सामाजिक क्रिया घडून येण्यासाठी कोणीतरी कर्ता असतो. हा कर्ता क्रिया करीत असतो. कर्ता नसेल तर क्रिया घडू शकत नाही. हा कर्ता एखादी व्यक्ती किंवा समूह असू शकतो. कर्त्याच्या सर्वच वर्तनास क्रिया म्हणता येत नाही. निश्चित उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतुने जेंव्हा कर्ता वर्तन करतो तेंव्हाच त्याचे वर्तन हे क्रिया ठरते. पार्सन्सच्या मते, सामाजिक क्रिया करणारा कर्ता हा सामाजिक प्राणी असतो व त्याचे समाजीकरण झालेले असते. कर्ता हा व्यक्तिनिष्ठ असा स्वतंत्र अस्तित्त्व असलेला घटक असून त्याच्याकडे जागृतता व अनुभव असतो. तो निर्णय घेत असतो. तो भूतकालीन घटनांचा विचार करून भविष्याविषयी कल्पना करीत असतो, निर्णय घेत असतो. तो स्वतःच स्वतःचे परीक्षण करू शकतो. असा हा कर्ता सामाजिक क्रियेचा पहिला घटक आहे.

**२) उद्दिष्ट आणि साधने** (Endor Goal and Means) :

उद्दिष्ट(किंवा साध्य किंवा ध्येय) हे सामाजिक क्रियेतील दुसरा घटक आहे. सामाजिक क्रियेच्या पाठीमागे निश्चित असे उद्दिष्ट वा ध्येय असते. पार्सन्स् म्हणतो की, जेंव्हा कर्ता कोणतीही क्रिया करतो त्या क्रियेच्या पाठीमागे कोणतेतरी उद्दिष्ट असतेच. सामाजिक क्रिया ही उद्दिष्टाभिमूख असते. कोणतेही उद्दिष्ट नसलेले वर्तन

क्रिया ठरत नाही. उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी होणारे वर्तन हेच क्रिया ठरते. पार्सन्स्ने उद्दिष्ट म्हणजे काय हे स्पष्ट करताना उद्दिष्टाची पुढीलप्रमाणे व्याख्या केलेली आहे. 'उद्दिष्ट म्हणजे वर्तनाची किंवा व्यवहाराची अशी भावी अवस्था की जिच्या दिशेने क्रिया संचलित होत असते.' कर्त्यापुढे अनेक उद्दिष्टे असू शकतात. त्यापैकी कोणती उद्दिष्टे निवडावयाची याचे स्वातंत्र्य कर्त्याला असते.

उद्दिष्ट निवडल्यानंतर किंवा उद्दिष्ट निश्चित केल्यानंतर कर्ता हा ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठी आवश्यक असणारी साधने निवडतो. उद्दिष्टप्राप्तीसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंना साधने म्हणतात. ही साधने दोन प्रकारची असतात. १) भैतिक साधनेः- यामध्ये मूर्त अशा वस्तूंचा समावेश होतो. २) अभौतिक साधनेः- यामध्ये अमूर्त वस्तूंचा- उदा. मूल्ये (Values) समावेश होतो. साधने अनेक असतात. त्यापैकी कर्ता अशाच साधनांची निवड करीत असतो की जी कमीत कमी श्रमात उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रभावशाली असतात.

**३) परिस्थिती** (Situation or Condition) :- सामाजिक क्रिया ही नेहमी विशिष्ट अशा परिस्थितीत घडत असते. म्हणून परिस्थिती हा सामाजिक क्रियेचा तिसरा घटक ठरतो. उद्दिष्टे व ती साध्य करण्याची साधने यांची निवड करताना कर्त्याला त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करावा लागतो. कारण त्या परिस्थितीचा प्रभाव कर्त्यावर पडत असतो.'क्रियेची परिस्थिती म्हणजे असे सर्व घटक की, जे कर्त्याच्या अभिमूखतेमध्ये अर्थपूर्णरित्या संघटीत झालेले असतात.'

कर्त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीत भौतिक, सामाजिक व सांस्कृतिक असे तीन घटक अंतर्भूत असतात. त्यामुळे परिस्थितीचे तीन प्रकार पडतात.

**अ) भौतिक परिस्थिती** (Physical Situation) :- यामध्ये जमीन, हवा, पाणी, नदी, पर्वत, प्राणी, वनस्पती इत्यादी नैसर्गिक वस्तूंचा समावेश होतो. या वस्तू कर्त्याशी आंतरक्रिया करीत नाहीत. मात्र त्या कर्त्याच्या उद्दिष्टपूर्तीचे साधन म्हणून उपयोगात येऊ शकतात किंवा कर्त्याच्या क्रियेमध्ये अडथळा आणू शकतात.

**ब) सामाजिक परिस्थिती** (Social Situation) :- कर्त्यावर प्रभाव टाकणाऱ्या किंवा कर्त्यामुळे प्रभावित होणाऱ्या इतर व्यक्तींचा सामाजिक परिस्थितीत समावेश होतो.

**क) सांस्कृतिक परिस्थिती** (Cultural Situation) :- श्रद्धा, मुल्ये, नियमने, चिन्हे इत्यादींचा सांस्कृतिक परिस्थितीत समावेश होतो. हे सांस्कृतिक घटक कर्त्यावर प्रभाव टाकीत असतात. कर्ता सांस्कृतिक परिस्थिती विचारात घेऊनच क्रिया करीत असतो. कर्त्याकडून होणाऱ्या क्रियेचे संचालन, नियमन व निर्देशन हे सांस्कृतिक परिस्थितीद्वारेच होत असते. सांस्कृतिक घटक हे कर्त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अविभाज्य अंग बनलेले असतात. त्यामुळे त्यांना विचारात घेऊनच कर्ता क्रिया करीत असतो.

**४) अभिमुखता** (Orientation) :- सामाजिक क्रियेमध्ये कर्त्याला आपल्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी परिस्थितीशी नेहमी अभिमूख राहावे लागते. ''ज्या रितीने कर्ता हा आपली क्रिया परिस्थितीच्या संदर्भात उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने संचालित करतो त्यास अभिमुखता असे म्हणतात.'' आपल्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी

आपले वर्तन संचालित करताना कर्त्याला आपल्या सभोवतालची परिस्थिती कशी आहे? तिच्यात कोणकोणते घटक आहेत? त्या घटकांचे गुणधर्म कोणते आहेत? त्या घटकांना उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने किती महत्त्व आहे? इत्यादी प्रश्नांचा विचार करावा लागतो. या प्रश्नांचा विचार करण्याची जी प्रक्रिया आहे, तिलाच अभिमुखता असे म्हणतात. कर्ता व परिस्थिती यांना जोडणारी प्रक्रिया म्हणून पार्सन्स्ने अभिमुखतेचा विचार केलेला आहे. त्याने अभिमुखतेचे दोन प्रकार पाडलेले आहेत.

**१) प्रेरणात्मक अभिमुखता** (Motivational orientation) :- कर्त्याला क्रिया करण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्रेरणेचे गरज असते. प्रेरणा ही कर्त्याच्या व्यक्तिमत्त्वामध्ये विद्यमान असते. क्रिया करण्यास लागणारी ऊर्जा ही प्रेरणेतून मिळत असते. ही ऊर्जा क्रिया करण्याच्या मार्गातील अडथळयांवर मात करण्यासाठी उपयोगी पडत असते. म्हणून कर्ता हा प्रेरणेशी अभिमुख असतो. प्रेरणात्मक अभिमुखतेचे तीन पैलू आहेत.

**अ) बोधात्मक** (Cognitive) पैलू :- 'कर्त्यासभोवतालच्या परिस्थितीतील घटकांचा कर्त्यास जो बोध होतो, जे ज्ञान होते, त्यास बोधात्मक पैलू म्हणतात'. ज्या परिस्थितीत क्रिया करावयाची त्या परिस्थितील घटकांचा बोध करुन घेतल्याशिवाय उद्दिष्टपूर्तीसाठी क्रिया करणे शक्य नसते. पार्सन्सच्या मते कर्ता क्रिया करण्यापूर्वी परिस्थितीचा बोध (ज्ञान) करुन घेत असतो.

**ब) संवेगात्मक पैलू :-** 'परिस्थितीतील घटकासंबंधी कर्त्याच्या ज्या अभिवृत्ती व भावभावना असतात, त्यांना संवेगात्मक पैलू म्हणतात.'

**क) मुल्यांकनात्मक** (Evoluation) **पैलू** :- 'कर्ता हा आपल्या उद्दिष्टांचे व उद्दिष्टपूर्तीसाठी वापरावयाच्या साधनांचे जे मुल्यांकन करतो, त्यास मुल्यांकनात्मक पैलू म्हणतात.' या मुल्यांकनाद्वारे कर्ता हा अनेक उद्दिष्टांमधून कांहीची निवड करीत असतो. ही निवड तो उद्दिष्टपूर्तीने मिळणारे समाधान व उद्दिष्टांची योग्यायोग्यता याआधारे करीत असतो. तर साधनांची निवड करताना तो जी साधने अधिक प्रभावी, फायदेशीर व नैतिक वाटतात, त्यांची निवड करीत असतो.

**२) मुल्यात्मक अभिमुखता :-** 'कर्त्याचे वर्तन किंवा क्रिया निर्धारीत करण्यामध्ये मुल्यांची किंवा मानदंडांची भूमिका महत्त्वाची असते. विशिष्ट उद्दिष्टे व साधने यांची निवड करण्याचा जो निर्णय कर्ता घेतो तो निर्णय हा मुल्यावर किंवा मानदंडावर आधारलेला असतो. यालाच मुल्यात्मक अभिमुखता असे म्हणतात.' मुल्यात्मक अभिमुखतेचेही तीन पैलू आहेत.

**अ) बोधात्मक मुल्य किंवा मानदंड** (Congnitive values or standards) :- ज्या परिस्थितीत कर्ता क्रिया करतो त्या परिस्थितीतील घटकांचा बोध किंवा ज्ञान हे कर्ता वैध किंवा प्रमाण (valid) मानतो. 'ज्ञानाचे हे प्रामाण्य ज्या निकषांच्या आधारे ठरविले जाते, त्यास बोधात्मक मुल्य वा मानदंड म्हणतात.'

**ब) गुणधर्मात्मक मुल्य वा मानदंड** (Appreciative values or standards) :- 'कर्त्याची आवड-नावड, रुची-अरुची ही ज्या निकषांच्या आधारे निर्धारित होते, त्यांना गुणधर्मात्मक मुल्य वा मानदंड म्हणतात.' क्रिया करताना कर्त्यास परिस्थितीतील कांही घटकांची (वस्तूंची) निवड करावी लागते. ही निवड तो वस्तूंच्या

गुणांच्या आधारे करीत असतो.

**क) नैतिक मुल्य किंवा मानदंड** (Moral values or standards) :- उद्दिष्ट पूर्तीसाठी विशिष्ट परिस्थितीत करावयाचे वर्तन हे योग्य आहे की नाही याचा निर्णय कर्त्यास घ्यावा लागतो. ज्या निकषांच्या आधारे तो हा निर्णय घेतो, त्यास नैतिक मुल्य वा मानदंड असे म्हणतात. नैतिक मानदंड हे समाजव्यवस्थेचे स्थैर्य, संतुलन, ऐक्य इत्यादीशी संबंधित असल्याने त्यांना सामाजिक दृष्ट्या महत्त्व असते.

अशाप्रकारे पार्सन्सने आपल्या सामाजिक क्रियेच्या सिद्धांतातील ४ घटकांचे विवेचन केलेले आहे.

१. प्रत्येक क्रियेचा एक कर्ता असतो.

२. त्या क्रियेमागे निश्चित उद्दिष्ट असते व उद्दिष्ट साध्य करण्याची साधने असतात.

३. उद्दिष्टपूर्तीसाठी क्रिया करणाऱ्या कर्त्याभोवती विशिट परिस्थिती असते.

४. या परिस्थितीशी कर्ता हा अभिमुख असतो.

**क) सामाजिक क्रिया व्यवस्था** (Social Action System) : पार्सन्स्च्या मते, सामाजिक क्रिया ही पुढील तीन व्यवस्थांवर आधारलेली असते.

**१) व्यक्तिमत्त्व व्यवस्था** (Personality System) :- सामाजिक क्रिया ही कर्त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या व्यवस्थेवर आधारीत असते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वानुसार इच्छा निर्माण होतात. त्या इच्छांची पूर्तता करण्याच्या प्रयत्नातून सामाजिक क्रिया घडत असतात.

**२) सांस्कृतिक व्यवस्था** (Cultural System) :- पार्सन्स् संस्कृतीस मानवाच्या आंतरक्रियेचा परिणाम व निश्चयात्मक तत्त्व मानतो. व्यक्तीच्या क्रिया या सांस्कृतिक व्यवस्थेच्या अंतर्गत घडत असतात. त्याच्या मते, सांस्कृतिक व्यवस्थेचे तीन भाग आहेत. अ) कल्पनांची व्यवस्था (System of Ideas) ब) अभिव्यक्तींच्या प्रतिकांची व्यवस्था (System of Expressive symbols) क) मुल्यांची व्यवस्था किंवा एकात्मीक प्रतिमान (System of Values or Integrative patterns) हे तिन्ही भाग परस्परसंबंधित आहेत. प्रत्येक सामाजिक क्रियेची एक विशिष्ट परिस्थिती असते व त्या परिस्थितीचा अर्थ प्रत्येक कर्ता आपापल्या इच्छा आकांक्षानुसार वेगवेगळा लावीत असतो. हे अर्थ जेव्हा विकसित होतात, तेव्हा ते प्रतिकांचे रुप धारण करतात. ही प्रतिके लोकांकडून मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. लोकांमध्ये या प्रतिकांची देवाणघेवाण सुरू होते. अशा या समाजाने स्विकारलेल्या प्रतिकांची एक व्यवस्था निर्माण होते. तिलाच सांस्कृतिक व्यवस्था म्हणतात. सांस्कृतिक व्यवस्थेमुळे व्यक्तींच्या क्रियांना अर्थ प्राप्त होतो व त्यांना आधारही मिळतो.

**३) सामाजिक व्यवस्था** (Social System) :- सामाजिक क्रियेचा तिसरा आधार सामाजिक व्यवस्था आहे. ''कर्त्यामधील आंतरक्रियेच्या प्रक्रियांची व्यवस्था म्हणजे सामाजिक व्यवस्था होय.'' अशी व्याख्या पार्सन्स्ने दिलेली आहे. सामाजिक व्यवस्था ही आंतरक्रिया करणाऱ्या अनेक व्यक्तींची मिळून बनते. या आंतरक्रिया विशिष्ट परिस्थितीत घडतात. आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती ह्या कमाल समाधान मिळविण्याच्या

भावनेने प्रेरित झालेल्या असतात. या व्यक्तींचे परस्परांशी व परिस्थितीतीशी असणारे संबंध हे सांस्कृतिकदृष्ट्या संरचित व समान प्रतिकांच्याद्वारे प्रस्थापित होत असतात. थोडक्यात पार्सन्सच्या मते, सामाजिक क्रिया व्यवस्था ही व्यक्तिमत्त्व व्यवस्था, सांस्कृतिक व्यवस्था व सामाजिक व्यवस्था यांची मिळून बनते. या तीन व्यवस्था परस्परावलंबी असतात व हे परस्परावलंबन सामाजिक क्रियेस जबाबदार असते. व्यक्तिगत इच्छा, स्विकृत प्रतिके व व्यक्ती-व्यक्तीमधील आंतरक्रिया यामुळे सामाजिक क्रिया निर्धारित होत असतात.

**ड) सामाजिक क्रियेच्या सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :**

पार्सन्सने पॅरेटो, वेबर इत्यादींच्या सामाजिक क्रियेच्या सिद्धांतातील उणिवा दाखवून देऊन आपला सामाजिक क्रियेचा सिद्धांत मांडला हे खरे. तथापि त्याचा हा सिद्धांत देखील टिकेस पात्र ठरला आहे. या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टिका केली आहे.

१) सोरोकिन च्या मते, पार्सन्सने सामाजिक क्रियेच्या सिद्धांतात ज्या अनेक संकल्पना मांडलेल्या आहेत, त्या अस्पष्ट आहेत. शिवाय पार्सन्सच्या या सिद्धांताद्वारे मानवाच्या सर्वच क्रियांचे स्पष्टीकरण देणे शक्य होत नाही. पुढे सोरोकिन असेही म्हणतात की, पार्सन्सने त्यांच्या सामाजिक क्रियेच्या सिद्धांतात संघर्षाचा अजिबात विचार केलेला नाही. शिवाय पार्सन्सच्या सिद्धांताचा मुख्य आधार हा ऐच्छिक क्रिया हा आहे. मात्र त्याने त्याविषयीचे सविस्तर विवेचन केलेले नाही.

२) कोहेन यांच्या मते, पार्सन्सने क्रियांचे अति उच्चस्तरावरील मुल्यांकन केलेले आहे. त्याने मार्क्स, पॅरेतो, वेबर यांच्या सैद्धांतिक विचाराचा समन्वय केलेला आहे. त्याच्या या सिद्धांतात मनोविज्ञानवाद आहे. मात्र त्याचे सविस्तर स्पष्टीकरण त्याने दिलेले नाही.

३) मॅक्स ब्लॅक यांच्या मते, पार्सन्सचे सामाजिक क्रियेचे विवेचन हे अधिकाधिक मानसशास्त्रीय स्वरुपाचे आहे. शिवाय त्यांचे लिखाण हे अत्यंत क्लिष्ट स्वरुपाचे आहे.

४) गोल्डनर यांच्या मते, पार्सन्सचे सिद्धांत सैद्धांतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असले तरी ते वास्तविक समस्यांपासून लांब आहेत.

पार्सन्सच्या सिद्धांतावर वरीलप्रमाणे टीका केली जात असली तरी त्याचा हा सिद्धांत महत्त्वाचा आहे. कारण त्यामध्ये त्याने अनेक संकल्पनांचे विश्लेषण व संश्लेषण केलेले आहे. या सिद्धांताचा मुख्य आधार कर्ता किंवा सामुहिकता (collectivity) आहे. क्रियेच्या पाठीमागे निश्चित अशी प्रेरणा व मुल्ये असतात. कर्त्याद्वारे केलेल्या क्रियांमुळेच सामाजिक व्यवस्था तयार होते. सामाजिक व्यवस्थेचा मुलभूत आधार सामाजिक क्रियाच असतात, व त्यांच्यामागे निश्चित उद्दिष्ट, प्रेरणा व परिस्थिती असते असा महत्त्वपूर्ण विचार या सिद्धांतात पार्सन्सनी मांडलेला आहे.

❖ प्रतिमान चल (Pattern Variables) –

पार्सन्सचा सामाजिक क्रियेचा सिद्धांत अभ्यासल्यानंतर आता तुम्ही त्याची प्रतिमान चल ही संकल्पना समजावून घेणार आहात. पार्सन्स्च्या मते, कर्ता जेव्हा एखादी सामाजिक क्रिया (म्हणजेच वर्तन) करीत

असतो, तेव्हा त्याच्या क्रियेवर त्याच्या गरजा व प्रेरणा तसेच इतरांच्या त्याच्याकडून असलेल्या अपेक्षा व सामाजिक नियमने यांचा प्रभाव पडत असतो. कर्त्याची इच्छा व इतरांच्या अपेक्षा व सामाजिक नियमने यांच्यात जर विसंगती असेल तर कर्त्याच्या मनात क्रिया किंवा वर्तन करण्याच्या संदर्भात द्विधा अवस्था (dilema) निर्माण होते. तसेच आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असणारी साधने निवडतानाही कर्त्याची द्विधा मनःस्थिती होऊ शकते. कारण काही साधने ही समाजसंमत असतात, तर कांही साधने समाजसंमत नसतात. त्यामुळे कोणती साधने निवडावीत याबाबत कर्त्याच्या मनाची द्विधा अवस्था होऊ शकते.

पार्सन्सच्या मते, विशिष्ट परिस्थितीत क्रिया करताना कर्त्याच्या मनाची ही जी द्विधा अवस्था होते ती अवस्था सोडविण्यासाठी कर्त्यासमोर दोन परस्परविरोधी पर्याय असतात व त्यापैकी एका पर्यायाची त्याला निवड करावी लागते. या परस्परविरोधी पर्यायाला पार्सन्सने 'प्रतिमान चल' असे म्हटले आहे. या परस्परविरोधी पर्यायाच्या म्हणजेच प्रतिमान चलाच्या पाच जोड्या पार्सन्सने सांगितलेल्या आहेत. विशिष्ट परिस्थितीतीत क्रिया वा वर्तन करताना कर्त्याला प्रत्येक जोडीतील एकाच पर्यायाची निवड करावी लागते. या पाच जोड्या पुढीलप्रमाणे आहेत;

**१) भावनात्मक विरुद्ध भावात्मक उदासिनता** (Affectivity Versus Affective Neutrality) :

आपल्या उद्दिष्टांची स्पष्ट कल्पना असलेल्या व उद्दिष्टपूर्तीची साधने उपलब्ध असलेल्या कर्त्याची क्रिया करताना भावात्मकता विरुद्ध भावात्मक उदासिनता अशी द्विधा मनःस्थिती होते. क्रिया करताना आपल्या समाधानास प्राधान्य द्यावयाचे की संभाव्य समस्या विचारात घेऊन क्रिया करणे लांबणीवर टाकावयाचे असे जे द्वंद्व निर्माण होते, त्याला पार्सन्स्ने भावात्मकता विरुद्ध भावात्मक उदासिनता (तटस्थता) असे म्हटले आहे. या दोन पर्यायापैकी कर्त्याला एकाची निवड करावी लागते. तो कोणता पर्याय निवडेल हे त्याच्या अभिमुखतेवर अवलंबून असते. भावात्मकतेच्या पर्यायात कर्ता हा क्रिया केल्याने मिळणाऱ्या समाधानास त्या क्रियेच्या संभाव्य परिमाणापेक्षा अधिक महत्त्व देतो. तर भावात्मक उदासिनतेच्या पर्यायात कर्ता स्वतःवर कांही निर्बंध लादतो व आपले समाधान लांबणीवर टाकतो. एखादा पिता व त्याचा पुत्र यांच्यातील संबंध हे भावात्मकता या प्रकारचे असतात, तर हा पिता जेव्हा ग्राहक म्हणून एखाद्या विक्रेत्याशी व्यवहार (वर्तन) करतो, तेव्हा त्याचे व विक्रेत्याचे संबंध हे भावात्मक उदासिनता या प्रकारचे असतात.

**२) स्व-अभिमुखता विरुद्ध सामुदायिक अभिमुखता** (Self-orientation versus collectivity orientation):

विशिष्ट परिस्थितीत क्रिया करताना स्वतःच्या हितास प्राधान्य द्यावे की, सामुदायिक (सामुहिक) हितास प्राधान्य द्यावे अशी जी कर्त्याची द्विधा मनःस्थिती होते, तिला पार्सन्स्ने स्व-अभिमुखता विरुद्ध सामुदायिक अभिमुखता असे म्हटलेले आहे. स्व-अभिमुखतेच्या पर्यायात कर्ता स्वतःच्या हितास तर सामुदायिक अभिमुखतेच्या पर्यायात तो सामुदायिक हितास प्राधान्य देतो.

**३) सार्वत्रिकतावाद विरुद्ध विशिष्टतावाद** (Universalism versus particularism) :-

इतर व्यक्तीच्या संदर्भात क्रिया किंवा वर्तन करताना त्या व्यक्तीस एखादा प्रवर्गाचा घटक म्हणून तिचा विचार करावयाचा की, त्या व्यक्तीशी आपले असलेले विशिष्ट (व्यक्तीगत) संबंध लक्षात घेऊन तिचा विचार

करावयाचा अशी जी कर्त्याची द्विधा मनःस्थिती होते, तिला पार्सन्स्ने सार्वत्रिकतावाद विरुद्ध विशिष्टतावाद असे म्हटलेले आहे. समजा एखादी व्यक्ती ही शिक्षक आहे व ती ज्या वर्गास शिकविते त्या वर्गात तिचा स्वतःचा मुलगा विद्यार्थी म्हणून आहे. अशा परिस्थितीत वर्गात स्वतःच्या मुलाशी वर्तन करताना ती त्याला वर्गातील इतर विद्यार्थ्यासारखाच मानेल तर तिने सार्वत्रिकतावाद या पर्यायाची निवड केली असे होईल. याउलट जर ती त्याला आपला मुलगा मानूनच त्याच्याशी वर्तन करेल तर तिने विशिष्टतावाद हा पर्याय निवडला असे होईल.

**४) अर्पितता विरुद्ध अर्जितता** (Ascription Versus Achievement) :-

इतर व्यक्तीच्या संदर्भात क्रिया वा वर्तन करताना त्या व्यक्तीस जन्मतःच प्राप्त झालेल्या गुणवैशिष्ट्यांचा विचार करावयाचा की, तिने स्वकर्तृत्वाने मिळविलेल्या गुणवैशिष्ट्यांचा विचार करावयाचा मात्र शिक्षकाच्या एखाद्या विद्यार्थ्याकडून विद्यार्थी म्हणून केवळ विशेष स्वरुपाच्या अपेक्षा असू शकतात. कारण पिता व पुत्र यांच्यातील संबंधात अनेक हितसंबंधाविषयीच्या अपेक्षा असतात, मात्र शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील संबंधात एखाद्याच विशेष हितसंबंधाविषयीची अपेक्षा असते. विक्रेता व ग्राहक यांच्यातील संबंधात एकाच हितसंबंधाबाबतची अपेक्षा असते, तर पती-पत्नीतील संबंधात अनेक हितसंबंधाबाबतच्या अपेक्षा असतात.

अशाप्रकारे पार्सन्स्ने परस्परविरोधी असलेल्या दोन पर्यायांच्या पाच जोड्या म्हणजेच प्रतिमान चल स्पष्ट केलेले आहेत. सामाजिक परिस्थितीत क्रिया करताना कर्त्यासमोर कोणत्याही जोडीतील एक पर्याय निवडण्याचा निर्णय घ्यावा लागतो. पार्सन्स्च्या मते, कर्ता जेव्हा इतर व्यक्तीशी अभिमुख असतो, तेव्हा त्याला प्रतिमान चलाच्या परस्परविरोधी असलेल्या पाच जोड्यांना तोंड द्यावे लागते. या प्रतिमान चलांच्या आधारे समाजातील सामाजिक भूमिकांचे वर्गीकरण करता येऊ शकते.

❖ **मुल्यमापन :**

पार्सन्स्च्या प्रतिमान चलाच्या संकल्पनेवर अनेक आक्षेप घेण्यात आलेले आहेत.

**१) संदिग्धतता –** प्रतिमान चलाची योजना ही संदिग्ध आहे. यातील परस्परविरोधी पर्यायांची एक जोडी दुसऱ्या जोडीशी गुंतलेली आढळते. उदा. अर्पितता विरुद्ध अर्जितता ही जोडी सार्वत्रिकतावाद विरुद्ध विशिष्टतावाद या जोडीशी मिळतीजुळती वाटते.

**२) अनेक पर्याय –** भावात्मकतेचा (Affectivity) पर्याय व साधन-साध्य संबंधाविषयीच्या पैलूचा विचार करता कर्त्यासमोर अनेक पर्याय उभे राहू शकतात. अशी जी कर्त्याची द्विधा मनःस्थिती होते, तिला पार्सन्स्ने अर्पितता विरुद्ध अर्जितता असे म्हटलेले आहे. यालाच Quality Versus Performance असेही म्हणतात. समजा शिक्षक असलेली व्यक्ती आपला विद्यार्थी असलेल्या स्वतःच्या मुलास तो आपला मुलगा आहे म्हणून परीक्षेत अधिक गुण देईल तर तिने अर्पितता हा पर्याय निवडला असे होईल. याउलट मुलाने जी उत्तरे लिहिली आहेत, त्याच्याआधारे ती व्यक्ती आपल्या मुलास गुणदान करेल तर मात्र तिने अर्जितता हा पर्याय निवडला असे म्हणता येईल. नोकरीसाठी मुलाखत देणाऱ्या उमेदवाराची निवड तो स्व जातीचा आहे, या आधारे एखादा मालक करेल तर तो अर्पिततेचा पर्याय निवडतो असे होईल आणि जर उमेदवाराच्या कर्तृत्वाचा विचार करुन त्याची

निवड करेल तर तो अर्जिततेचा पर्याय निवडतो असे होईल.

**३) कठिण निवड –** सामाजिक क्रिया करताना कर्त्यासमोर जे पर्याय येतात त्यातून कोणत्या एका पर्यायाची निवड करावयाची हे परिस्थितीवर अवलंबून असते. निवड ही परिस्थिती सापेक्ष असल्याने विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट पर्यायाची निवड करणे कर्त्यासाठी कठीण ठरते. सामाजिक क्रिया बरेचदा अत्यंत संकीर्ण असते, त्यामुळे अमुकच एक पर्याय निवडला जाणे शक्य नसते.

**४) मार्गदर्शनास असमर्थ –** कांही टिकाकारांच्या मते, सामाजिक क्रिया करताना कर्त्यासमोर अनेकदा भूमिका संघर्ष उद्‌भवतो. अशा संघर्षाच्या स्थितीत कर्त्याने कसे वागावे याविषयी प्रतिमान चलाची ही योजना कर्त्यास कोणतेही मार्गदर्शन करू शकत नाही. उदा. पित्याची भूमिका व शिक्षकाची भूमिका या दोन भूमिकांमध्ये संघर्ष उद्‌भवल्यास हा संघर्ष कसा सोडवावयाचा याबाबत मार्गदर्शन करण्यास पार्सन्सनची प्रतिमान चलाची योजना असमर्थ ठरते.

**५) प्रसारीतता विरुद्ध विशेषता** (Diffuseness Versus Specificity) :-

इतर व्यक्तीच्या संदर्भात आपले वर्तन कसे असावे यासंबंधीचा निर्णय घेताना कर्त्याला त्या व्यक्तीकडून आपल्या काय अपेक्षा आहेत याचा विचार करावा लागतो. कर्त्याच्या अपेक्षा ह्या अधिक व्यापक किंवा समावेशक हितसंबंधाविषयीच्या असू शकतात किंवा एखाद्याच हिसंबंधाविषयीच्या असू शकतात. यालाच पार्सन्सने प्रसारीतता (किंवा विस्तारीतता) विरुद्ध विशेषता असे म्हटलेले आहे. पित्याच्या स्वतःच्या मुलाकडून मुलगा म्हणून अधिक व्यापक अपेक्षा असू शकतात. त्यामुळे प्रतिमान चलाविषयीची योजना ही विविध तऱ्हेने आखता येऊ शकते.

## ❖ पार्सन्सची एजीआयएल (AGIL) ची संकल्पना –

पार्सन्सने त्याच्या Social System या ग्रंथात सामाजिक व्यवस्थेचे विश्लेषण संरचनात्मक-प्रकार्यात्मक (Structural-functional) दृष्टिकोनातून केलेले आहे. सामाजिक व्यवस्थेचे विश्लेषण करताना त्याने प्रकार्यवादी दृष्टिकोनातून ''सामाजिक व्यवस्थेच्या कार्यात्मक पूर्वावश्यकता किंवा गरजा किंवा समस्या (Functional Prerequisites or Needs or problems of Social System)'' कोणत्या आहेत याचे विवेचन केलेले आहे. यावरुन त्यांचा प्रकार्यवादी दृष्टिकोन लक्षात येतो. पार्सन्स्नी सामाजिक व्यवस्थेच्या कार्यात्मक पूर्वाश्यकता किंवा गरजा किंवा समस्या दोन प्रकारच्या असतात असे म्हटलेले आहे.

१) विशिष्ट कार्यात्मक पूर्वावश्यकता

२) सामान्य कार्यात्मक पूर्वावश्यकता.

यापैकी दुसऱ्या प्रकारच्या म्हणजेच सामान्य कार्यात्मक पूर्वाश्यकता या चार आहेत. या चार पूर्वावश्यकता AGIL या संक्षिप्त रुपात मांडल्या जातात. त्यांचे पूर्ण रुप पुढीलप्रमाणे आहे;

१) 'A' = Adaptation म्हणजे अनुकूलन किंवा समायोजन

२) 'G' = Goal Attainment म्हणजे उद्दिष्ट स्थिती किंवा ध्येयप्राप्ती

३) 'I' = Integration म्हणजे एकात्मता किंवा एकात्मीकरण

४) 'L' = Latency म्हणजे प्रतिमानांचे जतन व तणावाचे व्यवस्थापन

कोणत्याही सजीवास आपले अस्तित्त्व व सातत्य टिकविण्यासाठी कांही शारिरीक गरजांची पूर्तता करावी लागते. त्याचप्रमाणे कोणत्याही सामाजिक व्यवस्थेस आपले अस्तित्त्व, सातत्य व संतुलन टिकविण्यासाठी वरील चार गरजांची पूर्तता करावी लागते. मग ती सामाजिक व्यवस्था ही कुटुंबासारखी लहान असो व समग्र समाजासारखी विशाल असो, तिला या चार पूर्वावश्यकतांची किंवा गरजांची पूर्तता करावीच लागते, असे पार्सन्स् म्हणतात.

आता तुम्ही या चार पूर्वावश्यकता सविस्तरपणे अभ्यासणार आहात.

**१) अनुकूलन** (Adaptation) :-

आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाशी अनुकूलन किंवा समायोजन साधणे ही सामाजिक व्यवस्थेची पहिली पूर्वावश्यकता आहे. आपल्या सदस्यांच्या विविध गरजांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवा यांचे उत्पादन व वितरण करावे लागते आणि हे कार्य पर्यावरणातील उपलब्ध साधनसंपत्तीचे साहाय्याने करावे लागते. त्यामुळे सामाजिक व्यवस्थेला पर्यावरणाशी अनुकूलन साधणे म्हणजेच पर्यावरणाशी जुळवून घेणे आवश्यक ठरते. यालाच अनुकूलन असे म्हणतात.

कोणत्याही समाजाची अर्थव्यवस्था ही अनुकूलनाची व्यवस्था असते. गरजापूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण करणे या क्रियांचा अर्थव्यवस्थेत समावेश होतो. तसेच या क्रियांचे सदस्यामध्ये वाटपही करावे लागते. त्यामुळे कार्यविभाजनाचाही (श्रमविभाजनाचा) अर्थव्यवस्थेत अंतर्भाव होतो.

प्रत्येक समाजात अनुकूलनाची व्यवस्था म्हणजेच अर्थव्यवस्था असते, मात्र तिचे स्वरुप वेगवेगळ्या समाजात वेगवेगळे असते. समाजाची संस्कृती व त्याच्या सभोवतालचे पर्यावरण या आधारे अनुकूलन व्यवस्थेचे स्वरुप निर्धारीत होत असते.

**२) उद्दिष्ट सिद्धी** (Goal Attainment) :-

सामाजिक व्यवस्थेची कांही उद्दिष्टे किंवा ध्येये असतात व ती साध्य करणे ही तिची दुसरी पूर्वावश्यकता असते.

सामाजिक व्यवस्थेची अनेक उद्दिष्टे असतात. त्यापैकी कांही अधिक महत्त्वाची असतात, तर कांही कमी महत्त्वाची असतात. त्यामुळे कोणत्या उद्दिष्टांना अधिक प्राधान्य द्यावयाचे हा निर्णय घेणारी व्यवस्था असावी लागते. अशी व्यवस्था असणे ही दुसरी पूर्वावश्यकता आहे.

समाजातील राज्यव्यवस्था (Polity or political) ही अशी निर्णय घेणारी व्यवस्था असते. कोणत्याही

समाजापुढे अनेक उद्दिष्टे असतात. उदा. संरक्षण, शिक्षण प्रसार, आरोग्य सुविधांचा विस्तार, आर्थिक विकास इत्यादी. यापैकी कोणत्या उद्दिष्टास अग्रक्रम किंवा प्राधान्य द्यावयाचे याचा निर्णय राज्यव्यवस्था घेत असते. समजा आर्थिक विकासास प्राधान्य देण्याचा निर्णय घेतल्यास मग आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी उद्योगधंदे उभारण्यास प्राधान्य द्यावयाचे की कृषीविकासास प्राधान्य द्यावयाचे याचा निर्णय घ्यावा लागतो. समजा उद्योगधंदे उभारण्यास प्राधान्य द्यावयाचा निर्णय घेतल्यास मग अवजड उद्योग उभारावयाचे की लघुउद्योग उभारावयाचे याचाही निर्णय घ्यावा लागतो. समजा आर्थिक विकासास प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला, पण अचानक परकीय आक्रमणाचा धोका निर्माण झाल्यास अशावेळी आर्थिक विकास या उद्दिष्टास तात्पुरते बाजूस ठेवून संरक्षण या उद्दिष्टास प्राधान्य देण्याचा निर्णय घ्यावा लागेल व त्यासाठी शस्त्रास्त्रे निर्मितीवर वा खरेदीवर भर द्यावा लागेल. अशी ही निर्णयव्यवस्था असणे सामाजिक व्यवस्थेची गरज ठरते.

**३) एकात्मता** (Integration) :

सामाजिक व्यवस्था ही अनेक घटकांची मिळून बनलेली असते. या विविध घटकांमध्ये एकात्मता निर्माण करणे ही सामाजिक व्यवस्थेची तिसरी पूर्वावश्यकता (गरज) आहे. अनुकूलन, उद्दिष्ट सिद्धी व प्रतिमानांचे जतन व तणावांचे व्यवस्थापन या तीन गरजा पूर्ण करण्यासाठी समाजाच्या विविध घटकांच्या कार्यात समन्वय, सुसंवाद व सहकार्य असावे लागते आणि त्यांच्यात एकात्मता असल्याशिवाय या गोष्टी निर्माण होत नाहीत. म्हणून समाजाच्या विविध घटकांमध्ये एकात्मता निर्माण करण्याचे कार्य व्यवस्थेला करावे लागते.

समाजातील न्यायव्यवस्था व धर्मव्यवस्था या एकात्मता निर्माण करणाऱ्या व्यवस्था असतात. समाजातील अन्याय, विषमता, द्वेषभावना इत्यादींना आळा घालण्याचे व पर्यायाने एकात्मता निर्माण करण्याचे कार्य न्यायव्यवस्था करीत असते. धर्मव्यवस्थादेखील एकात्मता निर्माण करण्याचे कार्य करते. धर्म सर्वांसाठी समान श्रद्धा व आचरण पुरवितो. समान श्रद्धा बाळगणाऱ्या व समान आचरण करणाऱ्या व्यक्तींमध्ये एकात्मता निर्माण होण्यास मदत होते. अलौकिक शक्ती न्यायी आहे. अशी श्रद्धा धर्माद्वारे निर्माण केली जाते. त्यामुळे द्वेषभावना कमी होऊन ऐक्य निर्माण होण्यास मदत होते. आधुनिक समाजात धार्मिक विविधता असल्याने धर्माद्वारे एकात्मता निर्माण होण्यात अडचणी येतात. त्यामुळे या समाजात न्यायव्यवस्था हीच एकात्मता निर्माण करणारी व्यवस्था प्रभावी ठरते.

**४) प्रतिमानांचे जतन आणि तणावांचे व्यवस्थापन** (Latency or Pattern Maintenance and Tention management) :

आपल्या सदस्यांच्या आंतरक्रियांच्या प्रतिमानांचे जतन करणे व त्यांच्यावर येणाऱ्या तणावाचे व्यवस्थापन करणे ही सामाजिक व्यवस्थेची चौथी पूर्वावश्यकता आहे. सामाजिक व्यवस्थेतील सदस्यांच्या आंतरक्रिया कशा असाव्यात किंवा कशा नसाव्यात याबाबतची कांही नियमने व मुल्ये (Norms & Values) समाजात रुढ झालेली असतात. सामाजिक व्यवस्थेची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी ही नियमने व मुल्ये सर्वांनी प्रमाण मानून त्यांच्यानुसार वर्तन करणे अपेक्षित असते. त्यातूनच आंतरक्रिया किंवा वर्तनाविषयीची कांही प्रतिमाने तयार होतात. सर्वांनी ही प्रतिमाने आत्मसात करावीत यासाठी सामाजिक व्यवस्था प्रयत्न करीत असते. समाजीकरण प्रक्रियेद्वारे ही

प्रतिमाने सदस्यांच्या मनावर बिंबवून त्यांचे जतन करण्याचे कार्य सामाजिक व्यवस्थेस करावे लागते. समाजातील कुटूंबव्यवस्था व शिक्षणव्यवस्था या प्रतिमानांचे जतन करण्याचे कार्य समाजीकरणाद्वारे करीत असतात.

अनेकदा नियमने व मुल्ये यांच्यानुसार वर्तन करुनही सदस्यांच्या गरजा पूर्ण होत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर ताण येतो. म्हणून ते नियमने व मुल्यांचे उल्लंघन करुन गरजा पूर्ण करण्यास प्रवृत्त होतात. त्यामुळे सामाजिक व्यवस्थेस धोका निर्माण होतो. त्यामुळे हा ताण कमी करुन सदस्यांचे मनोधैर्य वाढविण्याचे कार्य सामाजिक व्यवस्थेस करावे लागते. यासंदर्भातही कुटूंबव्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावते. तणावग्रस्तांना धीर देऊन त्यांना कार्यप्रवण करणे व त्यांच्यावरील ताण कमी करण्याचे किंवा तो सुसह्य करण्याचे कार्य कुटूंबव्यवस्था करते.

अशाप्रकारे पार्सन्सने सामाजिक व्यवस्थेचे विश्लेषण करुन तिच्या कार्यात्मक पूर्वावश्यकता सांगितलेल्या आहेत. तसेच त्या पूर्ण करणाऱ्या उपव्यवस्थांचे वा यंत्रणांचेही (संस्थांचे) विवेचन केलेले आहे.

पार्सन्स्ने आपल्या विवेचनात समाजाच्या स्थैर्याला (Stability) आत्यंतिक महत्त्व दिले असून समाजात होणाऱ्या परिवर्तनाकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. अशी टीका केली जाते, समग्र सामाजिक व्यवस्थेचे विश्लेषण करण्यात त्यांना अधिक रस असल्याचे दिसते. सामाजिक व्यवस्थेतील कर्ते (actors) हे सृजनशील व स्वतंत्रपणे विचार व वर्तन करणारे असतात. यादृष्टीकोनातून त्यांनी फारसा विचार केलेला नाही. समग्र सामाजिक व्यवस्था ही कर्त्यांना कशी नियंत्रित करते हे स्पष्ट करण्यावरच त्यांनी विशेष भर दिलेला आहे. कर्ते हे सामाजिक व्यवस्था कशी निर्माण करतात, ती कशी टिकवून ठेवतात, तिच्यात कसे परिवर्तन घडवून आणतात याचे पुरेसे विश्लेषण त्यांनी केलेले नाही. समाजाचे स्थैर्य व सातत्य यादृष्टीनेच त्यांनी सामाजिक व्यवस्थेच्या पूर्वावश्यकतांची व त्यांची पूर्तता करणाऱ्या उपव्यवस्थांची चर्चा केलेली आहे.

❖ **सामाजिक परिवर्तन** (Social Change) :

सामाजिक परिवर्तन हा समाजशास्त्रीय अभ्यासातील एक महत्वपूर्ण घटक आहे. समाज संरचेचा जसा अभ्यास समाजशास्त्रज्ञ करतात, तसाच समाजसंरचनेत होणाऱ्या परिवर्तनाचा म्हणजेच सामाजिक परिवर्तनाचाही ते अभ्यास करतात. सामाजिक परिवर्तन कसे व का घडून येते, याचे स्पष्टीकरण करणारे अनेक सिद्धांत समाजशास्त्रज्ञांनी मांडलेले आहेत. उदा. सामाजिक परिवर्तनाचा उत्क्रांतीवादी सिद्धांत, चक्रीय सिद्धांत, संघर्षवादी सिद्धांत, प्रकार्यवादी सिद्धांत इत्यादी. यापैकी प्रकार्यवादी सिद्धांताचा पुरस्कार टालकॉट पार्सन्स् यांनी केलेला आहे. पार्सन्स्ने प्रकार्यवादी दृष्टिकोनातून सामाजिक परिवर्तनाचे केलेले विश्लेषण या ठिकाणी तुम्ही थोडक्यात समजावून घेणार आहात.

❖ **समाज ही एक स्वयंस्थितीस्थापक व्यवस्था :**

पार्सन्स्ने सामाजिक परिवर्तनाचे केलेले प्रकार्यवादी विश्लेषण समजावून घेण्यासाठी प्रथम त्यांनी समाजव्यवस्थेचे केलेले विश्लेषण समजावून घेणे आवश्यक ठरते. त्यांच्या मते, समाज ही एक स्वयंस्थितीस्थापक व्यवस्था (Homeostatic system) आहे. समाज हा अनेक घटकांचा किंवा भागांचा मिळून बनलेला असून त्याचे हे घटक परस्परसंबंधित व परस्परावलंबी आहेत. समाजाला स्थिर किंवा संतुलित स्थिती (equilibrium) प्राप्त करुन

देण्यासाठी व ही स्थिती टिकवून ठेवण्यासाठी हे घटक कार्यरत असतात. अर्थात समाजाच्या सभोवताली असणाऱ्या नैसर्गिक व सामाजिक परिस्थितीचा प्रभाव समजावर पडत असतो. आणि त्यामुळे समाजाला परिपूर्ण अशी संतुलन अवस्था प्राप्त करता येत नाही. तरीदेखील त्याची मुलभूत प्रवृत्ती मात्र संतुलित स्थितीत राहण्याचीच असते. याचाच अर्थ असा की, समाजाची स्थिती ही गतिशील संतुलित अवस्थेची (dynamic equilibrium) असते. समाजात हळूवारपणे बदल होत असतात. पण या बदलांशी अनुकूलन (समायोजन) साधण्याची क्षमता समाजव्यवस्थेत असते. म्हणजे बदलांमुळे समाजव्यवस्थेचे संतुलन ढळले तरी समाज पुन्हा संतुलीत अवस्थेत येत असतो. अशाप्रकारे सतत होणाऱ्या बदलांशी वा परिवर्तनांशी समाज सतत अनुकूलन साधीत असतो. थोडक्यात पार्सन्स्च्या मते, परिवर्तनांशी अनुकूलन साधत संतुलीत स्थिती कायम ठेवण्याची क्षमता समाजव्यवस्थेत असते.

पार्सन्सच्या मते, समाजात जे परिवर्तन होते ते दोन कारणांमुळे होत असते. १) समाजाच्या सभोवताली असणारी बाह्य नैसर्गिक परिस्थिती २) समाजांतर्गत असलेली तणावाची स्थिती. समाजाच्या कांही मुलभूत गरजा असतात व त्या पूर्ण करण्याच्या यंत्रणा समाजात असतात. या यंत्रणा म्हणजे वेगवेगळ्या सामाजिक संस्था होय. एका सामाजिक संस्थेच्या कार्यात परिवर्तन घडून आले की, दुसऱ्या सामाजिक संस्थेच्या कार्यातही कांही परिवर्तने घडून येतात व त्या परिवर्तनांमुळे समाजव्यवस्था स्थिर राहण्यास, तिचे संतुलन टिकून राहण्यास मदत होत असते. उदा. औद्योगिकीकरणामुळे केंद्र कुटूंबातील पती-पत्नींना नोकरीसाठी घराबाहेर जाणे भाग पडले. त्यामुळे त्यांच्या मुलांचे समाजीकरण करण्याचे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचे कार्य केंद्र कुटूंबाला पार पाडणे कठीण झाले. पण या परिस्थितीत शाळेने आपल्या कार्याचा विस्तार केला व मुलांचे समाजीकरण करणे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे हे कार्य तिने अंगिकारले. म्हणजेच बदलत्या परिस्थितीत कुटूंबसंस्थेचे कार्य शिक्षणसंस्थेने आपल्या शिरावर घेतले. अशाप्रकारे पार्सन्स् म्हणतात की, समाजात होणाऱ्या परिवर्तनाशी समाजव्यवस्था अनुकूलन साधते व आपली संतुलनावस्था किंवा स्थैर्याची स्थिती टिकवून ठेवते.

सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात पार्सन्स्ने असेही म्हटले आहे की, प्रचलीत सामाजिक परिस्थितीविषयी लोकांच्या मनात असमाधान असेल तर ती परिस्थिती बदलण्यासाठी व्यक्ती प्रयत्न करतात. उदा. १९६० मध्ये निग्रो लोकांनी आपल्या अधिकारांच्या रक्षणासाठी अमेरिकेत मोठे आंदोलन सुरू केले. त्यामुळे अमेरिकन समाजात अस्थिरतेची स्थिती निर्माण झाली. त्या समाजाची संतुलन स्थिती बिघडली. अशावेळी निग्रोंना अधिकार देण्यासाठी कांही कायदे संमत करुन अमेरिकन समाजव्यवस्थेत आवश्यक ते बदल घडवून आणले व त्यामुळे त्या समाजाला पुन्हा स्थैर्य प्राप्त झाले, बिघडलेले संतुलन पुन्हा प्रस्थापित झाले.

❖ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न -२**

**अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.**

१) पार्सन्सच्या मते, समाजाचे वास्तविक अध्ययन कोणत्या दृष्टिकोनातून होऊ शकते?

अ) संघर्षवादी ब) उत्क्रांतीवादी

क) प्रकार्यवादी ड) प्रसारवादी

२) सामाजिक क्रियेमधील पहिला घटक कोणता आहे?

अ) उद्दिष्ट ब) परिस्थिती क) साधने ड) कर्ता

३) पार्सन्सने प्रतिमान चलाच्या किती जोड्या सांगितलेल्या आहेत?

अ) पाच ब) चार क) तीन ड) दोन

४) खालीलपैकी कोणती व्यवस्था ही अनुकूलन व्यवस्था आहे?

अ) राज्यव्यवस्था ब) अर्थव्यवस्था

क) कुटूंबव्यवस्था ड) न्यायव्यवस्था

५) पार्सन्स्च्या मते, समाजाची मुलभूत प्रवृत्ती ही कोणत्या स्थितीत राहण्याची असते?

अ) असंतुलित ब) संतुलित क) अस्थिर ड) गतिशील

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) सामाजिक क्रियेचा अर्थ सांगा.

२) सामाजिक व्यवस्था म्हणजे काय?

३) प्रतिमान चलाच्या जोड्यांची नावे सांगा.

४) उद्दिष्टांचा प्राधान्य क्रम ठरविणारी कोणती व्यवस्था आहे?

५) सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण पार्सन्सनी कोणत्या दृष्टिकोनातून केलेले आहे.

**२.२.३ रॉबर्ट मर्टनचे प्रकार्यात्मक विश्लेषणाचे संहितीकरण** (Robert Merton's Codification of Functional Analysis) –

टालकॉट पार्सन्सचे आवडते शिष्य असलेले रॉबर्ट मर्टन हे सुद्धा एक प्रख्यात अमेरिकन प्रकार्यवादी समाजशास्त्रज्ञ आहेत. आपल्या Social Theory and Social Structure (१९६७) या ग्रंथात मर्टनने प्रकार्यवादाचे सविस्तर विवेचन केलेले आहे. मॅलिनोस्की व ब्राऊन या दोन सामाजिक मानवशास्त्रज्ञांच्या प्रकार्यवादी विचारांचा प्रभाव मर्टनवर पडला. म्हणून त्याने त्या दोघांच्या प्रकार्यवादाचे सखोल अध्ययन केले. तेव्हा मर्टनच्या हे लक्षात आले की, मॅलिनोस्की व ब्राऊन यांनी आदिवासीसारख्या अविकसित, सजातीय व लघु समाजाचा अभ्यास करुन प्रकार्यवादी सिद्धांत विकसित केलेला आहे. त्यांचा हा सिद्धांत औद्योगिकदृष्ट्या विकसित असलेल्या, विजातीय स्वरुपाच्या व विशाल आकाराच्या समाजास पूर्णतः लागू करता येत नाही. म्हणून मर्टनने मॅलिनोस्की व ब्राऊन यांनी स्विकारलेली प्रकार्यवादाची गृहितके (Postulates of functionalism) अमान्य केली. आणि प्रकार्यवादी विश्लेषणाकरिता आपले स्वतःचे असे प्रकार्यवादाचे प्रतिमान (Paradigm of functionalism) प्रस्तुत केले. हे प्रतिमान ११ सुत्रांच्या रुपात स्पष्ट केलेले आहे. यालाच प्रकार्यात्मक विश्लेषणाचे संहितीकरण असे म्हणतात.

हे संहितीकरण समजावून घेण्यासाठी आपणास प्रथम मर्टनने अमान्य केलेली मानवशास्त्रीय प्रकार्यवादाची गृहितके आणि त्याने प्रकार्यवादाच्या संदर्भात मांडलेल्या कांही नवीन संकल्पना समजावून घेणे आवश्यक ठरते.

### ❖ मानवशास्त्रीय प्रकार्यवादाची गृहितके किंवा आधारभूत तत्त्वे –

मॅलिनोस्की व ब्राऊन यांनी प्रकार्यवादी विश्लेषणात पुढील तीन गृहितके स्विकारलेली आहेत.

**१) समाजाची प्रकार्यात्मक एकता** (Functional Unity of Society) :

मानवशास्त्रीय प्रकार्यवादाचे गृहित हे आहे की, ''प्रत्येक समाजात प्रकार्यात्मक एकता असते.'' ब्राऊन म्हणतात की, कोणताही व्यवहार, वर्तन किंवा रितीरिवाज हा सामाजिक व्यवस्था सुरळीतपणे चालण्यासाठी कोणते ना कोणते योगदान देत असतो. हे योगदान म्हणजेच प्रकार्य होय. सामाजिक व्यवस्थेत निश्चित प्रकारची एकता असते. सामाजिक व्यवस्थेचे सर्व घटक हे परस्परसंबंधित व परस्परावलंबी असतात. ते परस्पर सहाकार्याने कार्य करीत असतात. प्रत्येक घटक व्यवस्था टिकविण्याच्या दृष्टिने निश्चित असे योगदान देत असतो, म्हणजेच प्रकार्य पार पाडीत असतो. या घटकांमध्ये परस्पर संघर्ष नसतो. त्यामुळे समाजव्यवस्थेत प्रकार्यात्मक ऐक्य निर्माण झालेले असते.

वरील गृहितक मर्टनला मान्य नाही. या गृहितकावर टिका करताना मर्टन म्हणतो की, कोणताही व्यवहार, वर्तन, रितीरिवाज वा प्रथा समाजात ऐक्य साधण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्या ऐक्याचे प्रमाण (माप) काय आहे? एखाद्या समाजात हे ऐक्य अधिक तर एखाद्या समाजात कमी प्रमाणात असू शकेल. त्यामुळे असा प्रश्न निर्माण होतो की, अधिक किंवा कमी ऐक्य कशास म्हणावयाचे. मर्टन पुढे असे म्हणतो की, प्रत्यक्ष अनुभवाच्या विश्वात एखाद्या समाजात पूर्ण प्रकार्यात्मक ऐक्य आढळणे कठीण आहे. तो पुढे म्हणतो की, व्यवस्थेतील प्रत्येक घटक केवळ प्रकार्यच पार पाडतो असे नाही. कांही घटक हे प्रकार्याऐवजी अपकार्य (Dusfunction) पार पाडू शकतात. म्हणजेच कांही घटक व्यवस्था टिकवून ठेवण्यास योगदान देण्याऐवजी तिला बाधा आणण्याचे, तिचे विघटन करण्याचे कार्य करू शकतात. थोडक्यात मर्टनच्या मते, समाजव्यवस्थेतील कांही घटक व्यवस्था टिकविण्यासाठी नेहमीच योगदान देतात (प्रकार्य करतात) असे नाही, तर ते व्यवस्थेस बाधा देखील निर्माण करू शकतात. (अपकार्य करू शकतात.)

**२) सार्वत्रिक प्रकार्यवाद** ( Universal Functionalism) :-

मानवशास्त्रज्ञांचे दुसरे गृहितक हे आहे की, प्रकार्यवाद सार्वत्रिक स्वरुपाचा आहे. म्हणजे जगातील सर्व समाजात वा संस्कृतीत तो कोणत्या ना कोणत्या रुपात आढळतो. समाजातील प्रत्येक सामाजिक-सांस्कृतिक रुढी परंपरांचे व आदर्शांचे एक निश्चित असे प्रकार्य असते. या रुढी परंपरा व आदर्श हे समाजव्यवस्था टिकवून ठेवतात. जर त्यांचे कोणतेच प्रकार्य नसेल तर ते नष्ट होतात. या संदर्भात मॅलिनोस्की म्हणतात की, जगातील सर्व संस्कृतीमध्ये अशा सामाजिक-सांस्कृतिक रुढीपरंपरा व आदर्श आढळतात. यालाच सार्वत्रिक प्रकार्यवाद म्हणतात. थोडक्यात समाज व्यवस्थेतील प्रत्येक घटकाचे व्यवस्था टिकविण्याच्या दृष्टीने निश्चित असे प्रकार्य असते. जर एखादा घटक असे प्रकार्य पार पाडत नसेल तर तो अस्तित्त्वात राहू शकत नाही, आणि ही स्थिती सर्वच समाजाच्या संस्कृतीत आढळते.

या गृहितकावर टिका करताना मर्टन असे म्हणतात की, सार्वत्रिक प्रकार्यवादाच्या गृहितकाचे अधिक संशोधन होणे गरजेचे आहे. कारण एखादी सामाजिक-सांस्कृतिक रुढीपरंपरा, आदर्श वा रीतिरिवाज हा एखादा समुहासाठी प्रकार्यात्मक असेल तर दुसऱ्या समूहासाठी अपकार्यात्मक असू शकेल. तसेच मर्टन म्हणतो की, व्यवस्थेत एखादा घटक कोणतेही प्रकार्य पार पाडत नसतानाही अस्तित्त्व टिकवून ठेवू शकतो.

**३) प्रकार्याची अपरिहार्यता** (Indispensibility of functions) :-

मानवशास्त्रज्ञांचे तिसरे गृहितक असे आहे की, समाजव्यवस्थेच्या घटकांचे (भागांचे) प्रकार्य हे त्या व्यवस्थेसाठी अपरिहार्य वा अनिवार्य असते. एखाद्या समाजात कांही सामाजिक-सांस्कृतिक घटक अस्तित्त्वात असतात, याचाच अर्थ असा होतो की, त्या समाजाच्या दृष्टीने त्या घटकांचे निश्चित असे प्रकार्य असते, या घटकांशिवाय त्या समाजाची व्यवस्था टिकूच शकत नाही. म्हणजेच त्या घटकांचे प्रकार्य हे त्या समाजाच्यादृष्टीने अपरिहार्य असते. यासंदर्भात मॅलिनोस्की म्हणतात की, एखाद्या समाजात एखादा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक रितीरिवाज विद्यमान (प्रचलित) आहे, याचाच अर्थ असा होतो की, तो रितीरिवाज त्या समाजाची कोणतीतरी गरज पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडीत आहे. म्हणूनच तो प्रचलित आहे, जर तो प्रकार्य पार पाडीत नसेल तर तो आपोआपच समाजाने सोडून दिला असता; नष्ट झाला असता.

या गृहितकावर टीका करताना मर्टन म्हणतो की, एखाद्या घटकाचे प्रकार्य हे अपरिहार्य असतेच असे नाही. कारण एकाच प्रकारचे प्रकार्य हे वेगवेगळ्या घटकांकडून पार पाडले जाऊ शकते. म्हणजेच एखाद्या प्रकार्याला पर्याय किंवा विकल्प (Alternative) असू शकतो. मर्टन पुढे म्हणतो की, प्रकार्याच्या अपरिहार्यतेचे गृहीत तत्त्व हे लहान व मागास अशा आदिम समाजापासून घेतलेले आहे, म्हणून ते तत्त्व मर्यादित स्वरुपाचे आहे. मोठ्या व विकसित समाजात विविध घटकांच्या प्रकार्यास अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

अशाप्रकारे ब्राऊन व मॅलिनोस्कीच्या गृहीतकांतील त्रुटी दाखवून मर्टनने ती अमान्य केली आहेत. अर्थात येथे मर्टन या दोघांच्या विचारावर आक्षेप घेत असला तरी तो त्यांच्या विचारातील त्रुटी दूर करुन प्रकार्यवादी सिद्धांत हा अधिक व्यापक, सर्वच समाजांना लागू पडेल अशा पद्धतीने मांडू इच्छितो, व तसा प्रयत्न त्याने केलेला आहे.

❖ **मर्टनच्या नवीन संकल्पना** (Mertons New concepts) -

मर्टनने मानवशास्त्रीय प्रकार्यवादातील त्रुटी दूर करण्यासाठी व प्रकार्यवादी सिद्धांत अधिक व्यापक करुन तो सर्वच समाजांना लागू करता येईल, या उद्देशाने प्रकार्यवादाच्या संदर्भात कांही नवीन संकल्पना मांडल्या आहेत. त्या संकल्पना पुढीलप्रमाणे;

१. प्रकार्य (Function)

२. अपकार्य (Dysfunction)

३. न-कार्य (Non-function)

४. प्रकट प्रकार्य (Manifest function)

५. अप्रकट प्रकार्य (Lantent function)

या संकल्पना थोडक्यात समजावून घेऊ.

**१) प्रकार्य** (Function) :-

मर्टनच्या मते, प्रकार्य म्हणजे असे निरीक्षित परिणाम की जे एखाद्या विशिष्ट व्यवस्थेशी अनुकूलन किंवा समायोजन साधण्यासाठी योगदान देतात. (Functions are those observed consequences which make for the adaptation or adjustment of a given system.)

समाजव्यवस्थेच्या एखाद्या घटकाचे व्यवस्थेच्यादृष्टीने विधायक (Positive) तसेच विघातक (Negative) परिणाम असू शकतात. हा भेद दर्शविण्यासाठी कार्य (Function) या समान्य संज्ञेचे 'प्रकार्य किंवा सुकार्य' (Eufunction) आणि अपकार्य किंवा दुष्कार्य (Dysfunction) अशा दोन संज्ञा कांहीजण वापरतात. प्रकार्यवादी सिद्धांतात प्रकार्य (Function) म्हणजे सुकार्य अथवा विधायक कार्य (Eufunction) असाच अर्थ घेतला जातो.

**२) अपकार्य किंवा दुष्कार्य** (Dysfunction) :-

मर्टनच्या मते, अपकार्य म्हणजे असे निरीक्षित परिणाम की जे व्यवस्थेची अनुकूलन किंवा समायोजन क्षमता कमी करतात. (Dysfunctions are those observed consequences which lessen the adaptation or adjustment of the system.)

**३) न-कार्य** (Non-function) :-

मर्टनच्या मते, न-कार्य म्हणजे अशी परिस्थिती की, व्यवस्थेमध्ये एखादा घटक कोणतेही प्रकार पार पाडीत नसतानादेखील त्याचे व्यवस्थेमध्ये अस्तित्त्व विद्यमान असते. या घटकाच्या असण्याने किंवा नसण्याने व्यवस्थेमध्ये कांहीही फरक पडत नाही. व्यवस्था टिकवून ठेवण्याच्या किंवा व्यवस्थेस बाधा आणण्याच्या दृष्टीने त्या घटकाचे कांहीही योगदान नसते. अशा घटकाच्या संदर्भात मर्टनने न-कार्य ही संज्ञा वापरली आहे.

सामाजिक मानवशास्त्रीय प्रकार्यवादात असे मानले जाते की, प्रत्येक घटकाचे व्यवस्थेच्या संदर्भात प्रकार्य असतेच. जर ते नसेल तर तो घटक व्यवस्थेत अस्तित्त्वात राहूच शकत नाही. या मतास विरोध करुन मर्टनने न-कार्य ही संकल्पना मांडली आहे.

**४) प्रकट किंवा व्यक्त प्रकार्य** (Manifest function) :-

मर्टनच्या मते, प्रकट प्रकार्य हे असे वस्तुनिष्ठ परिणाम आहेत की, जे व्यवस्थेच्या अनुकूलनात वा समायोजनात योगदान देतात आणि जे हेतूपूर्वक असतात व व्यवस्थेत सहभागी होणाऱ्या व्यक्तींनी ते मान्य केलेले असतात. (Manifest functions are those objective consequences contributing to the adjustment or adaptation of the system which are intended and recognized by participants in the system.)

जे प्रकार्य स्पष्ट, योजनाबद्ध अपेक्षित व हेतुपूर्वक केलेले असते, त्यास मर्टन प्रकट वा व्यक्त प्रकार्य म्हणतो. उदा. विद्यार्थ्यांना व्यावसायिक ज्ञान व कौशल्य देऊन समाजातील विविध व्यवसायांना पात्र व्यक्ती पुरविणे हे तंत्रशाळेचे प्रकट प्रकार्य आहे. कारण ते स्पष्ट, योजनाबद्ध, सहेतुक व सर्वमान्य असे आहे.

**५) अप्रकट किंवा अव्यक्त प्रकार्य** (Latent function) :-

प्रकट प्रकार्याच्या उलट असणारी प्रकार्ये ही अप्रकट असतात. मर्टनच्या मते, अप्रकट प्रकार्ये हे असे परिणाम आहेत की, जे व्यवस्थेच्या अनुकूलनास वा समायोजनास योगदान देतात, पण ते हेतूपूर्वक नसतात, तसेच व्यवस्थेत सहभागी होणाऱ्या व्यक्तींना अपेक्षित नसतात. अप्रकट कार्ये ही अनियोजित, अनपेक्षित, अज्ञान म्हणजे उघडपणे न दिसणारी अशी असतात. मर्टनने अप्रकट प्रकार्याचे उदाहरण म्हणून होपी जमातीत पाऊस पडावा म्हणून केल्या जाणाऱ्या नृत्याचे उदाहरण दिले आहे. पाऊस पडणे हे या नृत्याचे प्रकट प्रकार्य आहे. मात्र या नृत्यात जमातीचे सर्व लोक सहभागी असल्याने त्यांच्यात सामाजिक ऐक्य निर्माण होण्यास मदत होते. असे सामाजिक ऐक्य निर्माण होणे हे या नृत्याचे अप्रकट प्रकार्य ठरते.

प्रकार्य (function) हे प्रकट तसेच अप्रकट अशा दोन्ही प्रकारचे असू शकते. तसेच अपकार्य (function) हे सुद्धा प्रकट व अप्रकट अशा दोन्ही प्रकारचे असू शकते. मर्टनने पाडलेले हे सर्व प्रकार पुढीलप्रमाणे मांडता येतात.

प्रकार्य (function) | अपकार्य (Dysfunction)

- प्रकार्य (function)
  - प्रकट प्रकार्य (Manifest function)
  - अप्रकट प्रकार्य (Latent function)
- अपकार्य (Dysfunction)
  - प्रकट अपकार्य (Manifest dysfunction)
  - अप्रगट अपकार्य (Manifest dysfunction)

प्रकट व अप्रकट प्रकार्यातील भेदांचे महत्त्व - प्रकट व अप्रकट प्रकार्यात पुढील भेद आहेत.

१) प्रकट प्रकार्य हे बाह्यतः तर अप्रकट प्रकार्य हे आतल्या आत क्रियाशील असते. त्यामुळे पहिले व्यक्त (उघड) तर दुसरे अव्यक्त (छुपे) असते.

२) प्रकट प्रकार्य हे स्पष्ट, सहेतुक, अपेक्षित, लोकांना मान्य व ज्ञात असे असते. याउलट अप्रकट प्रकार्य हे अस्पष्ट, असहेतुक, अनपेक्षित, लोकांना अमान्य व अज्ञात असे असते.

३) प्रकट प्रकार्यात कर्त्याला प्रकार्याची प्रेरणा, परिस्थिती व परिणाम माहित असतात, तर अप्रकट प्रकार्यात त्याला या गोष्टी माहित नसतात.

प्रकट व अप्रकट प्रकार्यात हे जे भेद (फरक) आहेत त्याचे महत्त्व मर्टनने पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे.

१) हा भेद वरवरच्या अतार्किक सामाजिक प्रतिमानाचे विश्लेषण स्पष्ट करतो - सर्वच समाजात काही

सामाजिक वर्तन व प्रथा अशा असतात की, त्यांचे प्रकट तसेच अप्रकट प्रकार्य असते. जर त्यांच्यातील भेद लक्षात घेतला नाही, तर हे वर्तन व प्रथा समाजशास्त्रीय विवेचनातून वगळल्या जाऊ शकतात व आपणास त्यांचे वास्तविक ज्ञान होणार नाही. कांही वेळा वरवरच्या विवेचनामुळे एखादे वर्तन वा प्रथा ही अतार्किक (खुळचट, निरर्थक) वाटते. तिचे समाजात कांहीच महत्त्व नाही, असेही वाटते. अशा प्रसंगी अप्रकट प्रकार्य ही संकल्पना त्या वर्तनाच्या वा प्रथेच्या गुढ व दूरगामी परिणामापर्यंत पोहचण्यास आपणास मदत करते. त्यामुळे अतार्किक व बिन महत्त्वाचे वाटणारे वर्तन वा प्रथा कांही अप्रकट प्रकार्य पार पाडत आहे, हे आपल्या लक्षात येते.

२) हा भेद आपले अवधान (लक्ष) सैद्धांतिकदृष्टीने उपयुक्त असलेल्या संशोधन क्षेत्राकडे खेचतो – प्रकट व अप्रकट प्रकार्यातील भेदाविषयी जागृत राहिल्यास आपले संशोधन केवळ वरवरच्या पातळीपुरते मर्यादित न राहाता अप्रकट प्रकार्यामुळे निर्माण झालेल्या विविध क्षेत्राकडे आपले लक्ष वेधले जाते. हा भेद लक्षात न घेतल्यास आपणाकडून ही क्षेत्रे वगळण्याची शक्तता असते. मर्टनने दाखविलेल्या प्रकट व अप्रकट प्रकार्यातील फरकामुळे अनेक संशोधकांनी अप्रकट प्रकार्यांतर्गत येणाऱ्या क्षेत्रात संशोधन करुन नवे ज्ञान शोधून काढलेले आहे. उदा. एलटन मेयो (Elton Mayo) यांनी औद्योगिक संस्कृतीत वा सभ्यतेत (Industrial civilization) आढळणाऱ्या समस्यांचे संशोधन केले व "The social problems of Industrial civilization" हा ग्रंथ प्रकाशित केला.

३) या भेदांमुळे समाजशास्त्रीय ज्ञानात महत्वाची भर पडते – समाजव्यवस्थेच्या घटकांचे अप्रकट प्रकार्य देखील असते हे माहित झाल्याने त्या प्रकार्याच्या संदर्भात संशोधन होऊन समाजशास्त्रीय ज्ञानात भर पडलेली आहे. साधारणतः आपण समाजव्यवस्थेच्या निर्मिक घटकांचे प्रकट प्रकार्य ओळखत असतो. पण जेव्हा त्या घटकांचे अप्रकट प्रकार्य आपल्या नजरेस येते, तेव्हा आपणास ज्ञानाचे नवे दालन खुले झाल्याचा अनुभव येतो. यावरुन आपल्या लक्षात येते की, सामाजिक जीवन हे दिसते तेवढे साधेसरळ नसते.

४) हा भेद समाजशास्त्रीय विश्लेषणाऐवजी नैतिक निर्णय प्रस्थापित करण्याच्या प्रवृत्तीपासून आपली सुटका करतो. कांही वेळा आपण एखाद्या सामाजिक घटकांच्या प्रकट प्रकार्याच्या आधारे त्याचे नैतिक मुल्यांकन करीत असतो. पण ते योग्य नसते. कारण ते मुल्यांकन हे त्या घटकाच्या प्रकट प्रकार्याच्या विरोधी असू शकते. म्हणून प्रकट व अप्रकट प्रकार्यातील भेद आपणास असे सूचित करतो की, केवळ प्रचलित नैतिक निर्णयाच्या मागे लागू नका; तर अप्रकट प्रकार्याच्या संदर्भातही समाजशास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न करा. उदा. केवळ बाह्य स्वरुपात विवेचन केल्यास एखाद्या समाजातील राजकीय यंत्रणा ही चांगली किंवा वाईट आहे असे वाटू शकते. पण जर त्या राजकीय यंत्रणेचे अप्रकट प्रकार्य शोधून काढल्यास ती यंत्रणा वास्तवात कशी आहे याचा शोध लागेल.

५) या भेदास संरचनात्मक महत्त्व आहे – कोणत्याही सामाजिक घटकाचे प्रकट व अप्रकट प्रकार्य जाणल्यास त्या घटकाच्या संरचनेचे स्वरुप अशाप्रकारे स्पष्ट होते की, त्या संरचनेचे स्वरुप जाणल्याने प्रकार्याची प्रभावशिलता जाणणे सुलभ होते. यासंदर्भात मर्टन म्हणतो की, राजकीय संरचनेच्या विविध घटकांचे प्रकट व अप्रकट प्रकार्यांचे योग्य पद्धतीने विश्लेषण केल्यास तिचे स्वरुप आपोआपच स्पष्ट होईल.

मर्टनचे प्रकार्यात्मक विश्लेषणाचे संहितीकरण म्हणजेच प्रकार्यवादाचे प्रतिमान –

मर्टनने कॉम्ट, स्पेन्सर, डुर्खीम, ब्राऊन, मॅलिनोस्की इत्यादींच्या प्रकार्यवादी विचाराचे सुक्ष्म अध्ययन केले. त्यांच्यापासून अनेक मुद्दे उसने घेऊन त्याने प्रकार्यात्मक विश्लेषणाचे एक प्रतिमान (Paradigm) तयार केले. त्याच्या मते, हे प्रतिमान जगातील कोणत्याही समाजाचा प्रकार्यात्मक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी वापरता येते. या प्रतिमानात ११ घटक (Items) वा सुत्रे आहेत, ती पुढीलप्रमाणे;

**१) ज्यांची प्रकार्ये शोधावयाचे आहे असे घटक** (Intemh to which functions are imputed) :-

मर्टन म्हणतो की, प्रकार्यात्मक दृष्टिकोनातून अभ्यास करताना संशोधकाने सर्वप्रथम अशा सामाजिक-सांस्कृतिक घटकांचा शोध घेतला पाहिजे, ज्यांचा तो प्रकार्यात्मक दृष्टीने अभ्यास करू इच्छितो. मर्टनच्या मते, संपूर्ण समाजशास्त्रीय विचारांना प्रकार्यात्मक विश्लेषणाच्या अंतर्गत ठेवता येते. त्यासाठी विश्लेषण वस्तुमध्ये पुनरावृत्तीचे प्रतिमान असणे गरजेचे ठरते. सामाजिक नियंत्रणाची साधने सांस्कृतिक प्रतिमान, सामाजिक संरचना, सामाजिक भूमिका, समूह संघटन, सामाजिक नियमने यासारख्या घटकांना मर्टनने प्रकार्यात्मक विश्लेषणाच्या क्षेत्रात अंतर्भूत केलेले आहे. उदा. समजा खेड्यांचे अध्ययन प्रकार्यात्मक दृष्टीने करावयाचे आहे. अशावेळी संशोधकास हे निश्चित करावे लागेल की, खेड्यातील अर्थव्यवस्था, दारिद्रय, बेकारी, कुटूंब, राजकारण, धर्मश्रद्धा यासारख्या असंख्य घटकांपैकी कोणत्या घटकाचे तो अध्ययन करू इच्छितो. जेव्हा असा घटक निश्चित होतो, तेव्हा मर्टनचे प्रतिमान पुढे सरकते.

**२) व्यक्तिनिष्ठ अभिवृत्ती, प्रेरणा आणि उद्देश यांच्या संकल्पना** (concepts of subjective dispositions motives and purposes) :-

संशोधकाने अध्ययन घटक निश्चित केला की त्याला हे ठरवावे लागते की, तो त्या घटकाचे का अध्ययन करू इच्छितो? त्यामागे त्याची प्रेरणा, अभिवृत्ती, उद्देश कोणता आहे? अध्ययनाचे कारण हे कशाप्रकारे अध्ययन घटकांशी संबंधित असलेल्या अभिवृत्तीशी जोडलेले आहे? या प्रश्नाचे उत्तर हे व्यवस्थेच्या उद्देशांना निश्चित करेल. उदा. समजा संशोधकाने राजकारण व गुन्हेगारी यांच्यातील सहसंबंधाचे अध्ययन करावयाचे निश्चित केले असेल तर साहजिकच त्याला या अध्ययनाचे कारण व त्यामागचा उद्देश काय आहे, तो कोणत्या निष्कर्षापर्यंत पोहचू इच्छितो हे स्पष्ट करावे लागेल. आपल्या ध्येयाच्याप्रती असलेली ही जाणीव प्रकार्यात्मक विश्लेषणात सहाय्यक ठरते.

**३) वस्तुनिष्ठ परिणामांची संकल्पना (प्रकार्य, अपकार्ये)** (concepts of objective consequences : functions, dysfunctions) :-

कोणत्याही घटकाचे वस्तुनिष्ठ परिणाम विविध स्वरुपी असू शकतात हे लक्षात घेतले पाहिजेत. सामाजिक-सांस्कृतिक घटकाचे परिणाम हे प्रकार्यात्मक तसेच अपकार्यात्मक असू शकतात. घटकांच्या परिणामाचे विवेचन करताना अपकार्यात्मक पैलूचाही विचार झाला पाहिजे. घटकांचे प्रकार्य वा अपकार्य हे प्रकट तसेच अप्रकट ही असू शकते, म्हणून मर्टनने प्रकार्य, अपकार्य, प्रकट प्रकार्य, अप्रकट प्रकार्य, प्रकट अपकार्य, अप्रकट अपकार्य

इत्यादी संकल्पना मांडून त्यांच्या व्याख्या दिलेल्या आहेत.

**४) प्रकार्याद्वारे उपयोगी पडणारी घटकाची संकल्पना** (concepts of unit subserved by the function) :

प्रकार्याची संकल्पना व त्याचे विश्लेषण हे एका विशिष्ट संदर्भ चौकटीच्या अंतर्गत झाले पाहिजे यावर मर्टनने भर दिला आहे. एखाद्या क्रियेचा प्रभाव एका समुहासाठी प्रकार्यात्मक व दुसऱ्या समुहासाठी अपकार्यात्मक असू शकतो. उदा. पत्नी नोकरी करुन कुटूंबाच्या उत्पन्नात भर घालते हे प्रकार्यात्मक आहे, मात्र तिच्या नोकरीमुळे मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होते, हे अपकार्यात्मक ठरते. म्हणजेच एकच घटक व्यक्ती; गट, समाज यांच्या संदर्भात वेगवेगळी प्रकार्ये वा अपकार्ये पार पाडीत असतो. म्हणून संशोधकाने प्रकार्याचा अभ्यास करताना संदर्भ कोणता आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

**५) प्रकार्यात्मक आवश्यकतांची संकल्पना : (गरजा, पूर्वावश्यकता)** (concepts of functional requirements : needs, prerequisitie) :-

संशोधकाने घटकाच्या अशा प्रकार्याचा शोध घेतला पाहिजे की, ज्याच्यामुळे व्यवस्थेच्या आवश्यकतांची (गरजांची वा पूर्वावश्यकतांची) पूर्तता होते. या आवश्यकता 'सार्वत्रिक' तसेच 'विशिष्ट' अशा दोन्ही प्रकारच्या असतात. प्रकार्यात्मक विश्लेषणात व्यवस्थेच्या आवश्यकता पूर्ण करणाऱ्या प्रकार्यांना सार्वत्रिक व विशिष्ट अशा दोन गटात विभागले पाहिजे.

**६) ज्यांच्या माध्यमातून प्रकार्यांची पूर्तता होते त्या यंत्रणांच्या संकल्पना** (concepts of machanisms through which functions are fulfilled) :-

व्यवस्थेच्या आवश्यकता (गरजा) ह्या व्यवस्थेचे अस्तित्त्व टिकवून ठेवतात. साधारणपणे या आवश्यकतांची पूर्तता कोणत्यातरी यंत्रणेमार्फत mechanisms होत असते. संशोधकाने प्रकार्यात्मक विश्लेषण करताना या यंत्रणा कोणकोणत्या आहेत हे माहित करुन घेतले पाहिजे. उदा. विवाह ही एक व्यवस्था आहे. कामवासनेची तृप्ती करणे, प्रजोत्पादन करणे इत्यादी या व्यवस्थेची उद्दिष्ट्ये वा गरजा आहेत. या गरजांच्या पूर्ततेसाठी विवाहाची निमंत्रण पत्रिका काढणे, मंडप घालणे, धार्मिक विधी पार पाडणे, आप्तमित्रांना भोजन देणे इत्यादी यंत्रणांच्या माध्यमातून विवाह समारंभ संपन्न केला जातो. संशोधकाने अशा सर्व यंत्रणा जाणून घेतल्या पाहिजेत, ज्यांच्याद्वारे प्रकार्ये पार पाडली जातात.

**७) प्रकार्यात्मक पर्यायांची (विकल्पांची) संकल्पना** (concepts of machanisms through which functions alternatives or equivalalents or substitutes) :-

मर्टन म्हणतो की, प्रकार्यात्मक अध्ययनात संशोधकाने हे जाणून घेतले पाहिजे की, एकच प्रकार्य पार पाडणारे अनेक पर्यायी वा वैकल्पिक घटक असू शकतात. म्हणजे एखादा घटक जे प्रकार्य पार पाडतो तेच प्रकार्य पार पाडणारे इतरही पर्यायी घटक असू शकतात. आदिम समाजात असे प्रकार्यात्मक पर्याय उपलब्ध नसतात. मात्र आधुनिक औद्योगिक समाजात ते मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतात. संशोधकाने या प्रकार्यात्मक पर्यायांची ओळख करुन घेतली पाहिजे.

**८) संरचनात्मक संदर्भाची किंवा दबावाची संकल्पना** (concepts of structural context or structural constraint) :-

मर्टन म्हणतो की, कोणत्याही व्यवस्थेत अनेक प्रकार्यात्मक पर्याय उपलब्ध असतात. तथापि व्यक्तीवर कांही संरचनात्मक दबाव पडत असतात. या दबावामुळे अनेक पर्यायापैकी व्यक्तीला कोणता तरी एकच पर्याय निवडावा लागतो. सामाजिक संरचना व्यक्तीवर विशिष्ट वर्तन करण्याचा दबाव टाकीत असते. जिवंत राहण्यासाठी शाकाहार प्रकार्यात्मक आहे. मात्र मांसाहार हा सुद्धा त्यासाठी एक दुसरा पर्याय उपलब्ध आहे. मात्र कांही समुहात व्यक्तीवर शाकाहार हाच पर्याय निवडण्याचा दबाव टाकला जातो. म्हणून मर्टन म्हणतो प्रकार्यात्मक विश्लेषणात संशोधकाने या संरचनात्मक दबावाची ओळख करू घेतली पाहिजे.

**९) गतिशीलतेची व परिवर्तनाची संकल्पना** (concepts of dynamics and change) :-

मानवशास्त्रज्ञांनी जो प्रकार्यवाद मांडला त्यातून असे मत बनले होते की, प्रकार्यवाद हा स्थितीशीलतेचा पुरस्कार करतो व तो गतिशीलता व परिवर्तन यांना विरोध करतो. या मतास विरोध करुन मर्टनने असे मत मांडले की, प्रकार्यवाद गतिशीलता व परिवर्तन यांचा पुरस्कार करतो. तो म्हणतो समाजव्यवस्थेच्या गरजा बदलत असतात. व त्यानुसार प्रकार्यातही विविधता येत असते, म्हणजेच बदल होत असतात. प्रकार्यात जर गतिशीलता नसेल तर व्यवस्थेचे समायोजन बिघडेल व संघर्षाची स्थिती निर्माण होईल. उदा. पूर्वी जातिव्यवस्थेत अस्पृश्यांना मंदिर प्रवेश, शिक्षण घेणे इ. अधिकार नव्हते. आज राज्यघटनेने हे अधिकार त्यांना दिले. परिणामी, संघर्ष टळला. मात्र जातीव्यवस्था आजही टिकून आहे. मात्र तिच्यात गरजेनुसार परिवर्तन झाले आहे. मर्टनने मांडलेल्या अपकार्याच्या संकल्पनेमुळे व्यवस्थेतील गतिशीलता व परिवर्तन यांचे अध्ययन करता येते.

**१०) कार्यात्मक विश्लेषणाच्या युक्ततेच्या समस्या** (Problems of validation of functional analysis):-

व्यवस्थेच्या कोणत्याही घटकाद्वारे जे प्रकार्य पार पाडले जाते, त्या प्रकार्यामुळे व्यवस्थेच्या गरजांची पूर्तता होते हे सप्रमाण सिद्ध झाले पाहिजे यावर मर्टन भर देतो. उदा. आपण असे मानतो की, विद्यापीठ ही संस्था विद्यार्थ्यांना ज्ञानाचे मोठे भांडार उपलब्ध करुन देते. प्रकार्यात्मक विश्लेषणात संशोधकाने हे सप्रमाण सिद्ध करुन दाखविले पाहिजे की, विद्यापीठ हा घटक हे प्रकार्य कशा पद्धतीने पार पाडतो, ही गरज कशा पद्धतीने पूर्ण करतो.

**११) प्रकार्यात्मक विश्लेषणातील विचारधारात्मक अंमलबजावणीच्या समस्या** (problems of ideological implications of functional analysis) :-

मर्टन म्हणतो की, प्रकार्यवाद हा कोणत्याही आर्थिक वा राजकीय विचारधारेचे समर्थन करीत नाही. तथापि, याचा अर्थ असा नाही की, प्रकार्यवाद विचारधारेपासून पूर्णतः अलिप्त आहे. संशोधक ज्या विचारधारेने प्रभावित झालेला असतो, त्यानुसार तो आपले विश्लेषण करतो. त्यामुळे संशोधनकर्त्याची सामाजिक परिस्थिती जाणून घेतली पाहिजे. प्रकार्यवादाचा अवलंब करणाऱ्या अभ्यासकाने विशिष्ट विचारधारेचे अध्ययन का करावे हे प्रश्न ज्ञानाच्या समाजशास्त्राशी (sociology of knowledge) निगडीत आहेत.

❖ **मर्टनच्या प्रकार्यवादी प्रतिमानाचे मुल्यमापन :**

हे प्रतिमान बनविण्यामागे मर्टनचे तीन उद्देश होते.

१) हे प्रतिमान प्रकार्यात्मक विश्लेषणात खूपच उपयुक्त ठरेल. कारण फारच थोड्या संकल्पनांचा वापर करुन हे प्रतिमान तयार केलेले आहे.

२) प्रकार्यात्मक विश्लेषणात येणाऱ्या सर्व मान्यतांना/कल्पनांना या प्रतिमानात सामिल करणे हा दुसरा उद्देश होता. कारण प्रकार्यात्मक विश्लेषणात या कल्पनांची निर्णायक भूमिका आहे व जोपर्यंत त्यांना पद्धतशीरपणे संहितीकरणात समाविष्ट केले जात नाही, तोपर्यंत पर्याप्त स्वरुपात विश्लेषण होऊ शकत नाही.

३) हे प्रतिमान समाजशास्त्रज्ञांनी कोणत्याही विचारधारेसाठी वापरावे हा तिसरा उद्देश होता. यादृष्टिकोनातून विचार करता हे प्रतिमान राजकारण, समाजसुधारणा, सामाजिक उन्नती, संघर्ष-निदान इत्यादीबाबतीतही वापरता येऊ शकेल. हे प्रतिमान एक प्रकारे सामाजिक अभियांत्रिकीची (social engineering) रुपरेषा आहे. मर्टनचा असा विश्वास आहे की, विशाल आकाराच्या या प्रतिमानात जगातील सर्व समाजाच्या समस्यांचा समावेश आहे.

मर्टनचे हे प्रतिमान वेबरच्या सामाजिक क्रियेच्या प्रारुपाप्रमाणे तसेच पार्सन्सच्या प्रतिमान परिवर्त्याप्रमाणे आदर्श प्रारुप आहे. जसजसे समाजशास्त्रज्ञ या प्रतिमानाचा वापर करतील तसतसे हे प्रतिमान विकसित होत जाईल. मर्टनने प्रकार्य व अपकार्य या दोन्हीस वेगळे करुन हे जे प्रतिमान बनविले आहे ते समाजशास्त्रात आगळेवेगळे असे आहे.

❖ **मर्टनच्या प्रकार्यवादावरील टीका :**

मर्टनने आपल्या प्रकार्यवादी विश्लेषणाच्या प्रतिमानाचे वा संहितेचे कितीही गुणगाण गाईले असले तरी त्यावर अनेकांनी टीका केलेली आहे, ती पुढीलप्रमाणे;

**१) पुनरुक्तीचा दोष :**

मर्टनच्या सिद्धांतात पुनरुक्तीचा दोष आढळतो. कारण त्याने तीच ती तथ्ये थोड्याफार फरकाने पुन्हा पुन्हा वापरलेली आहेत. त्याच्या प्रतिमानात घटक व संकलपना यांची गर्दी झालेली आहे. पदांचा शब्दछल केलेला असल्याने निश्चित निष्कर्षापर्यंत पोहचता येत नाही. पुनरुक्ती दोष निर्माण होण्याचे कारण असे आहे की, मर्टन प्रभावास कारण मानतो. आपल्या प्रकार्यात्मक विश्लेषणात तो धर्माची अशाप्रकारे व्याख्या करतो की धर्माचे समाजात अस्तित्त्व यासाठी आहे की तो व्यक्तींना एका नैतिक समुदायात बद्ध करेल.

**२) अभ्युपगमाचे परीक्षण कठीण आहे :**

पी.एस. कोहेन यांच्या मते, मर्टनने मांडलेल्या अभ्युपगमांचे/गृहितकांचे (hypothesises) परिक्षण करणे कठीण आहे. या अभ्युपगमांचे परीक्षण करण्यासाठी आवश्यक असणारा पुरेसा अनुभवजन्य पुरावा आहे. मात्र निगमनाचे नियम अस्पष्ट आहेत. उदा. समाजाच्या विविध व्यवहारांना संघटीत करणे हे राज्यसंस्थेचे प्रकार्य आहे या अभ्युपगमाचे परीक्षण करता येते, मात्र त्यामध्ये संकल्पनात्मक स्पष्टतेचा अभाव आहे.

**३) तुलना व सामान्यीकरणासाठी उपयुक्त नाही :**

मर्टनचे हे प्रतिमान तुलना व सामान्यीकरण करण्यासाठी उपयुक्त नाही. कारण त्याने प्रतिमानातील प्रत्येक घटक हा संपूर्ण समाजाच्या संदर्भात लागू केलेला आहे. त्यामुळे अशा संदर्भात तुलना व सामान्यीकरण करण्यास वाव राहात नाही. प्रकार्यात्मक विश्लेषणात प्रत्येक घटक विशिष्ट होतो.

**४) सिद्धांत नाही :**

अनेक विचारवंतानी (उदा. टर्नर, होमान्स कोपलर इ.) मर्टनचे प्रकार्यात्मक प्रतिमान हे सिद्धांत नाही, अशी टिका केली आहे. टर्नर म्हणतो की, प्रतिमान (paradigm) हे केव्हाही व कोणत्याही अर्थाने सिद्धांत ठरत नाही. कोपलर तर असे म्हणतो, प्रकार्यवाद हा सिद्धांत नसून अभ्यासाची एक पद्धती (method) आहे.

**५) रुढीवादी तसेच क्रांतीकारी नाही :**

मर्टन म्हणतो की, प्रकार्यवाद हा रुढीवादी (आहे ती स्थिती टिकवून ठेवणारा) आहे तसेच तो क्रांतीकारकदेखील आहे. त्याच्या मते, प्रकार्यवाद व मार्क्सवाद यांच्यात युती आहे, हे दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र गुलडनर याने मर्टनच्या या मतावर कठोर टीका केली आहे. मर्टनच्या विचाराचे अत्यंत बारकाईने अध्ययन केल्यास हा प्रश्न पडतो की जर प्रकार्यवाद मार्क्सवादी म्हणजेच क्रांतीकारक असेल तर मग तो रुढीवादी कसा असू शकेल. गुलडनर म्हणतो की, मर्टनने प्रकार्यवाद क्रांतीकारी तसेच रुढीवादीही आहे. हे ठरविण्यासाठी जे समर्थन दिलेले आहे, ते अत्यंत कमजोर आहे.

मर्टनच्या सिद्धांतावर वरील प्रमाणे टीका होत असली तरी मर्टनने सिद्धांत निर्मितीच्या क्षेत्रात स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. त्याचे प्रकार्यवादी विश्लेषणाचे प्रतिमान हे एक आदर्शप्रारुप आहे. हे प्रतिमान वस्तुतः प्रकार्यवादी सिद्धांताची व्युहरचना आहे. त्याने प्रकार्य, अपकार्य, प्रकट प्रकार्य व अप्रकट प्रकार्य या संकल्पनाची जी मांडणी केलेली आहे, ती मांडणी प्रकार्यवादी सिद्धांतास निश्चितपणे पुढे घेऊन जाणारी आहे.

❖ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न –३**

**अ) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) मर्टनने कोणत्या प्रकार्यवादाची गृहितके अमान्य केली?

अ) सावयवी प्रकार्यवाद ब) मानवशास्त्रीय प्रकार्यवाद

क) समाजशास्त्रीय प्रकार्यवाद ड) वरील सर्व

२) व्यवस्थेची अनुकूलन क्षमता कमी करणाऱ्या निरीक्षण परिणामास काय म्हणतात?

अ) प्रकार्य ब) अपकार्य क) प्रकट प्रकार्य ड) अप्रकट प्रकार्य

३) मर्टनच्या प्रकार्यात्मक प्रतिमानात किती घटक आहेत?

अ) ९ ब) १० क) ११ ड) १२

४) प्रकार्यवादी अभ्यासकाने विशिष्ट विचारधारेचे अध्ययन का करावे हा प्रश्न कोणत्या शाखेशी निगडीत आहे?

अ) विचाराचे समाजशास्त्र ब) साहित्याचे समाजशास्त्र

क) मुलभूत समाजशास्त्र ड) ज्ञानाचे समाजशास्त्र

५) मर्टनचे प्रकार्यात्मक प्रतिमान कसले प्रारुप आहे?

अ) आदर्श ब) वास्तविक क) नैतिक ड) आध्यात्मिक

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) प्रकार्य म्हणजे काय?

२) प्रकार्यवादी मानवशास्त्रज्ञांनी नावे सांगा.

३) अपकार्य ही संकल्पना कोणी सर्वप्रथम मांडली.

४) प्रकट प्रकार्याचे उदाहरण द्या.

५) प्रकार्यात्मक पर्याय (विकल्प) म्हणजे काय?

## २.२.४ प्रकार्यवादावरील टिका

आतापर्यंत तुम्ही प्रकार्यवादाचा अर्थ, गृहितके, बौद्धिक मुळे आणि पार्सन्स व मर्टन यांचे प्रकार्यवादी विचार अभ्यासलेले आहेत. यानंतर तुम्ही प्रकार्यवादावर केली जाणारी टिका अभ्यासणार आहात. अर्थात, यापूर्वी तुम्ही सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी (मॅलिनोस्की व ब्राऊन) मांडलेल्या प्रकार्यवादावर मर्टनने केलेली टिका अभ्यासलेली आहे. तसेच पार्सन्सच्या विचारावरील म्हणजेच सामाजिक क्रिया, प्रतिमान, चल इत्यादीवर केलेली टीका आणि मर्टनच्या संहितीकरणावरील टीका देखील अभ्यासलेली आहे. आता तुम्ही प्रकार्यवाद या सिद्धांतावर एकंदरीतच जी टीका केली जाते, जे आक्षेप घेतले जातात, ती टिका व आक्षेप समजावून घेणार आहात.

१९६० च्या दशकापर्यंत प्रकार्यवादी सिद्धांत समाजशास्त्रज्ञांमध्ये खूपच लोकप्रिय होता. या सिद्धांतामुळे समाजातील विविध प्रथा, परंपरा, मुल्ये, नियमने, रीतीरिवाज इत्यादींचे आकलन होण्यास मदत होते. एरवी बिनमहत्त्वाच्या किंवा निरर्थक वाटणाऱ्या प्रथा, परंपरा, मुल्ये, नियमने ही समाजाच्या दृष्टीने कशी उपयुक्त आहेत, याचे स्पष्टीकरण प्रकार्यवादामुळे मिळते. हा सिद्धांत समाजव्यवस्थेच्या घटकातील परस्परसंबंध हे स्थिर स्वरुपाचे असतात, असे मानतो. समाजव्यवस्थेची मुलभूत प्रवृत्ती ही संतुलन वा स्थैर्य राखण्याची असते, असेही हा सिद्धांत सांगतो. त्यामुळे या सिद्धांताद्वारे सामाजिक बदल मंद गतीने का होतात, लोक बदल सावकाशपणे का स्वीकारतात याचे स्पष्टीकरण होण्यास या सिद्धांतामुळे मदत होते. तसेच यासंदर्भात बॉटमोर म्हणतात की, प्रकार्यवाद सामाजिक स्थैर्य, ऐक्य, संघटन, एकजिनसीपणा इत्यादीस प्राधान्य देतो. पण परिवर्तनास विरोध करतो. स्थैर्य व परिवर्तन ह्या परस्परविरोधी प्रक्रिया असल्याने फक्त स्थैर्यास प्राधान्य देणे म्हणजे परंपरावादी समाजरचना

स्वीकारणे होय. आणि असे करणे सामाजिक विकासासाठी घातक ठरेल. एखादे विशिष्ट ध्येय साध्य करण्यासाठी घडवून आणलेल्या नियोजनबद्ध परिवर्तनाचे वेगळेच परिणाम का घडून येतात हे देखील प्रकार्यवादामुळे समजण्यास मदत होते. विविध समाजांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी देखील हा सिद्धांत उपयोगी पडतो. अशाप्रकारे अनेक दृष्टीने हा सिद्धांत उपयुक्त आहे. तथापि, या सिद्धांतावर अनेक विचारवंतानी कठोर टीका केलेली आहे. या टिकेचे स्वरुप पुढीलप्रमाणे मांडता येते;

**१) स्थैर्यावर भर :**

प्रकार्यवादावर अशी टिका केली जाते की, हा सिद्धांत समाजाच्या स्थैर्यावर, स्थितीशील स्वरुपावर खूपच भर देतो व समाजाच्या गतिशील स्वरुपाकडे म्हणजेच समाजात होणाऱ्या परिवर्तनाकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे काही विचारवंत प्रकार्यवादास रुढीवादी किंवा सनातनवादी (conservative) सिद्धांत मानतात. स्वतः प्रकार्यवादी असलेले विचारवंत **रॉबर्ट मर्टन** म्हणतात की, सामाजिक स्थैर्य व ऐक्य निर्माण करण्यावर प्रकार्यवाद जरी भर देत असला तरी कोणताही समाज स्थिर राहणे शक्य नसते. सामाजिक संबंध, रितीरिवाज, इत्यादीत कालामानानुसार बदल होत असतात. हे बदल रोखणे व सामाजिक संबंधात एकता निर्माण करणे हे समाजव्यवस्थेच्या कोणत्याच घटकास शक्य नसते. मर्टन पुढे असेही म्हणतात की, एका घटकाचे प्रकार्य हे दुसऱ्या घटकाच्या दृष्टीने अपकार्य ठरू शकते. त्यामुळे प्रकार्याद्वारे समाजात स्थैर्य व एकता निर्माण होईलच याची खात्री नाही.

**२) प्रस्थापित व्यवस्थेचे समर्थन :**

कांही टिकाकारांच्या मते, प्रकार्यवाद हा प्रस्थापित (प्रचलित) समाजव्यवस्था ही योग्य आहे असे मानून तिच्यात परिवर्तन करणे योग्य ठरणार नाही, या मताचे समर्थन करतो. प्रकार्यवाद हा अमेरिकेत विशेष लोकप्रिय झाला. त्यामुळे टिकाकार म्हणतात की, प्रकार्यवादी विचारवंत हे अमेरिकेच्या नेतृत्त्वाखाली असलेल्या आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेचे खंद्दे पुरस्कर्ते असून मार्क्सवाद्यांना अभिप्रेत असलेले परिवर्तन टाळण्यासाठी त्यांनी प्रकार्यवादी सिद्धांताचा पुरस्कार केला आहे. प्रकार्यवाद हा एक सिद्धांत न राहता एक विचारधारा (Ideology) बनला असून तो नेहमीच भांडवलदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याचे कार्य करतो अशी टिका केली गेली. यासंदर्भात एल्विन गुलडनर त्यांच्या The coming crisis of western sociology या ग्रंथात म्हणतात की प्रकार्यवादी सिद्धांत मांडणारे विचारवंत हे खोटारडे मठाधिश असून ते गरीबांच्या छाताडावर बसून श्रीमंताच्या हितसंबंधाचे रक्षण करतात. ते पुढे म्हणतात की, प्रकार्यवाद अन्य काही नसून एक समाजशास्त्रीय फसवणूक आहे. त्यामुळेच कांहीजण अशीही टीका करतात की, हा सिद्धांत दुर्बल व वंचित समाजघटकांच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरत नाही. कारण तो श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची दर्जात्मक व्यवस्था टिकवून ठेवण्याची प्रेरणा देतो.

**३) अभ्यासाच्या दृष्टीने मर्यादित सिद्धांत :**

पार्सन्ससारखे प्रकार्यवादी म्हणतात की, समाजाचे वास्तविक अध्ययन हे प्रकार्यवादी दृष्टिकोनातूनच होऊ शकते. मात्र टिकाकार म्हणतात की, अभ्यासाच्या दृष्टीने हा दृष्टीकोन मर्यादित स्वरुपाचा आहे. कारण प्रकार्यवादी दृष्टिकोनातून वर्तमानकालीन सामाजिक घटनांचा अभ्यास करता येईल, मात्र ऐतिहासिक घटनांचा

अभ्यास करण्यासाठी तो उपयुक्त ठरत नाही. मानव समाजातील संस्था, संघटना, रितीरिवाज हे भूतकाळात उदयास आलेले असतात. त्यांना काही ऐतिहासिक संदर्भ असतात. अशा ऐतिहासिक काळात उदयास आलेल्या गोष्टींचा वर्तमानकालीन परिस्थितीच्या संदर्भात या दृष्टिकोनातून अभ्यास करणे संयुक्तिक ठरणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, प्रकार्यवादी दृष्टिकोनातून साधी सरळ संरचना असलेल्या समाजांचा (उदा. आदिम समाजांचा) अभ्यास सहजपणे करता येईल. पण आधुनिक काळातील संमिश्र, संकीर्ण व विजातीय संरचना असलेल्या समाजांचा (उदा. नागर समाज) अभ्यास या दृष्टीकोनातून करणे मोठे कठीण काम आहे. उग्रवादी (Radical) विचारवंतांच्या मते, ज्या विशिष्ट कालखंडात व परिस्थितीत प्रकार्यवाद उदयास आला ती परिस्थिती सद्याच्या कालखंडात नसल्याने बदलत्या समाजाचे व त्यांच्या सामाजिक समस्यांचे अध्ययन या दृष्टिकोनातून करणे शक्य नाही. एवढेच नव्हे तर सर्व कालखंडात व सर्व परिस्थितीत प्रकार्यवादाचा यशस्वीपणे वापर करणे उपयुक्त ठरत नाही. थोडक्यात समाजाच्या अभ्यासासाठी प्रकार्यवादाची उपयुक्तता मर्यादित आहे.

**४) भ्रामक गृहीतके :**

लोकपद्धतीशास्त्रीय विचारवंतांच्या (Ethonomethodologists) मते, समाजव्यवस्था ही स्थिर स्वरुपाची असते हे प्रकार्यवाद्यांचे गृहितक भ्रामक किंवा चुकीचे आहे. कारण बदलत्या परिस्थितीनुसार सामाजिक घडामोडींचे स्वरुपही बदलत असते. त्यामुळे प्रकार्यवादी दृष्टिकोनातून सामाजिक वास्तवतेचे निश्चित स्वरुप स्पष्ट करता येत नाही. यासंदर्भात प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ श्रीमती रुथ बेनडिक्ट म्हणतात की, प्रकार्यवाद हा सांस्कृतिक सजातीयता (Cultural homogeneity) निर्माण करण्यावर भर देतो. पण आजच्या दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे लोकांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर होत असल्याने कोणत्याही समाजात सांस्कृतिक सजातियता निर्माण होणे शक्य नाही.

**५) संघर्षाकडे दुर्लक्ष :**

प्रकार्यवादी विचारवंतांच्या मते, स्थैर्य, संतुलन, ऐक्य इत्यादी समाजाचा स्थायीभाव आहे. मात्र संघर्षवादी विचारवंतांना हे मान्य नाही. त्यांच्या मते, संघर्ष हा समाजजीवनाचा स्थायीभाव आहे. ते म्हणतात, समाज घटकांत नेहमीच संतुलन असते असे मानणे हा एक भ्रम आहे. सर्वच समाजांच्या घटकांच्या हितसंबंधात विरोध वा संघर्ष असतो. हेच सामाजिक वास्तव आहे. त्यामुळे समाजाचे वास्तविक अध्ययन करण्यासाठी प्रकार्यवाद उपयुक्त नाही. समाजाचे वास्तविक अध्ययन हे संघर्षाच्या संदर्भातच करता येईल असे कोझर, गालटुंग, डऱ्हेनडर्फ इत्यादी विचारवंत म्हणतात. यासदंर्भात **पी.एस.कोहेन** म्हणतात की, प्रकार्यवाद हा व्यवहारापेक्षा आदर्शावर जास्त जोर देतो. संघर्षाचे महत्त्व कमी करुन स्थिर व शांततामय समाज निर्माण करण्यावर भर देतो. पण व्यवहारात कोणताही समाज स्थिर व शांत नसतो. प्रकार्यवाद केवळ उपयुक्ततावादावर भर देत असल्याने तो तौलनिक अभ्यासासाठी उपयोगी ठरत नाही.

**६) पक्षपाती सिद्धांत**

**जॉन रेक्स** यांच्या मते, प्रकार्यवाद हा पक्षपात करणारा सिद्धांत किंवा दृष्टिकोन आहे. कारण तो व्यक्तीगत मुल्यांकडे दुर्लक्ष करतो व सामाजिक मुल्यांवर विशेष लक्ष देतो. जीवनाचे व्यक्तीगत जीवन व सामाजिक जीवन

असे दोन भाग पडत असले तरी व्यक्तीगत जीवनातील मुल्यांचा सामाजिक जीवनावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे या दोन्ही भागांमध्ये निश्चित सीमारेषा आखणे कठीण असते. त्यामुळे प्रकार्यवादी सामाजिक जीवनावर जो विशेष भर देतात ते योग्य धोरण नसून पक्षपातीपणाचे धोरण ठरते.

**७) व्यक्तीची उपेक्षा :**

एन्थोनी गिडीन्सच्या मते, प्रकार्यवाद हा समाजाचे स्वरुप समजून घेण्यासाठी उपयुक्त नाही. कारण प्रकार्यवाद हा अशा प्रक्रियांची उपेक्षा करतो, ज्या संरचनेची निर्मिती करतात आणि अशा प्रक्रियांवर विनाकारण जोर देतो, ज्या संरचनेच्या बाहेर आहेत. गिडीन्सच्या मते, संरचनेमध्ये व्यक्तीची (Agent) भूमिका महत्त्वाची आहे. व्यक्तीच संरचनेची निर्मिती करतात, तिला निरर्थकही बनवितात आणि तिची पुनर्निर्मितीही करतात. परंतु प्रकार्यवादात व्यक्तींना कोणतेच स्थान देत नाही. तो व्यक्तींची उपेक्षा करतो.

**८) संभ्रम :**

प्रकार्यवाद हा अभ्यासकांमध्ये संभ्रम निर्माण करतो अशी ही टिका केली जाते. कारण स्पेन्सरसारख्यानी प्रकार्यवादाचे स्पष्टीकरण अत्यंत सुलभ व सरळ पद्धतीने केलेले आहे. तर पार्सन्ससारख्यानी त्याचे स्पष्टीकरण अत्यंत क्लिष्ट व कठीण पद्धतीने केलेले आहे. त्यामुळे प्रकार्यवादाचे स्वरुप समजावून घेताना अभ्यासकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. ते गोंधळून जाऊ शकतात.

## २.३ सारांश :

या घटकात तुम्ही सर्वप्रथम प्रकार्यवादाचा अर्थ व स्वरुप थोडक्यात समजावून घेतलेले आहे. त्यानंतर प्रकार्यवादाची बौद्धिक मुळे ज्या समाजशास्त्रज्ञांच्या विचारात आहेत, त्यांच्या विचाराचे थोडक्यात आकलन करुन घेतलेले आहे. त्यामध्ये कॉम्त, स्पेन्सर, डुर्खीम हे समाजशास्त्र व मॅलिनोस्की व ब्राऊन हे सामाजिक मानवशास्त्रज्ञ इत्यादींचा समावेश होतो. त्यानंतर तुम्ही प्रकार्यवादाचे प्रमुख आधार वा गृहितके कोणती आहेत, हे समजावून घेतलेले आहे. पुढे तुम्ही टालकॉट पार्सन्सचा प्रकार्यवाद अभ्यासलेला आहे. त्यासाठी त्यांचा सामाजिक क्रियेचा सिद्धांत, प्रतिमान चल ही संकल्पना, समाजिक व्यवस्थेच्या पूर्वावश्यकता वा गरजा वा समस्या (AGIL) आणि सामाजिक परिवर्तन यांचा ऊहापोह केलेला आहे. पार्सन्स् नंतर रॉबर्ट मर्टन यांनी मांडलेल्या प्रकार्य, अपकार्य, व्यक्त कार्य, अव्यक्त कार्य या चार संकल्पना व त्याने दिलेले प्रकार्यवादाचे प्रतिमान (संहितीकरण) समजावून घेतलेले आहे. सर्वात शेवटी तुम्ही प्रकार्यवादावर करण्यात आलेल्या टीका समजावून घेतलेल्या आहेत.

## २.४ पारिभाषिक संज्ञा :

● सावयवी - अनेक अवयव असलेला सजीव.

● देवकप्रथा - प्रत्येक कुलाचे एक चिन्ह किंवा प्रतिक म्हणून एखाद्या वस्तूची पूजाअर्चा करण्याची प्रथा

- संकीर्ण - गुंतागुंत
- अनुकुलन - मिळतेजुळते घेण्याची प्रक्रिया
- अलौकिक शक्ती - मानवापेक्षा श्रेष्ठ असलेली दिव्य शक्ती
- सामाजिक परिवर्तन - समाजाच्या संरचनेत होणारे परिवर्तन
- संतुलित स्थिती - समतोलाची स्थिती
- केंद्र कुटूंब - पती-पत्नी व त्यांची अविवाहीत अपत्ये एवढेच सदस्य असलेले कुटूंब
- औद्योगिकीकरण - मोठमोठे अवजड उद्योगधंदे उभारण्याची प्रक्रिया
- गृहितके - सत्य आहेत अशी मानली जाणारी तत्त्वे
- धर्मव्यवस्था - श्रद्धा व विधी यांची व्यवस्था
- न्यायव्यवस्था - कायद्याचा अर्थ लावून कायदेभंग करणाऱ्यास शिक्षा सुनावणारी व्यवस्थ
- अभिवृत्ती - मनोवृत्ती
- युक्ततेची समस्या - प्रामाण्याची किंवा उचिततेची समस्या
- सामान्यीकरण - सामान्य विधान करण्याची क्रिया

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

❖ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक-१ ची उत्तरे**

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) ड २) ब ३) अ ४) क ५) अ

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) समाजव्यवस्थेचा प्रत्येक घटक समाजव्यवस्थेची कोणती तरी गरज पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडतो असे प्रतिपादन करणारा सिद्धांत म्हणजे प्रकार्यवाद होय.

२) हर्बट स्पेन्सर

३) एमिल डुर्खीम

४) मॅलिनोस्की

५) ब्राऊन

❖ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक–२ ची उत्तरे**

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) क  २) ड  ३) अ  ४) ब  ५) ब

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सामाजिक क्रिया म्हणजे असे वर्तन की, ज्याचा हेतु कोणते तरी उद्दिष्ट साध्य करणे हा असतो.

२) कर्त्यांमधील आंतरक्रियेच्या प्रक्रियाची व्यवस्था म्हणजे सामाजिक व्यवस्था होय.

३) प्रतिमान चलाच्या २ जोड्याची नावे पुढीलप्रमाणे;

अ) भावात्मक विरुद्ध भावात्मक उदासिनता

ब) स्वअभिमुखता विरुद्ध सामुदायिक अभिमुखता

४) राज्यव्यवस्था

५) प्रकार्यवादी

❖ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक–३ ची उत्तरे**

**अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे**

१) ब  २) ब  ३) क  ४) ड  ५) अ

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) प्रकार्य म्हणजे असे निरीक्षण परिणाम की, जे एखाद्या विशिष्ट व्यवस्थेशी अनुकूलन साधण्यासाठी योगदान देतात.

२) मॅलिनोस्की व ब्राऊन

३) रॉबर्ट मर्टन

४) विद्यार्थ्यांना व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये देऊन समाजातील विविध व्यवसायांना पात्र व्यक्ती पुरविणे हे तंत्रशाळेचे प्रकट कार्य आहे.

## २.६ स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.**

१) प्रकार्यवादाची बौद्धिक मुळे विशद करा.

२) पार्सन्सच्या 'सामाजिक क्रिया' या सिद्धांताचे सविस्तर स्पष्टीकरण करा.

३) पार्सन्सच्या प्रतिमान चलाची चर्चा करा.

४) रॉबर्ट मर्टनचे प्रकार्यात्मक विश्लेषणाचे संहितीकरण स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१) सामाजिक मानवशास्त्रांचा प्रकार्यवाद

२) एजीआयएल

३) पार्सन्सचे सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण

४) प्रकार्यवादावरील टिका

## २.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भग्रंथ :


1) Abraham M. Francis (1993) - Modern sociological Theory An introduction, Oxford university press, Delhi.

2) George Ritzer (2000) - Sociological Theory, Mc Grawhill New York.

3) Jona than H. Turner (1995) - The Structure of sociological Theory (Vinedition) Jaipur & New Delhi.

4) Randall Collins (1997) - Sociological Theory (Indian edition), Jaipur & New Delhi Rawat.


❖ ❖ ❖

## घटक – ३

# संघर्षवाद सिद्धांत

**(Conflict Theory)**

**घटक संरचना :**

३.०. उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे

३.२.१.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

३.२.२ राल्फ डन्हेनडॉर्फ यांचा संघर्षवादी सिद्धांत

३.२.२.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

३.२.३ लुईस कोझर यांचा संघर्षवादी सिद्धांत

३.२.३.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

३.२.४ रेन्डॉल कॉलीन्स यांचा संघर्षवादी सिद्धांत

३.२.४.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

३.३ सारांश

३.४ पारिषाषिक संज्ञा.

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे.

३.६ सरावासाठीचे प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठीची पस्तके.

### २.० उद्दिष्टे

संघर्ष सिद्धांताचे स्वरूप जाणून घेत असताना आपण खालील विविध समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या संघर्ष सिद्धांताबाबतची त्यांची मते जाणून घेणार आहोत. त्यामध्ये या सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे तसेच राल्फ डन्हेनडॉर्फ, लुईस कोझर आणि रेन्डॉल कॉलीन्स यांची विचारसरणी समजावून घेणार आहोत.

### ३:१ प्रस्तावना :

घटक क्र. २ मध्ये प्रकार्यवाद (Functionalism) जाणून घेतल्यानंतर आपण समाजशास्त्रामध्ये अभ्यासल्या जाणाऱ्या घटक क्र. ३ मध्ये संघर्षवादी सिद्धांताचे स्वरूप जाणून घेणार आहोत. आपणाला माहितच आहे की, समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये समाजरचनेचे स्वरूप आणि मानवी संबंधाचे स्वरूप यासंदर्भातील समाजशास्त्रीय दृष्टीकोन भिन्न भिन्न आहेत. टालकॉट पारसन्स यांच्या मते, रचनात्मक कार्यात्मक सिद्धांतामध्ये समाजव्यवस्था टिकून राहण्यासाठी ज्या घटकांवर भर देण्यात आला तेच घटक प्रामुख्याने समाजामध्ये अव्यवस्था आणि परिवर्तन घडवून आणण्यामध्ये कारणीभूत ठरत असतात. यातूनच समाजात संघर्षाची सुरूवात होते. उदा. सरंजामशाहीतील सरंजामदार आणि भूदास अथवा गुलाम, जमीनदारी व्यवस्थेमधील जमीनदार आणि भूमिहीन शेतमजूर तर सध्याच्या भांडवलशाहीमधील भांडवलदार आणि कामगार यांच्यातील संघर्षयुक्त वातावरण या पार्श्वभूमीवर डेव्हीड लुकहूड या विचारवंताने असे म्हटले आहे की, कोणत्याही मानव समाजव्यवस्थेत अशा स्वरूपाची यंत्रणात्मक रचना असते की, ज्यामुळे त्या समाजात अथवा समाजव्यवस्थेत उभयवर्गामध्ये संघर्ष अटळ असतो व तो नेहमी चालूच राहतो.

संघर्षवादी सिद्धांतामध्ये समाजातील विषमता आणि अधिकाराचे स्वरूप या घटकांची रचना नियोजनबद्ध अशी होत असतल्याने सत्ताधिश वर्ग हा सत्ताविहीत वर्गाची कायमपणे गाळचेपी करतो. यालाच सत्ताविहिन वर्गाचे शोषण असे म्हटले जाते. थोडक्यात या सिद्धांतामध्ये समाजातील सामाजिक संबधांचे स्वरूप आणि समाजरचनेचे स्वरूप हे या समाजातील आर्थिक दबाव तंत्रामुळे निश्चित होत असते असे मत मांडण्यात आले. जो वर्ग आर्थिकदृषट्या सक्षम असतो (उदा. सरंजामदार, जमीनदार आणि भांडवलदार) अशा वर्गाची समाजातील उत्पादन साधनांवर पूर्णत: मालकी असते. हा वर्ग नेहमी उत्पादन साधनांवर मालकी नसणाऱ्या सत्ताविहीन वर्गाचे (उदा. भूदास किंवा गुलाम, भूमिहीन शेतमजूर आणि कामगार) आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या शोषण करतो. अर्थातच त्यामुळे सत्ताधिश आणि सत्ताविहीन वर्गामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होते. अशी परिस्थितीच समाजात संघर्ष निर्माण करते.

### ३.२ विषय विवेचन :

संघर्षवादी सिद्धांत या तिसऱ्या घटकामध्ये एकूण चार उपघटकांचा समावेश असून प्रथम उपघटकामध्ये संघर्षवादी सिद्धांताची पाळेमुळे अभ्यासली जाणार आहेत. दुसऱ्या घटकामध्ये राल्फ डऱ्हेनडॉर्फ यांचा संघर्षवादी सिद्धांत विचारात घेतला जाणार आहे. तिसऱ्या उपघटकामध्ये लुईस कोझर यांचा संघर्षवादी सिद्धांत तर चौथ्या उपघटकामध्ये रेन्डॉल कॉलीन्स यांचा संघर्षवादी सिद्धांत विचारात घेतला जाणार आहे. थोडक्यात संघर्षवादी सिद्धांताच्या वरील सर्व उपघटकांद्वारे समाजातील परिवर्तन अथवा बदलाच्या प्रक्रियेमध्ये संघर्ष का घडून येतो? अथवा संघर्ष घडून येण्यामध्ये सत्ताधिश आणि सत्ताविहीन वर्गाची भमिका कशी असते? याचा आढावा घेतला जाणार आहे.

#### ३.२.१ संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे (Intellectual Roots of Conflict Theory) :

समाजशास्त्रातील संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे जर्मन विचारवंत कार्ल मार्क्स आणि जॉर्ज सिमेल

या दोन अभ्यासकांच्या विचारांशी संबधित असल्यामुळे आपणास त्यांची संघर्षवादी सिद्धांतासंबंधीची विचारसरणी समजावून घ्यावी लागेल. कार्ल मार्क्सने त्यांच्या विचारामध्ये मानव समाजात 'सत्ता' या घटकांची भूमिका विषद करताना पुढील मते मांडली. उदा. समाजातील सत्ता जेव्हा एकाच वर्गाकडे एकवटली जाते तेव्हा दुसरा सत्ताविहीन वर्ग संघर्षाची भूमिका घेतो. भांडवलशाही मध्ये आज देखील अशा प्रकारचा वर्ग संघर्ष पहावयास मिळतो. कार्ल मार्क्सच्या मते, असा वर्ग संघर्ष प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. यातील उत्पादित साधनांची मालकी असणारा वर्ग ''**शोषक वर्ग**'' (Exploiter) म्हणून ओळखला जातो. तर दुसरा वर्ग ''**शोषित वर्ग**'' (Exploited) म्हणनू ओळखला जातो. या दोन वर्गातील संघर्षाचा परिणाम म्हणजे त्यातून एक नवीन समाज व्यवस्था उदयास येते. कार्ल मार्क्सने अशा समाजव्यवस्थेला समाजवादी रचना (Communism structure) असे संबोधिले. मार्क्सच्या मते, समाजवादी रचना आर्थिक समानता प्रस्थापित करते. त्यामुळे समाजातील आर्थिक विषमता कमी होऊन श्रमिक वर्गाची पिळवणूक थांबते.

जॉर्ज सिमेल या विचारवंताने संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे यासंदर्भात पुढील विचार मांडले. यांच्या मते, संघर्ष हा एक मानवी वर्तनप्रकार अथवा एक सामाजिक प्रतिमा असून तिचे स्वरूप सार्वत्रिक असते. तसेच ते प्रत्येक व्यक्तीनुसार भिन्न भिन्न असू शकते. उदा. श्रेष्ठ, कनिष्ठ, स्पर्धा, अनुकरण, श्रमविभाजन, व्यक्तीवादी इत्यादी. सिमेलच्या मते, एखाद्या समाजातील समूहाच्या आकारावरून त्या समूहातील सदस्यांच्यामध्ये असणारे मतभेद आणि सत्तेचे विषम वितरण समजू शकते.

कार्ल मार्क्स आणि जॉर्ज सिमेल या दोन जर्मन समाजशास्त्रज्ञांनी संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे खालीलपमाणे सांगितली.

**अ) संपत्तीचे महत्त्व :**

भांडवलशाही समाजव्यवस्थेत व्यक्तीचे वर्तन हे तिच्या संपत्तीशी असलेल्या संबंधावरून ठरते. तसेच अशा समाजातील व्यक्तींचे स्थान तिच्या आर्थिक उत्पादनाच्या साधनांच्या मालकी हक्कावरून ठरते. यातील एक वर्ग सत्ताधिश असतो तर दुसरा वर्ग सत्ताविहीन असतो. त्यामुळे या उभय वर्गामध्ये संघर्षयुक्त वर्ग-जाणिव तसेच विषमता निर्माण होते. ती कमी करण्यासाठी समाजवादी रचना अथवा साम्यवाद येण्याची खूप गरज भासते. प्रत्यक्षात असे घडेल याची खात्री देता येत नाही.

**ब) कामगारवर्गामध्ये संघर्षयुक्त वर्ग जाणिवेची निर्मिती :**

संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे यातील महत्त्वपूर्ण बाब म्हणजे भांडवलशाही समाजव्यवस्थेत कामगार वर्गामध्ये भांडवलदार वर्गाविषयी संघर्षयुक्त वर्ग जाणिवेची निर्मिती होत जाते. यातूनच वर्ग कलह वाढत जातात. भांडवलदार वर्गाची 'बळी तो कान पिळी' अशी मक्तेदारी निर्माण होते. यातून श्रमिक वर्गातील असंतोष वाढत जातो आणि तो वर्ग संघर्षातून प्रकट होतो. वर्ग संघर्षाची परिणती शेवटी क्रांतीकारी पविर्तनात होत असते.

**क) दारिद्र्य अथवा गरीबीमध्ये वाढ :**

कार्ल मार्क्सच्या मते, भांडवलशाही समाजव्यवस्थेत भांडवलदारांच्याकडून श्रमिक अथवा कामगार वर्गाची जी आर्थिक पिळवणूक केली जाते, की ज्यामुळे दारिद्र्यामध्ये सतत वाढ होत असते. अशा उत्पादन प्रक्रियेत कामगारांना रोजच्या किमान गरजा देखील पूर्ण करता येत नाहीत. त्यातूनच उपासमार, आजार, भूकबळी यांचे प्रमाण वाढत जाते. त्याचा गंभीर परिणाम म्हणजे श्रमीकांची आर्थिक परिस्थिती अधिकाधिक बिकट होत जाते. याउलट भांडवलदार वर्गाचे जीवन ऐषआरामी बनते.

**ड) दुरावा किंवा आलगता :**

श्रमिकांची आर्थिक पिळवणूक आणि कामाच्या ठिकाणची अयोग्य परिस्थिती इत्यादीमुळे कामगार वर्गाला त्याचे काम, निर्माण होणाऱ्या वस्तू आणि त्यांचे सहकारी व भांडवलदार वर्ग यांच्यामध्ये दुरावा निर्माण होतो. आपुलकीची भावना कमी होते. एकूणच उत्पादन प्रक्रियेविषयी अनास्था निर्माण होते. संघर्षवादाला असा दुरावा नेहमीच खतपाणी घालतो.

**इ) आर्थिक व राजकीय सत्ता आणि अधिकार यांचे एकत्रीकरण (सत्तेचे केंद्रीकरण) :**

संघर्षवादी सिद्धांतामधील सर्वात महत्त्वपूर्ण आणि ठळक बौद्धीक पायामुळ म्हणून सत्तेचे केंद्रीकरण याचा उल्लेख करण्यात अला आहे. कार्ल मार्क्सच्या मते, भांडवलशाही समाजव्यवस्थेत सामाजिक वर्ग हे मालमत्तेच्या मालकी हक्कांवरून ठरतात. ज्यांच्या हातात आर्थिक सत्ता असते त्यांना राजकीय सत्ता मिळविणे अवघड नसते. भांडवलदार वर्गाकडून राजकीय सत्तेचा वापर स्वत:चे हितसंबंध सुरक्षित ठेवणे, कामगार वर्गावर सत्ता गाजविणे अथवा त्यांची पिळवणूक करणे यासाठी केला जातो. एका अर्थी अशा समाजव्यवस्थेत केवळ भांडवलदार वर्गाकडेच आर्थिक व राजकीय सत्ता आणि अधिकार यांचे केंद्रीकरण झालेले असते. कामगार वर्ग मात्र याबाबतीत वंचित होतो. यातूनच उभय वर्गामध्ये संघर्ष भावना वाढीस लागते.

**फ) साम्यवादाचा उदय :**

जेव्हा उत्पादन प्रक्रियेत कामगार वर्गाची सत्ता स्थापित होईल तेव्हा मालमत्ता ही संपूर्ण समाजाच्या मालकीची होईल. संपत्तीच्या खाजगी मालकी हक्कातील विषमतेमुळे निर्माण होणारी वर्ग व्यवस्था नष्ट होईल आणि वर्गविरहीत अथवा संघर्षविरहीत समाज उदयास येईल. यालाच कार्ल मार्क्सने साम्यवाद किंवा समाजवाद (Socialism) असे संबोधिले, अशा साम्यवादामध्ये राज्यव्यवस्था नामशेष होऊन प्रत्येक व्यक्तीला तिच्या गरजेप्रमाणे गोष्टी मिळतील. प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या कुवतीनुसार उत्पादन प्रक्रियेत सहभागी होईल.

**३.२.१.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

१) संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे कोणत्या जर्मन विचारवंतांच्या विचारांशी संबंधीत आहेत?

२) कार्ल मार्क्सने संघर्षवादी सिद्धांतामध्ये मानव समाजातील कोणत्या घटकांची भूमिका विषद केली?

३) भांडवलशाहीमध्ये कोणते दोन वर्ग आढळतात?

४) मार्क्सच्या मते, आर्थिक समानता केव्हा प्रस्थापित होते ?

५) जॉर्ज सिमेल याने संघर्षाचा उल्लेख कसा केला?

६) संघर्षवादी सिद्धांताची दोन बौद्धीक पाळेमुळे कोणती?

७) संघर्षवादी सिद्धांतानुसार भांडवलदार वर्गाची वृत्ती कशी आढळून येते ?

८) भांडवलशाही समाज व्यवस्थेत सामाजिक वर्ग कशावरून निश्चित होतात ?

९) साम्यवाद म्हणजे काय ?

### ३.२.२ राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांचा संघर्षवादी सिद्धांत :

जर्मन विचारवंत राल्फ डऱ्हेनडॉर्फ यांनी कार्ल मार्क्सपेक्षा आपला संघर्षवादी सिद्धांत वेगळ्या पद्धतीत मांडला आहे. त्यांच्या मते, मानव समाजातील संघर्षाला केवळ त्या समाजातील आर्थिक घटकच जबाबदार नसतात तर त्याचबरोबर समाजातील **राजकीय सत्तेचे असमान वितरण** हेच संघर्षाचे महत्त्वाचे कारण असते. प्रत्येक मानव समाजात केवळ संघर्ष असतोच असे नाही, तर संघर्षासोबत परस्पर सहमती सुद्धा आढळते. राल्फ डऱ्हेनडॉर्फ यांनी सत्ता या घटकांचे विश्लेषण करताना समाजातील व्यक्तीना मिळणारी विविध पदे आणि पदांच्या सोबत व्यक्तीला मिळणारे अधिकार या दोन घटकांचा उल्लेख केला आहे. याचा अर्थ संघर्षाचा मूळ आधार हा पद आणि अधिकार या दोन प्रमुख घटकांवर आधारीत असतो. समाजातील वेगवेगळ्या प्रकारची पदे आणि त्या पदावरील व्यक्तीकडून पार पाडल्या जाणाऱ्या भूमिका यावरून त्या ठिकाणच्या समाजामध्ये सत्ता आणि अधिकारासंबंधीचा संघर्ष निर्माण होत असतो.

राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांनी आपल्या संघर्षवादी सिद्धांताचे सविस्तर विश्लेषण करताना अधिकार (Authority) या घटकाला प्राधान्य देऊन अधिकारा संबंधीचा विचार पुढीलप्रमाणे मांडला. त्यांच्या मते, अधिकाराचे विश्लेषण हे नेहमी श्रेष्ठ आणि कनिष्ठ यांच्या संबंधातून होत असते. श्रेष्ठ अथवा उच्च पदस्थ अधिकारी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराद्वारे कनिष्ठांवर नेहमीच नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात. अर्थातच कनिष्ठांना वरिष्ठ अधिकारांच्या नियंत्राखाली काम करावे लागते. साहजिकच अधिकाराचा वापर हा केवळ प्राप्त झालेल्या पदाप्रमाणे विशिष्ट मर्यादिपर्यंत करता येतो. त्यामुळेच राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांनी अधिकारांना कायद्याचे पाठबळ असते असा वैशिष्ट्यपूर्ण विचार मांडला.

राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांच्या मते, प्रत्येक समाजरचनेमध्ये अधिकार आणि त्या संबंधीची व्यवस्था महत्त्वाची मानली जाते. अधिकाराचे स्वरूप आणि प्रकार यांचे वेगवेगळे स्वरुप आढळते. अर्थात स्वत:ला मिळणाऱ्या अधिकारामध्ये उच्च पदस्थ व्यक्ती कनिष्ठांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. त्यातूनच

उभय वर्गामध्ये संघर्ष भावना वाढत जाते. अधिकार पदावर असणारी व्यक्ती जेव्हा तिच्या पदावरून दूर होते तेव्हा अशा उच्च पदस्थ व्यक्तीचे अधिकार देखील संपुष्टात येतात. उदा. विद्यापीठातील कुलगुरू अथवा महाविद्यालयातील प्राचार्य जेव्हा सेवानिवृत्त होतात तेव्हा त्यांच्याकडील अधिकार आपोआप संपुष्टात येतात.

शेवटी राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांनी आपल्या संघर्षवादी सिद्धांतामध्ये पुढील प्रमुख विचारांवर भर दिला आहे. त्यांच्या मते, भांडवलशाही समाजव्यवस्थेमध्ये वरिष्ठ पदावर असणाऱ्या व्यक्तीना जे अमर्याद अधिकार मिळालेले असतात की, ज्यामुळे अशा उच्च पदस्थांची भूमिका श्रमिकांची आर्थिक पिळवणूक अशी निर्माण होते. त्यातूनच उभय वर्गातील संघर्षाचे प्रमाण वाढत जाते.

**३.२.२.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

१) राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांनी संघर्षाला जबाबदार असणारा कोणता घटक सांगितला ?

२) डऱ्हेन डॉर्फ यांनी सत्ता या घटकाचे विश्लेण समाजातील कोणत्या प्रमुख घटकांच्या आधारे केले आहे?

३) डऱ्हेन डॉर्फ यांच्या मते, अधिकाराचे विश्लेषण कोणत्या संबंधातून होत असते?

४) राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांच्या मते, अधिकाराचा वापर कुठेपर्यंत करता येतो ?

५) अधिकाराना कशाचे पाठबळ असते? असे डऱ्हेन डॉर्फ यांनी म्हटले आहे.

६) उच्च पदस्थ व्यक्तीचे अधिकार केव्हा संपुष्टात येतात ?

७) भांडवलशाही समाजव्यवस्थेत उच्च पदावरील व्यक्तीची भूमिका कशी असते?

## ३.२.३ लुईस कोझर यांचा संघर्षवादी सिद्धांत :

संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमुळे स्पष्ट करताना कार्ल मार्क्स आणि जॉर्ज सिमेल यांनी मांडलेली मते समजावून घेतली. राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांचा संघर्षवादी सिद्धांत अभ्यासल्यानंतर लुईस कोझर यांचा संघर्षवादी सिद्धांत समजावून घ्यावयाचा आहे. यासाठी प्रथमत: आपणास लुईस कोझर यांची संघर्षवादी विचारसरणी, त्यांच्या मते संर्षाचा अर्थ, संघर्ष निर्माण होण्याची कारणे आणि संघर्षाचे परिणाम समजावून घ्यावयाचे आहेत.

लुईस कोझर यांनी लिहिलेल्या "The functions of social conflict" या ग्रंथामध्ये संघर्षवादी सिद्धांताचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे. लुईस कोझर यांच्या मते, ''संघर्ष म्हणजे मानवी मूल्यांच्यामधील लढा असून त्यामध्ये दर्जा, सत्ता, संपत्ती इत्यादी दुर्मिळ घटकावर आपला हक्क मिळविण्याच्या उद्देशाने सत्ताधारी गट प्रतिस्पर्ध्यांना नामोहरण करतो.'' यातूनच संघर्ष प्रक्रिया घडून येते. कोझर यांच्या मते, सामाजिक जीवनात घडून येणारा संघर्ष हा समूहाअंतर्गत आणि समूहाबाहेर अशा दोन पातळीवर घडून येणारा असतो. अशा संघर्षामुळे समाजामध्ये अस्थिरता निर्माण होते. व्यक्ती आणि समूहामधील संबंध द्वेषयुक्त बनतात. त्यातूनच वाद-विवाद वाढत जातात. अशा वातावरणातून मानवी संबंधांमध्ये अस्थिरता निर्माण होते.

### ❖ लुईस कोझर यांच्या मते, संघर्ष निर्माण होण्याची कारणे :

संघर्षवादी सिद्धांत स्पष्ट करताना लुईस कोझर यांनी जसा संघर्षाचा अर्थ सांगितला त्याचप्रमाणे संघर्ष निर्माण होण्याची समाजशास्त्रीय कारणे पुढीलप्रमाणे विशद केली. उदा. अर्थिक कारणामुळे येणारे अस्थैर्य, दुबळी सामाजिक नियमन व्यवस्था, व्यक्तींच्यामध्ये शत्रूत्व भावना वाढत जाते. तसेच हिंसा आणि संघर्ष यांचा सदैव परस्पर संबंध जोडला जातो. यातूनच सामाजिक परिवर्तन प्रक्रिया घडून येते.

### ❖ लुईस कोझर यांच्या मते, संघर्षाची कार्ये अथवा परिणाम :

लुईस कोझर यांनी संघर्षवादी सिद्धांत सपष्ट करताना संघर्षाचा अर्थ आणि कारणे विषद केली. त्याचप्रमाणे संघर्षाची खालील विविध कार्ये अथवा परिणाम स्पष्ट केले.

उदा. – १) संघर्ष हा सामाजिक परिवर्तन घडून आणण्यास मदत करतो.

२) संघर्षामधून अहंभावाची भावना वाढीस लागते.

३) संघर्षामुळे प्रत्येक समूहात वेगळे अस्तित्व निर्माण होत जाते.

४) संघर्षामुळे परस्परामध्ये वैर अथवा द्वेषयुक्त भावना वाढत जाते.

५) संघर्ष हा एक सामाजिक आंतरक्रियेचा भाग असतो.

६) संघर्ष हे एक ऐक्य टिकविण्याचे माध्यम असून एका दृष्टीने संघर्ष समाजाला उपयुक्त ठरतो.

७) संघर्षामुळे समाजातील दोन समुहात अलगता निर्माण केली जावू शकते.

लुईस कोझर यांची संघर्षवादी सिद्धांताबद्दलची मते विचारात घेता असे स्पष्ट होते की, ज्याप्रमाणे समाजजीवनामध्ये संघर्षमय प्रवृत्तीमुळे सामाजिक परिर्वतन घडून येते, त्याचप्रमाणे अशी संघर्षमय प्रवृत्ती समाजात हिंसा घडवून आणते. त्यामुळे समाजात अव्यवस्था निर्माण होते. थोडक्यात समाजामध्ये निर्माण होणारा संघर्ष हा काही वेळा समाजातील विशिष्ट व्यक्तीना संघटित करतो तर काही व्यक्तीना हिंसात्मक प्रवृत्तीला चालना देतो. एकूणच संघर्षवादी प्रवृत्ती परस्परांमध्ये वैर अथवा द्वेषमुक्त भावना वाढविण्यास चालना प्राप्त करून देते.

### ३.२.३.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :

१) लुईस कोझर यांनी संघर्षवादी सिद्धांताचे स्पष्टीकरण कोणत्या ग्रंथामध्ये विशद केले?

२) लुईस कोझर यांनी संघर्षाची व्याख्या कशी केली आहे.?

३) संघर्षामुळे समाजात कोणते परिणाम घडून येतात?

४) लुईस कोझर यांनी संघर्षवादी सिद्धांताचे सांगितलेले कोणतेही दोन अयोग्य परिणाम लिहा.

५) लुईस कोझर यांच्या मते, संघर्षाचे परिणाम कोणते आहेत?

### ३.२.४ रेन्डॉल कॉलीन्स यांचा संघर्षवादी सिद्धांत :

रेन्डॉल कॉलीन्स यांनी कार्ल मार्क्स, राल्फ डऱ्हेन डॉर्फ आणि लुईस कोझर यांच्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने आपला संघर्षवादी सिद्धांत मंडला. उदा. कार्ल मार्क्स यांनी भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादित साधनांच्या मालकी हक्कावरून सत्ताधिश आणि सत्ताविहीन (भांडवलदार व कामगार) यांच्यामध्ये संघर्षमय वातावरण असते असे स्पष्ट केले. राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांनी आपल्या संघर्षवादी सिद्धांतामध्ये अधिकार या घटकाला प्राधान्य दिले. उच्च पदस्थ व्यक्ती कनिष्ठांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करते. त्यातून संघर्षभावना वाढत जाते असे मत मांडले तर लुईस कोझर यांनी संघर्ष म्हणजे मानवी मूल्यांच्या मधील लढा असून त्यामध्ये सत्ता व संपत्ती यासारख्या दुर्मिळ घटकांवर हक्क मिळविण्याच्या उद्देशाने सत्ताधारी गट प्रतिस्पर्ध्यांना नामोहरण करतो, यातूनच संघर्ष प्रक्रिया घडून येते असा विचार स्पष्ट केला.

रेन्डॉल कॉलीन्स यांनी संघर्षवादी सिद्धांताचे विश्लेषण सापेक्षवादी दृष्टीकोनातून केले आहे. कॉलीन्स यांच्या मते, समाजामध्ये नेहमीच सत्तेच्या जोरावर वर्चस्व आणि नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होत असतो. त्यामुळे संघर्षवादी सिद्धांतामध्ये सत्ता अथवा अधिकार यांची भूमिका विचारात घेतली जाते. या पार्श्वभूमीवर रेन्डॉल कॉलीन्स यांनी आपला संघर्षवादी सिद्धांत खालील प्रमाणे स्पष्ट केला.

रेन्डॉल कॉलीन्स यांनी १९७४ मध्ये लिहिलेल्या आपल्या "Conflict Sociology" या ग्रंथामध्ये संघर्षवादी सिद्धांताचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले. त्यांच्या मते, विविध हितसंबंध असणारे समूह प्रत्येकाजवळ उपलब्ध असणाऱ्या साधन संपत्तीच्या प्रमाणात परस्पराशी स्पर्धा करीत असतात. त्यामुळे अशा समूहामध्ये सत्ता असंतुलन निर्माण होते. सहजिकच यामुळे संघर्षमय भावना वाढत जाते. या प्रक्रियेमध्ये एक समूह दुसऱ्या समुहावर आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. थोडक्यात रेन्डॉल कॉलीन्स यांनी संघर्षवादी सिद्धांत मांडताना सत्ता आणि सामाजिक दर्जा यांचा परस्परसंबंध कसा असतो हे स्पष्ट केले.

❖ **कॉलीन्स यांच्या संघर्षवादी सिद्धांताचे मूलभूत घटक अथवा बौद्धिक पाळेमुळे :**

रेन्डॉल कॉलीन्स यांनी संघर्षवादी सिद्धांताचे सापेक्षवादी दृष्टीकोनातून विश्लेण करताना या सिद्धांताचे खालील मुलभूत घटक सांगितले आहेत.

१) समाजातील सत्ता मिळविणाऱ्या व्यक्ती नेहमी इतरांच्यावर आपले नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात.

२) विरुद्ध बाजूच्या व्यक्ती देखील परस्पर विरोधी संबंधाचा परिणाम म्हणून समाजामध्ये संघर्षमय परिस्थिती निर्माण करतात.

३) समाजातील सत्तेप्रमाणेच साधन संपत्तीच्या स्वरूपांचा प्रभाव हा त्या समाजातील व्यक्तींच्या आंतरक्रियांवर होत असतो.

४) ज्यांच्याकडे समाजातील साधन संपत्तीची मालकी नसते अशा सत्ताविहीन व्यक्तींची सत्ताधिश व्यक्तींच्याकडून सातत्याने आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टीकोनातून पिळवणूक होत असते.

५) समाजातील व्यक्तींच्या श्रद्धा, मूल्ये आणि सामाजिक नियमने यासारख्या सांस्कृतिक घटकांशी कसा संबंध असतो, याचे विश्लेषण संघर्षासाठी जबाबदार असते.

६) जेव्हा समाजातील व्यक्तीकडून भूमिकेच्या संदर्भात एखादी आंतरक्रिया घडून येते. तेव्हा अशा भूमिकेचा संबंध संघर्षाशी येत असतो.

७) समाजातील व्यक्तींच्याजवळ जी साधन संपत्ती असते तसेच अशा संपत्तीच्या माध्यमातून इतरांशी जे जे संबंध येतात त्यामधून संघर्षाचे स्वरूप स्पष्ट होते.

रेन्डॉल कॉलीन्स यांनी संघर्षवादी सिद्धांताचे विशद केलेले वरील मूलभूत घटक विचारात घेत असे निदर्शनास येते की, समाजातील संघर्ष हा नेहमी सत्ता, संपत्ती, मान सन्मान इत्यादी सारख्या घटकांशी निगडीत असतो. ज्यावेळी समाज अशा घटकांचे संपादन करण्यासंबंधीचे नियम निश्चित करतो त्यावेळी समाजातील सर्वच व्यक्ती अशा घटकांचे संपादन नियमानुसार करीत नसतात, तर याउलट दुर्मिळ वस्तूवर दबावाच्या माध्यमातून आपला हक्क दाखविण्याचा प्रयत्न करतात. असे वातावरण संघर्षमय प्रवृत्तीच्या उदयाला कारणीभूत ठरते. यालाच कॉलीन्स यांच्या संघर्षवादी सिद्धांताचे सापेक्षवादी दृष्टीकोनातून केलेले विश्लेषण असे म्हणता येईल. रेन्डॉल कॉलीन्स यांच्या मते, असे विश्लेण सामाजिक समस्या सोडविण्यास मदत करते त्याचप्रमाणे व्यक्तींच्या वर्तनाला विशिष्ट अशी दिशा प्राप्त करून देते.

शेवटी असे स्पष्ट होते की, रेन्डॉल कॉलीन्स यांच्या संघर्षवादी सिद्धांताने मानवी आंतरक्रिया आणि व्यक्तीचे समाजातील भौतिक हितसंबंध जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

### ३.२.४.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :

१) रेन्डॉल कॉलीन्स यांनी संघर्षवादी सिद्धांताचे विश्लेषण कोणत्या दृष्टीकोनातून केले आहे?

२) समाजामध्ये नेहमी कशाच्या जोरावर वर्चस्व आणि नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होत असतो?

३) रेन्डॉल कॉलीन्स यांनी कोणत्या ग्रंथामध्ये संघर्षवादी सिद्धांताचे विश्लेषण केले?

४) संघर्षवादी सिद्धांतामध्ये कॉलीन्स यांनी कोणत्या घटकांचा परस्पर संबंध सांगितला?

५) सत्तेप्रमाणेच साधन संपत्तीच्या स्वरूपाचा प्रभाव कशावर पडत असतो?

६) साधन संपत्तीची माहिती नसणाऱ्या व्यक्तींची सत्ताधिशाकडून कोणकोणत्या दृष्टीकोनातून पिळवणूक होत असते ?

७) रेन्डॉल कॉलीन्स यांच्यामते, व्यक्तीच्या कोणत्या बाबीचा संघर्षमय प्रवृत्तीशी सातत्याने संबंध येत असतो?

## ३.३ सारांश :

संघर्षवादी सिद्धांताच्या संदर्भात कार्ल मार्क्स आणि जॉर्ज सिमेल यांनी सांगितलेली बौद्धिक पाळेमुळे

तसेच राल्फ डऱ्हेन डॉर्फ, लुईस कोझर आणि रेन्डॉल कॉलीन्स यांची मतप्रणाली अभ्यासली असता त्यावरून सारांश रूपात असे म्हणता येईल की, मानवी इतिहास हा नेहमीच संघर्षाने व्यापलेला दिसून येतो. सरंजामशाही व्यवस्था, जमीनदारी व्यवस्था आणि सध्याची भांडवलशाही व्यवस्था यामध्ये सरंजामदार, जमीनदार आणि भांडवलदार हे वर्ग नेहमीच सत्ताधिश राहिले. उत्पादित साधनांची मालकी याच वर्गाकडे असल्याने त्यांनी भूदास किंवा गुलाम, भूमिहीन शेतमजूर आणि कामगार यासारख्या सत्ताविहिन वर्गाची आर्थिक व सामाजिक पिळवणूक केली.

कार्ल मार्क्सच्या मते, संघर्ष प्रवृत्ती ही वास्तवावदी असून भौतिकवादी समाजाचा तो एक अविभाज्य असा घटक आहे. तसेच ही संघर्षप्रवृत्ती सदा सर्वकाळ अस्तित्वात असल्याचे निदर्शनास येते. भांडवलशाही समाजात उत्पादन आणि वितरण हक्कासंदर्भात एक प्रकारची ''**बळी तो कान पिळी**'' अशी सत्ताधिश वर्गाची मक्तेदारी आढळून येते. यामुळे सत्ताविहीन वर्गामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होते. अशी परिस्थिती समाजात संघर्ष निर्माण करते, असा संघर्ष प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. यासंदर्भात कार्ल मार्क्स प्रमाणे राल्फ डऱ्हेनडॉर्फ यांनी आपले विचार मांडताना असे म्हटले आहे की, मानव समाजातील संघर्षाला केवळ त्या समाजातील आर्थिक घटकच जबाबदार नसतात, तर त्याचबरोबर समाजातील राजकीय सत्तेचे असमान वितरण हे देखील संघर्षाचे महत्त्वाचे कारण असते. सत्ता आणि अधिकार या घटकांचा संघर्षाबाबत डऱ्हेन डॉर्फ यांनी आवर्जून उल्लेख केला. उच्च पदावरील व्यक्ती कनिष्ठांच्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते, त्यातूनच उभय वर्गातील संघर्षाचे प्रमाण वाढत जाते.

लुईस कोझर यांनी आपल्या संघर्षवादी सिद्धांतामध्ये संघर्ष म्हणजे मानवी मूल्यांच्यामधील लढा असून त्यामध्ये दर्जा, सत्ता, संपत्ती इत्यादी दुर्मिळ घटकांवर आपला हक्क मिळविण्याच्या उद्देशाने सत्ताधारी गट प्रतिस्पर्ध्यांना नामोहरण करतो. यातूनच संघर्ष प्रक्रिया घडून येते असा विचार मांडला. कोझर यांच्या मते, संघर्ष हा सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास मदत करतो, तसेच संघर्षामुळे परस्परांमध्ये वैर अथवा द्वेषयुक्त भावना वाढत जाते.

रेन्डॉल कॉलीन्स यांनी संघर्षवादी सिद्धांताचे विश्लेण सापेक्षवादी दृष्टीकोनातून केले. त्यांच्या मते, समाजामध्ये नेहमीच सत्तेच्या जोरावर वर्चस्व आणि नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होत असतो. विविध हितसंबंध असणारे समूह प्रत्येकाजवळ उपलब्ध असणाऱ्या साधन संपत्तीच्या प्रमाणात परस्पराशी स्पर्धा करीत असतात. अशा समूहामध्ये सत्ता असंतुलन निर्माण होते. सत्ताधिश व्यक्तीकडून सातत्याने सत्ताविहीनांची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टीकोनातून पिळवणूक होत असते.

शेवटी असे स्पष्ट होते की, मानव समाज हा गतीशिल असल्याने त्यामध्ये सामाजिक परिवर्तन घडून येते. संघर्षवादी प्रवृत्तीला असा सामाजिक बदल जबाबदार ठरतो. संघर्ष सिद्धांत कोणत्याही मानव समाजामध्ये अटळ असतो तसेच तो समाजाच्या विविध क्षेत्रात असणाऱ्या 'सत्ता' या घटकांवर विशेष भर देतो, काही मोजक्या व्यक्तींच्याकडेच अशी सत्ता असते, तर बहुतांशी व्यक्ती सत्तेपासून वंचित असतात. संघर्षवादी सिद्धांताचा विविध विचारवंतांनी वेगवेगळ्या पद्धतीने अभ्यास केला आहे. संघर्षवादी विचारसरणी ही मानवी जीवनाचे स्वरूप जाणून घेण्याची प्रमुख विचारसरणी समजली जाते.

## ३.४ पारिभाषिक संज्ञा :

**१) सत्ताधिश आणि सत्ताविहीन :** उत्पादित साधनांची मालकी अथवा हक्क असणारा वर्ग म्हणजे सत्ताधिश तर यापासून वंचित असणारा वर्ग म्हणजे सत्ताविहीन वर्ग होय.

**२) समाजवाद :** उत्पादित साधनांची सामूदायिक मालकी अथवा समान हक्क.

**३) सापेक्षवादी विश्लेषण :** मानवी आंतरक्रियांचा अभ्यास आणि समाजातील व्यक्तीचे भौतिक हितसंबंध जाणून घेण्याचा प्रयत्न.

**४) अधिकार :** विशिष्ट प्रकारची सत्ता अथवा उत्पादित साधनावर मालकी.

**५) बळी तो कान पिळी :** सत्ताधिश व्यक्तींच्याकडून सत्ताविहीन लोकांची केली जाणारी पिळवणूक.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

### ३.२.१.१ संघर्षवादी सिद्धांताची बौद्धिक पाळेमूळे :

१) कार्ल मार्क्स व जॉर्ज सिमेल.

२) सत्ता घटकांची भूमिका.

३) सत्ताधिश आणि सत्ताविहीन

४) साम्यवादामध्ये

५) मानवी वर्तन प्रकार अथवा सामाजिक प्रक्रिया.

६) संघर्षयुक्त वर्ग जाणिव, संपत्तीला महत्त्व, दुरावा, सत्तेचे केंद्रिकरण.

७) 'बळी तो कान पिळी'

८) मालमत्तेच्या मालकी हक्कावरून

९) मालमत्ता ही संपूर्ण समाजाच्या मालकीची.

### ३.२.२.१ राल्फ डऱ्हेन डॉर्फ :

१. राजकीय सत्तेचे असमान वितरण.

२. व्यक्तीना मिळणारी पदे आणि अधिकार

३. श्रेष्ठ आणि कनिष्ठ

४. विशिष्ट मर्यादेपर्यंत अथवा सत्तेवर असेपर्यंत.

५. कायद्याचे पाठबळ.

६. पदावरून दूर झाल्यानंतर

७. श्रमिकांची आर्थिक पिळवणूक

**३.२.३.१ लुईस कोझर.**

१. The functions of social conflict.

२. संघर्ष म्हणजे मानवी मूल्यांच्या मधील लढा असून त्यामध्ये दुर्मिळ घटकांवर हक्क मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

३. समाजात अस्थिरता निर्माण होते, शत्रुत्व भावना वाढत जाते अथवा सामाजिक परिवर्तन प्रक्रिया घडून येते.

४. संघर्षामुळे अहंभावाची भावना वाढत जाते, तसेच समाजातील दोन समूहामध्ये अलगता निर्माण केली जाते.

५. संघर्षवादी प्रवृत्ती सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास मदत करते, तसेच संघर्ष हे एक समाजात ऐक्य टिकविण्याचे माध्यम आहे.

**३.२.४.१ रेन्डॉल कॉलीन्स.**

१. सापेक्षतावादी दृष्टीकोनातून

२. सत्तेच्या जोरावर

३. "Conflict sociology"

४. सत्ता आणि सामाजिक दर्जा

५. व्यक्तींच्या आंतरक्रियांवर

६. आर्थिक, सामाजिक व राजकीय पिळवणूक

७. भूमिकांच्या संदर्भात घडून येणारी आंतरक्रिया.

## ३.६ सरावासाठीचे प्रश्न :

१. संघर्षवादी सिद्धांताची बौद्धीक पाळेमूळे विशद करा.

२. राल्फ डऱ्हेन डॉर्फ यांचा संघर्षवादी सिद्धांत स्पष्ट करा.

३. लुईस केझर यांनी संघर्षवादी सिद्धांताचे केलेले स्पष्टीकरण थोडक्यात लिहा.

४. 'रेन्डॉल कॉलीन्स' यांचा 'संघर्षवादी सिद्धांत' थोडक्यात स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके :


१. Abraham Francis : "Modern Sociological Theory", An Introduction, Oxford University Press, New York.

२. Ritzer George, "Modern Sociological Theory", 4th Edition, The Mc-Graw Hill Companies, New York.

३. Turner H. Jonathan, "The structure of Sociological Theory, Rawat Publication Jaipur, 1995.

४. Lewis A. Coser : Masters of Sociological Thought, Rawat Publication, Jaipur & New Delhi, 1996.

५. प्रा. पी.के.कुलकर्णी : ''प्रगत समाजशास्त्रीय सिद्धांत'' श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.

६. डॉ. एस. आर. तोष्णीवाल, ''उच्चतर समाजशास्त्रीय सिद्धांत'' पिंपळापूरे ॲड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुलै २००१.

७. डॉ. विजय मारुलकर, 'समाजशास्त्रीय विचारांचा इतिहास', प्राची प्रकाशन, मुंबई.


❖❖❖

# घटक – ४

# स्त्रीवादी सिद्धांत

## (Feminist Theory)

**घटक संरचना :**

४.०. उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ स्त्रीवादी सिद्धांताची ऐतिहासिक मुळे

    ४.२.२ मार्क्सवादी स्त्रीवाद

    ४.२.३ मवाळ स्त्रीवाद

    ४.२.४ आधुनिकोत्तर स्त्रीवाद

४.३ सारांश

४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे.

४.५ स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठीची पस्तके.

## ४.० उद्दिष्टे :

१) स्त्रीविषयक प्रश्नांचा अभ्यास सविस्तरपणे करणे

२) स्त्रीला मध्यवर्ती ठेवून तिच्या विषयक सामाजिक जीवनाचा आणि मानवी अनुभवाच्या विस्तृत क्षेत्राचा सर्वसामान्यपणे अभ्यास करणे.

३) स्त्रीवादी सिद्धांताचा सर्वांगीण अभ्यास करता येईल.

४) स्त्रीवादी सिद्धांत आणि समाजशास्त्रीय सिद्धांत यांची तुलनात्मकता पाहता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

२० व्या शतकात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समाजजीवनाच्या अध्ययनासाठी ज्या नवीन परंपरा निर्माण झाल्या आहेत, त्यामध्ये स्त्रीवादी अध्ययन परंपरा खूपच गाजली. किंवा आपणाला असे म्हणता येईल की

स्त्रीवादी विचारप्रणालीने सर्वांचे लक्ष वेधले. समाजशास्त्रीय आधुनिक सिद्धांत या अभ्यासविषय संदर्भात आपण स्त्रीवादी सिद्धांताच्या विविध पैलूंचा सविस्तर आढावा घेणार आहोत. त्या अगोदर त्याची पार्श्वभूमी जाणून घेणे आवश्यक आहे. समाज जीवनाच्या ज्या दोन महत्त्वाच्या बाजू आहेत त्यात १. पुरुष आणि २. स्त्री असे आढळून येते.

जगातील काही अपवाद वगळता बहुसंख्य समाज हे पितृप्रधान, पितृसत्ताक आणि पितृवंशीय आहेत. ह्या समाजात न कळतच स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेने दुय्यम स्वरूपाचा दर्जा दिला होता. मध्ययुगात धर्माचे स्त्रोत्र, राजसत्तेचे प्राबल्य यामुळे स्त्रियांच्या दर्जात खूपच घसरण झाली व स्त्री, मुले पुरुषाला भोग देण्याचे साधन बनली. याच काळात राजेशाही अस्तित्वात होती. स्वतःच्या राज्याचा विस्तार करण्यासाठी सर्वत्र विशेषतः शेजारच्या राज्याची युद्धे अटळ होती. यात जेता राजा व त्याचे सैनिक पराभूत राजाची संपत्ती लुटत व त्याचबरोबर पराभूत राज्यातील स्त्रियांना पळवून व त्यांची अब्रु लुटीत स्त्री ही विजयी राजाच्या दृष्टिने युद्धातील बक्षीस मानले जाई. सारांश रूपाने आपणाला असे म्हणता येईल की, इ.सन १६०० सालापर्यंत ही स्थिती होती. स्त्रियांच्या या दयनीय अवस्थेकडे काही समाजसुधारकांचे लक्ष वेधले गेले. काही शिकलेल्या स्त्रियांनाही आपल्या या दयनीय अवस्थेची जाणीव झाली. परिणामतः काही समाजात स्त्री मुक्ती चळवळीला सुरुवात झाली. त्यातून समाजातील स्त्रीविषयक प्रश्नांच्या अभ्यासाला चालना मिळाली. हा स्त्रीविषयक प्रश्नांचा अभ्यास किंवा त्यातून काढलेले निष्कर्ष म्हणजे 'स्त्रीवादी' सिद्धांत होत. विविध स्त्रीवादी सिद्धांताचा विचार करण्यापूर्वी 'स्त्रीवादी' सिद्धांत म्हणजे काय ते आपण समजावून घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

मानव पृथ्वीवरील सर्व प्राण्यांमध्ये बुद्धिमान प्राणी होय. मानवाने आपल्या बुद्धिमत्तेने, स्वबळावर स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. विकास घडवून आणला. यात स्त्री आणि पुरुष या दोघांचेही समाज योगदान, भूमिका आहे. मात्र मानव संस्कृतीच्या वाटचालीत कुटुंब व्यवस्थेच्या उदयानंतर चूल आणि मूल हे स्त्रीचे कार्यक्षेत्र तर घराबाहेर जाऊन उपजीविकेचे साधन मिळवणे, अर्थार्जन करणे हे पुरुषाचे कार्यक्षेत्र ठरले. या व्यवस्थेतूनच स्त्री दुय्यम ठरलेली आहे. पितृसत्ताक व्यवस्था तसेच धर्म, जाती, व्यवस्थेचा उदय हा स्त्रीच्या दुय्यमत्त्वात भर टाकणारे कळीचे मुद्दे ठरले. या व्यवस्थेच्या परस्पर सहसंबंधित शृंखला स्त्री प्रश्नांची गुंतागुंत वाढविणाऱ्या ठरल्या. स्त्रीचे जीवन गुलामाप्रमाणे झाले. जगभरामध्ये ही परिस्थिती कमी अधिक प्रमाणात सारखीच होती. मात्र आधुनिक युगाची सुरुवात स्त्री स्वातंत्र्याची चाहूल होती. यामागील कारण म्हणजे विज्ञान-तंत्रज्ञानाने झालेले विभिन्न बदल आणि औद्योगिकीकरण यामधून जगभर विविध क्षेत्रांत परिवर्तने होण्यास सुरुवात झाली. दोन महायुद्धे व त्या दरम्यानचा काळ व नंतर ही परिस्थिती झपाट्याने बदलत गेली. या सर्व घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर स्त्री जीवनातही स्थित्यंतरे घडत होती. स्त्रियांमध्ये जागरुकता वाढत होती. स्त्रियांनी सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, राजकीय या क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता यावी, यासाठी संघर्षास सुरुवात केली. या सर्व प्रक्रियेतून पाश्चात्त्य जगामध्ये स्त्रीवादी विचारसारणी मूळ धरू लागली आणि जोमाने वाढली. विकसित झाली. हळूहळू जगभरातील स्त्रियांना आत्मभान आले. त्यांनी स्वतःचे मुक्ती लढे उभारले. सहअस्तित्वाचा हा संघर्ष

अद्यापही संपलेला नाही. काळानुरूप आव्हान म्हणून उभ्या राहिलेल्या समस्यांना तोंड देत स्त्री संघर्षाचा हा लढा अखंडपणे चालू आहे.

### ४.२.१ स्त्रीवादी सिद्धांताची ऐतिहासिक मुळे

१९ व्या शतकाच्या शेवटी पाश्चात्य देशांमध्ये स्त्रीवाद या विचारसारणीचा उदय झाला. विद्युत भागवत यांनी 'स्त्री प्रश्नांची वाटचाल' या आपल्या ग्रंथामध्ये स्त्रीवादी चळवळ व विचार आणि स्त्रीमुक्तीवादी चळवळ व विचार यात भेद केला आहे. त्यांच्या मते स्त्री मुक्तीमध्ये स्त्रीला कोणीतरी जखडलेलं गुलाम केलेले आहे. त्यातून मुक्ती मिळविणे हे अभिप्रेत आहे. मात्र स्त्रीवाद ही स्त्री प्रश्नांची मांडणी संदर्भातील सर्वसमावेशक अशी संकल्पना आहे. स्त्री मुक्तीवाद ही पाश्चात्त्य देशांमध्ये जहाल भूमिका घेणाऱ्या गटाचाच विचार आहे. मात्र रोजच्या व्यवहारात हे दोन्ही शब्द समान अर्थाने वापरले जातात. याप्रमाणे त्या विश्लेषण करतात.

स्त्रीवाद म्हणजे काय? हे पाहताना स्त्रीवादाची निश्चित एकच व्याख्या आढळत नाही. अभ्यासकांनी आपआपल्या परीने या संकल्पनेची मांडणी केलेली दिसते. यापैकी काही व्याख्या पुढीलप्रमाणे.

१) डॉ. गेल ऑमवेट यांनी आपल्या स्त्रीवाद या ग्रंथातील लेखात असे म्हटले आहे की, ''लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी पूर्णपणे नष्ट करणे म्हणजे स्त्रीवाद होय.''

२) वसुधा सुतार यांच्या मते, ''स्त्रियांचे दुय्यमत्त्व व्यवस्थात्मक असून, त्याला निश्चित असे आर्थिक कारण आहे. स्त्री-पुरूष विषमतेचा प्रश्न हा अतिशय मूलभूत असून त्याचे स्वरूप सर्वव्यापी आहे, असे म्हणणं म्हणजे स्त्रीवाद होय.

नव्या स्त्रीवादी लेखनातून दोन बाबींची मांडणी झालेली दिसून येते. प्रथम की, जैविक पातळीवरील भिन्नतेचे विश्लेषणाबाबत स्त्रीवाद मानतो की, पुरुष आणि स्त्रिया यांच्यामध्ये भावनिक, बौद्धिक किंवा मानसिक भिन्नत्व सामाजिकदृष्ट्या लादल्या गेलेल्या मूल्यांचे प्रतिबिंब असते. तर दुसरी बाब म्हणजे सामाजिक मूल्यांमधून स्त्रीला पुरुषांपासून वेगळेपण दिले जाते आणि त्याचा पाया स्त्रीच्या मानसिक गुणवैशिष्ट्यांमधून आणि लैंगिक भूमिकांच्या साचेबंद भूमिकांमधून घडतो. स्त्रियांच्या चळवळीने आतापर्यंत विविध प्रकारच्या प्रतिकारांना तोंड दिले आहे. त्याचे विश्लेषण स्त्रीवाद करतो. लैंगिक भूमिकांची साचेबद्धता, स्त्रियांच्या आत्मप्रतिमा आणि सार्वजनिक प्रतिमा, स्त्रीत्वाच्या सामाजिक भूमिका, लैंगिक क्रांती आणि पुरुषसत्ताक भाषेचे राजकारण इ. प्रश्न ऐरणीवर होते.

स्त्रीवादी विचाराने चार मुद्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. १) स्त्रियांचे उत्पादन व्यवस्थेतील कार्य व भूमिका, २) स्त्रियांची पुनरुत्पादनातील भूमिका, ३) पुरुषी वर्चस्वात्मक सामाजिक संस्कृतीमध्ये संस्कार किंवा सामाजिकीकरणातील स्त्रियांची भूमिका, ४) लैंगिकते संदर्भातील प्रश्न.

पारंपारिक समाज व्यवस्थेत स्त्रीला असलेल्या स्थानाचा विचार करता असे आढळून येते की, पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीचे विविध पातळ्यांवर शोषण केले आहे. परंपरेने तिला 'अबला' हे विशेषण लावले. 'चूल आणि मूल' हेच तिचे आयुष्यभराचे कार्यक्षेत्र तिच्याकडे पाहत असतांना न्यूनत्वाच्या, हिनत्वाच्या दृष्टिकोनातून

आजही पाहिले जाते. 'पुरुषाशिवाय तिला पूर्णत्व येवूच शकत नाही. अशी धारणा पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत जाणूनबुजून तयार केली गेली. आणि हेच तिच्या मनावर देखील वारंवार बिंबवले गेले. यासाठी पुरुषप्रधान संस्कृतीने धार्मिक ग्रंथांचा आधार घेतला. त्याचे लेखन ही पुरुषांनीच त्यांच्या सोयीप्रमाणे केलेले आढळून येते. हे लेखन करताना त्यात विविध युक्त्या वापरण्यात आल्या. धार्मिक ग्रंथांमध्ये स्त्रीचे चित्रण सहनशील सोशिक, ममतेचा सागर अशा रीतिने केले गेले. पुरुषप्रधान संस्कृतीच्या जोखडात स्त्री दबतच गेली. स्वतःचा आवाज आणि स्वतःचे अस्तित्वच हरवून बसली. आपण जे त्यागाचे, कष्टाचे जीवन जगत आहोत हेच आपले खरे जीवन आहे. या निर्णयाप्रत तिला आणले गेले. अशाप्रकारे स्त्रीच्या अगतिकतेचे दयनीय समाजासमोर आणले. एक अबला म्हणून समाजातील हेच स्थान लक्षात घेऊन आपण जर स्त्रीवादाचा विचार करू लागलो तर सध्याच्या आधुनिक परिस्थितीत बदल होत असल्याचे पाहायला मिळते.

औद्योगिक क्रांती ही जागतिक इतिहासातील एक महत्त्वाची घटना आहे. विज्ञानातील विविध शोधांची मालिका चालू झाली आणि त्याचा परिणाम जीवनाच्या विविध क्षेत्रांवर पडू लागला. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. याच काळात आणखी एक महत्त्वपूर्ण घटना घडली, ती म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती. 'स्वातंत्र्य-समता आणि बंधुता ही महान मूल्ये या राज्यक्रांतीने जगाला दिली व परिवर्तनाच्या पहाटेचा उदय झाला. हा मानवी स्वातंत्र्याचा जाहिरनामा होता. 'माणूस हा जन्मापासूनच स्वतंत्र असतो. त्याला बळाच्या जोरावर कोणीही आपला गुलाम म्हणून ठेवू शकत नाही. या विचाराने प्रेरित होऊन पारतंत्र्यात खिचपत पडलेल्या विविध देशातील स्वातंत्र्य चळवळींनी जोर धरला. आतापर्यंत गुलामगिरीच्या बेड्यात बंदिस्त असलेला दुर्बल घटकांची अस्मिता जागी झाली. याला स्त्रियाही अपवाद नव्हत्या आणि याच काळात स्त्रियांच्या चळवळींचा उदय झाला. यातूनच ''स्त्रीवाद'' नावाची विचारसारणी आकाराला येऊ लागली. स्त्रीवादाने अखिल स्त्री-जातीच्या मुक्तीचा जाहिरनामा आणला. हजारो वर्षाच्या गुलामगिरीला धक्के दिले जाऊ लागले व ती एक राजकीय विचारप्रणाली बनली.

'स्त्रीवाद' ही एक व्यापक संकल्पना आहे. स्त्रीवाद स्त्रियांच्या प्रश्नापुरताच मर्यादित विचार न राहता, स्त्री जीवनाच्या विविध क्षेत्रातील शोषणाच्या विरोधात आवाज उठवितो. स्त्रीवादाचा विकास हा स्त्रियांचे हक्क व त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार यांना विरोध करणाऱ्या चळवळीतून झाला आहे. म्हणून 'स्त्रीवाद ही संकल्पना पुस्तकी नसून जीवनातील प्रत्यक्ष घटनांचा याला आधार आहे. ती एक राजकीय विचारप्रणाली आहे. १९६० नंतर स्त्रीवादी विचारसरणीचा भारतासारख्या तिसऱ्या जगातील देशातही गांभीर्याने विचार होऊ लागला. समाजव्यवस्थेत पुरुषाकडे समाजातील एक महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा घटक म्हणून पाहिले जाते तर 'स्त्री'कडे मात्र न्यूनतावादी व दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जाते. तिची कार्यक्षेत्रे ही परंपरेने नेमून दिलेली असतात. त्या शिवाय कोणत्याही क्षेत्रात तिने हस्तक्षेप करू नये. असा एक अलिखित नियम असतो. ती परंपरेने नेमून दिलेली कार्य करत नसेल तर साम, दाम, दंड, भेद या नीतीचा वापर केला जातो. 'स्त्रीवादी' विचारसारणी वरील अमानवी विचाराला नाकारते. स्त्रियांच्या जीवनातील विषमतेच्या विरोधात स्त्रीवादी विचारसारणी विधायक भूमिका मांडते.

## सिमॉन-दि-बोव्हा : स्त्रीवादाची पायाभूत मांडणी

१९४९ हे वर्ष स्त्रीवादी विचारसारणीच्या जडणघडणीतील एक महत्त्वपूर्ण वर्ष मानले जाते. याच वर्षी 'सिमॉन-दि-बोव्हा' या फ्रेंच विदूषीचा 'दि सेकंड सेक्स' हा मौलिक ग्रंथ प्रकाशित झाला. आणि सबंध पुरुषप्रधान सत्तेची मांडणी करणाऱ्या व्यवस्थेलाच हादरा बसला. या ग्रंथामुळे स्त्रीवादी विचारसरणीला वैचारिक पाठबळ मिळाले. ''युद्धोत्तर स्त्रीवादी समिक्षेच्या शिल्पकार असे सिमॉन-दि-बोव्हा यांचे वर्णन केले जाते.

स्त्रीवादाबद्दल सिमॉन-दि-बोव्हा यांनी अतिशय परखड मते मांडली आहेत. त्या म्हणतात की, "One is born a Women, one becomes one" म्हणजेच बाई म्हणून कोणी जन्माला येत नाही. तर नंतर ती 'बाई' बनवली जाते. 'स्त्री' जन्मता 'स्त्री' किंवा 'बाई' नसते तर समाजव्यवस्थाच तिच्यावर हे 'स्त्रीपण किंवा बाईपण लादते. समाज व्यवस्था तिला एक भूमिकेत जगायला शिकविते. वास्तविक पाहता ही भूमिका कमीपणाची किंवा न्यूनत्वाची असते. बालपणापासून तिला 'बाई बनविण्याची प्रक्रिया सुरू होते. तिच्यावर अनेक बंधने लादली जातात. उदा. बाईने पुरुषांचे कपडे वापरू नयेत, तिने पुरुषांचे खेळ खेळू नयेत, जेवणासाठी पुरुषांच्या सोबत बसू नये. पुरुषाप्रमाणे मोठमोठ्याने बोलू नये इ. यातून तिचा नैसर्गिक विकास खुंटला गेला. तिला स्वतःला अस्तित्वच उरले नाही. तिची ओळख तिच्यामुळे न होता, तिला इतरांचा आधार घ्यावा लागतो. तिची ओळख कोणाची पत्नी, कोणाची आई, कोणाची बहिण, कोणाची मुलगी अशी होऊ लागली. मनुने तर स्त्रीला दुय्यमत्त्व देत तिला तिच्या आयुष्यातील कोणत्याच टप्प्यामध्ये स्वातंत्र्य नाही असे सांगून ठेवले आहे. जन्माला आल्यावर वडिलांच्या धाकात तिने रहावे म्हणजेच बालपणी तिने वडिलांच्या अधिपत्याखाली रहावे, लग्न झाल्यावर पतीच्या अधिपत्याखाली रहावे आणि वृद्धापकाळी मुलाच्या अधिपत्याखाली रहावे. स्त्रीला आयुष्यात कधीही स्वातंत्र्य नसावे. अशी मनुची धारणा होती, आजही ही मानसिकता असलेली समाजव्यवस्था आहे. खूप काही बदल झालेला पाहायला मिळत नाही. स्वतःची ओळखच ती हरवून बसली आहे. धर्म, राजकारण, शिक्षण, समाजकारण या समाजाच्या महत्त्वाच्या वास्तवतेमध्येही तिची भूमिका दुय्यम दर्जाची ठरविली आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत पुरुष हा केंद्रबिंदू असतो तर स्त्रीला परिघावरचे स्थान दिले जाते.

'बाई'कडे माणूस म्हणून न पाहता 'वस्तू' म्हणून पाहिले जाते. 'बाईपणाची' मूल्य देखील पुरुषप्रधान व्यवस्थाच ठरवते. म्हणूनच स्त्रीवादी विचारसरणी 'पुरुषसत्ताक' मूल्यांना नाकारते. या समाजव्यवस्थेने लादलेली बंधने झुगारून दिली पाहिजेत. अशी आग्रही भूमिका सिमॉन-दी-बोव्हा यांनी मांडली. त्यापुढे जाऊन बोव्हा म्हणतात ''स्त्री आणि पुरुष यांच्यात समता किंवा समानता आल्याशिवाय वर्गलढा पूर्ण होणार नाही.

या सर्व पार्श्वभूमीच्या आधारावर आपण जेव्हा स्त्रीवादी सिद्धांताची ऐतिहासिक मांडणी कधीपासून झाली किंवा स्त्रीवादी चळवळीची मुळे इतिहासात किती खोलवर रूजली आहेत हे तपासताना आपणाला असे पाहायला मिळते की, एका दृष्टिने विचार करता स्त्रीवादी दृष्टिकोन समाजामध्ये सतत आढळतो. पाश्चिमात्त्य देशातील माहितीचा आधार घेता या संदर्भातील स्त्रीवादी लेखनाची परंपरा सुमारे ५०० वर्षापूर्वी सुरू झाली व ती सामाजकि निषेधापुरतीच मर्यादित होती. हे त्या काळातील लिखाण आजच्या स्त्रीवादी विचार मांडणाऱ्या लोकांना प्रेरणादायी ठरेल असे होते. 'स्त्रीवादी' लेखनाची ही पहिली पायरी होय. या स्त्रीवादी लेखनाची दुसरी

पायरी सुमारे १८३० साली आकाराला आली की, त्या काळात पुरुष समाजशास्त्रज्ञांनी लिंग असमानतेच्या दृष्टिकोनातून स्त्रीवादी लिखाण केले.

यातील पहिला टप्पा आहे, तो म्हणजे 'स्त्री'च्या दुय्यम किंवा कनिष्ठ दर्जाचा, जगात सर्वत्र व सर्व धर्मात देखील स्त्रियांना पुरुषापेक्षा दुय्यम किंवा कनिष्ठ दर्जा प्रदान करण्यात आला होता. स्त्रियांना कनिष्ठ दर्जा देतांना त्यांना पाश्चिमात्त्य समाजात 'अल्पसंख्य' म्हणूनही संबोधले जात होते. त्यावेळी स्त्रीवादी विचारवंतानी या अल्पसंख्य दर्जाचा निषेध केला होता. स्त्रीविषयक चळवळी व लेखन हे मुख्यत्वे करून पाश्चिमात्त्य आधुनिक उदारमतवादी लोकांच्या हातात होते. १७८० ते १७९० या काळातील अमेरिका व फ्रेंच येथील क्रांतीने थोडे वेगळे वळण घेतले असले तरी स्त्रियांचा दुय्यम दर्जा हे या काळाच्या स्त्रीवादी सिद्धांत मांडणाऱ्या विचारवंताच्या अभ्यासाचे प्रमुख लक्ष्य होते.

या संबंधीचा दुसरा टप्पा महत्त्वाचा असून यात समाजशास्त्र व स्त्रीवाद यांनी परस्पर सहकार्याने यात सहभाग घेतला. समाजशास्त्राने १८३०-१८६० या काळात स्त्रीवादी लिखाणाला समाजशास्त्रीय दृष्टिकोन प्रदान केला. दुसरा कालावधी १८९०-१९२० हा असून यात स्त्रीवादी अभ्यासकांनी व्यावसायिक दृष्टिने स्त्रियांच्या प्रश्नांचा अभ्यास केला म्हणून या कालावधीला 'विस्तारित स्त्रीवादी' अवस्था असे म्हटले जाते. या संदर्भात सुरुवातीच्या समाजशास्त्रज्ञांनी बुद्धिवादी परंपरांना कसा प्रतिसाद दिला या प्रश्नाचे उत्तर शोधणे आवश्यक आहे.

समाजशास्त्राच्या इतिहासात लिंग विषयक प्रश्नासंबंधी सद्यकालीन जी संशोधने झाली आहेत. त्यावरून या प्रश्नाच्या उत्तराच्या तीन बाजू आहेत. असे आढळून येते.

पहिली बाजू ही की १८३० ते १९६० या कालावधीत समाजशास्त्राचा स्वतःचा असा दृष्टिकोन तयार झाला होता. त्यानंतर एक संघटित आणि एक व्यावसायिक विद्वतापूर्ण शास्त्र म्हणून लिंग राजकारणाच्या पार्श्वभूमीला विरोध करण्यासाठी समाजशास्त्राचा उदय झाला. त्यानंतर व्यावसायिक शास्त्राच्या परिघावर जी शास्त्रे होती त्यांची जन्मदात्री आई म्हणून या स्त्रीवादी शास्त्राला महत्त्व प्राप्त झाले.

या प्रश्नाच्या उत्तराची दुसरी बाजू अशी आहे की, स्त्रीवादी सिद्धांतकार समाजशास्त्राला चाळणी लावून ते क्षेत्र काही पुरुष तर काही स्त्री सिद्धांतकार यांच्या स्त्रीवादी व समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या सीमारेषेपुरतेच मर्यादित ठेवतात.

या प्रश्नाच्या उत्तराची तिसरी बाजू अशी आहे की, जे पुरुष व्यावसायिकतेच्या बाबतीत स्वतःपुरती केंद्रवर्ती भूमिका गृहीत धरतात ते पुरुष समाजशास्त्रज्ञ म्हणजे स्पेन्सर, दुरखेम आणि वेबर यांच्या पासून ते पार्सन्स पर्यंत सर्व स्त्रीवादी विवादाला प्रतिसाद देताना तो मूलतः कर्मठ स्वरूपाचा असतो असे मानतात व स्त्रीवादी सिद्धांतात ते प्रामुख्याने लिंगभाव विभेद व असमानता याला प्राधान्य देतात.

या सर्व ऊहापोहाचा मतितार्थ असा की स्त्रीवादी विचार व स्त्रीवादी चळवळी साधारणतः १७ व्या शतकात सुरू झाल्या 'स्त्री' समाज जीवनाचे, पुरुषाइतकेच महत्त्वाचे अंग असल्याने समाजशास्त्रीय दृष्टिने समाजशास्त्रज्ञांनी 'स्त्री' प्रश्नांच्या अध्ययनाकडे लक्ष दिले तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की स्त्रियांचे काही

प्रश्न केवळ त्यांच्या 'स्त्री'त्वाशी निगडित आहेत तर काही प्रश्न सर्वसाधारण स्वरूपाचे आहेत. 'स्त्री' प्रश्नांचा विचारवंतांनी अनेक दृष्टिकोनातून अभ्यास करून त्या बाबतचे सिद्धांत मांडले होते.

**४.२.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

१) ................ शतकाच्या शेवटी पाश्चात्त्य देशांमध्ये स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला.

अ) १७ व्या ब) १८ व्या क) १९ व्या ड) २० व्या

२) स्त्रीवादी विचारसरणींमध्ये ............... हे अपेक्षित आहे.

अ) स्त्री-पुरुष विषमता ब) स्त्री-पुरुष समानता

क) सामाजिक विषमता ड) आर्थिक समानता

३) पारंपारिक समाज व्यवस्थेमध्ये स्त्री ला .................... स्थान आहे.

अ) प्रथम ब) दुय्यम क) तृतीय ड) चतुर्थ

४) 'सिमॉन-दि-बोव्हा' या फ्रेंच विदूषीनी .............. हा मौलिक ग्रंथ प्रकाशित केला.

अ) दि फस्ट सेक्स ब) दि सेकंड सेक्स

क) दि थर्ड सेक्स ड) दि फोर्थ सेक्स

५) युद्धोत्तर स्त्रीवादी समिक्षेच्या शिल्पकार असे ................ यांना म्हटले जाते.

अ) सिमॉन-दि-बोव्हा ब) जेसी बर्नार्ड

क) एन्जेलस ड) डॉ गेल ऑमवेट

**४.२.२ मार्क्सवादी स्त्रीवाद** (Marxist feminism)

कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीच्या आधारे मार्क्सवादी स्त्रीवाद हे तत्त्वज्ञान स्पष्ट केले जाते. मार्क्सच्या लिखाणात स्त्री-प्रश्नांची चर्चा केलेली आढळत नाही. पण तरीही स्त्रीवादी सिद्धांतामध्ये मार्क्सवादी स्त्रियांसंबंधीचे विचार महत्त्वपूर्ण ठरतात. या सिद्धांताचा पाया हा मार्क्स आणि एंजेल यांनी घातला. फ्रेडरिक एंगल्स यांनी ''कुटुंब, खाजगी मालमत्ता आणि राज्य यांचा उगम'' या पुस्तकात असे स्पष्ट केले आहे की, इतिहासाच्या प्रारंभी असलेल्या मातृसत्ताक समाजव्यवस्थेत लैंगिक संबंधांमध्ये मुक्तता आणि स्त्रीला निवडीचे म्हणजे स्वतःच्या आवडीप्रमाणे आणि इच्छेप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य होते. घरावर स्त्रीचे नियंत्रण होते. शेतीच्या शोधानंतर ही व्यवस्था पितृसत्ताक झाली. या व्यवस्थेत स्त्रीवर एक पतीत्वाची चाल लादली गेली. मात्र पुरुषांना अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची मुभा होती. पुरुषाने आर्थिक व लैंगिक अधिकार मिळविले. भांडवलशाहीच्या उदयानंतर स्त्री सामाजिक उत्पादन व घरकाम या दोन्ही पातळीवर कार्य करूनही दुय्यम समजली जाऊ लागली. म्हणून भांडवलशाही विरुद्धच्या कामगारांच्या संघर्षात स्त्रियांनी भाग घ्यावा. या संघर्षात मातृत्व, बालसंगोपनाच्या जबाबदारीचे समाजीकरण व्हावे अशी एंगलसने मांडणी केली आहे.

हायडी हार्टमनने ही मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली आहे. त्यांनी पुरुषसत्ताक व्यवस्था आणि भांडवलशाही यामधील परस्पर संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. ऐतिहासिक विश्लेषणाआधारे हार्टमनने असे म्हणणे मांडली की, पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमध्ये भांडवलशाहीचा विकास झाला. यामुळे घर आणि कामाचे ठिकाण या ठिकाणी लिंगभेदाद्वारे श्रमविभाजन मोठ्या प्रमाणावर झालेले दिसते. १९९० च्या दशकात फ्रॉन्समधील भौतिकवादी स्त्रीवादी ख्रिस्तीन डेक्सी यांनी तसेच सिल्व्हिया वाल्बी यांनी सन १९८६ मध्ये केलेल्या अभ्यासाच्या आधारे घरगुती उत्पादनाच्या चौकटीत स्त्रियांचे शोषण झाले. त्यामुळे त्या दुय्यम ठरल्या. अशी मांडणी केली होती.

मार्क्सच्या वर्ग सिद्धांतात त्यांच्या स्त्रीवादी सिद्धांताची मुळे किंवा आपण असे म्हणू शकतो की बीजे आढळतात या सिद्धांताचा पाया हा मार्क्स आणि एंगल्स यांनी घातला. त्यांचा मुख्य भर हा जरी सामाजिक वर्गातील दडपशाहीवर असला तरी वेळोवेळी त्यांनी लक्ष्य लिंग दडपशाहीकडे वळविले. एंगल्स यांनी लिहिलेल्या ''कुटुंब, खाजगी मालमत्ता आणि राज्य यांचा उगम' (The origins of family, Private property and the state) या ग्रंथात सापडतो. स्त्रीवादी विचारांवर या ग्रंथात जो विवाद नमून केला आहे, तो खालीलप्रमाणे आहे.

१) स्त्रियांचा दुय्यम दर्जा हा जीवशास्त्रीय प्रक्रियेचा परिणाम नसून, की जो सर्वसाधारणपणे अपरिवर्तनीय मानला जातो. इतिहासात सापडणाऱ्या सामाजिक व्यवस्थेचा तो परिपाक आहे व त्या संबंधीच्या व्यवस्थेत परिवर्तन करता येते.

२) स्त्रियांचा दुय्यम दर्जाचा संबंधात्मक आणि सापेक्षात्मक आधार कुटुंबसंस्था आहे. कुटुंब हा शब्द लॅटिन भाषेतून आला असून त्याचा अर्थ सेवा करणे असा होतो. सर्व गुंतागुंतीच्या कुटुंब संस्थाकडे पाहता ही संस्था म्हणजे वर्चस्व व लीनता याचे प्रतिक होय. ही वर्चस्व व लीनता पुरुष-स्त्री यांच्या संबंधाबाबत होती. यातून स्त्री दमन सुरू झाले.

३) समाजाने कुटुंब व्यवस्थेला, ही व्यवस्था मूलभूत संस्थात्मक व्यवस्था आहे, असे मानून त्यासाठी कायदेशीर मान्यता प्रदान केली आहे. मानव शास्त्रज्ञ व पुराणवस्तू शास्त्रज्ञ यांच्या मते हा दावा चुकीचा आहे असे म्हणतात. स्त्रीवादी विचारसारणीचे विचारवंत असे विचार मांडतात की, कुटुंबाला कायदेशीर मान्यता म्हणजे न कळतच कुटुंबातील स्त्री-पुरुष यांच्या असमानतेवर आधारलेल्या संबंधांना मान्यता दिल्यासारखे आहे व स्त्री दमनाला अप्रत्यक्ष आपणच मान्य करतो. असे यातून स्पष्ट होते.

४) कुटुंब संस्थेसारख्या संस्थेचा नाश करणे म्हणजे एंगल्सच्या मते ''स्त्री लिंगाचा ऐतिहासिक पराभव होय'' किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यात आलेले अपयश होय, असे मान्य करावे लागेल.

५) त्यानंतर कामगारांचे शोषण करण्याच्या प्रवृत्तीमध्ये वाढ झाली व त्यातून गुंतागुंतीची किंवा संमिश्र वर्चस्व व्यवस्था आकाराला आली. हे वर्चस्व प्रामुख्याने वर्ग संबंधापुरते मर्यादित असल्याने राजकीय व्यवस्था या सर्व वर्चस्व व्यवस्थांचे सुरक्षा कवच ठरले. कुटुंब व्यवस्था सुद्धा पुरुष-स्त्री यांच्या संबंधात वर्चस्व-लीनता

या दोन बाबींना महत्त्व प्राप्त होऊन ते 'स्त्री'च्या दमन प्रक्रियेचे कार्यक्षेत्र बनले.

**समकालीन मार्क्सवादी स्त्रीवाद**

समकालीन मार्क्सवादी स्त्रीवादी विचारवंत असे मानतात की स्त्रीवादी विचारांची बीजे मार्क्स ने मांडलेल्या वर्ग व्यवस्थेच्या मूलभूत संरचनेत सामावलेली असून विशेषतः समकालीन भांडवलशाही वर्ग व्यवस्थेच्या संरचनेत ही सामावलेली आहे. वर्ग व्यवस्थेत जो लिंग-भेद रुजविण्यात आला तो समकालीन भांडवलशाही वर्ग व्यवस्थेत मध्यम वर्गीयांचा उदय झाल्यावर हे मध्यम वर्गीय स्वतः उत्पादक आणि संघटनात्मक औद्योगिक उगमस्त्रोताचे, कृषी व्यापारी करणाचे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मालक होते. मध्यमवर्गीय स्त्रिया या स्वतः मालमत्ताधारक नव्हत्या तर त्या स्वतःच त्यांच्या पतीची मालमत्ता होत्या व त्यांच्याच ताब्यात होत्या. या स्त्रिया दिसण्यास सुंदर होत्या म्हणून त्यांचा विनिमय होत असे. मध्यम वर्गीय स्त्रिया त्याच्या पतीची भावनात्मक सामाजिक व लैंगिक सेवा करीत. सारांश भांडवलशाही वर्ग व्यवस्थेत मध्यम वर्गाच्या समावेशाबरोबरच स्त्री-पुरुष असमानता अस्तित्वात आली.

लिंग असमानता विशेषतः पगारी वर्गात पाहायला मिळते. नोकरदार स्त्रियांना त्यांच्या दुय्यम दर्जामुळे पुरुषांच्या तुलनेने कमी वेतन दिले जाते. हा भेद लिंगवादाला प्रोत्साहन देणारा ठरला. शेवटी या संदर्भात असे म्हणता येईल की नोकरदार स्त्री ही तिच्या पतीच्या दृष्टिने उत्पादन प्रक्रियेचे एक साधन असून तिची स्थिती ही गुलामापेक्षाही वाईट आहे. असे एकंदर पाहायला मिळते. आजही परिस्थिती बदललेली आहे. मार्क्सवादी स्त्रीवादी विचारवंतांच्या मताने 'लिंगभेद' ही जीवशास्त्रीय प्रक्रियेतून आकाराला आलेली विभेदीकरणाची घटना नसून वर्ग व्यवस्थेच्या संरचनात्मक भेदाचा तो अपरिहार्य परिणाम होय.

**मार्क्सवादी स्त्रीवादाची समीक्षा :**

मार्क्सवादी स्त्रीवादी समीक्षेची वैचारिक बांधणी मिशेल बॅरेट यांनी 'Women's oppresstion today' या ग्रंथाच्या माध्यमातून केले आहे. समाजातील उत्पादनाची साधने व स्त्रियांच्या संबंधावर ही समिक्षा प्रकाश टाकते, स्त्रियांचे समाजातील स्थान हे उत्पादनांच्या संबंधावर अवलंबून आहे. मार्क्सवादी समीक्षेचे विश्लेषण करताना डॉ. माया पंडित असे म्हणतात की, 'कल्पना प्रणालीमधून स्त्री व पुरुष या सांस्कृतिक गुणांना लक्षात घेवून ह्या संज्ञा निर्माण झाल्या आहेत. कोणत्या प्रतिमा, मूल्ये व कल्पना एकत्र येवून या संज्ञांचा गुणसमूच्चयाची मानसिकता तयार होते. आणि त्यात कोणत्या प्रकारचा गुणात्मक भेद असतो याचा अभ्यास करणे म्हणजे मार्क्सवादी स्त्रीवादी समीक्षा होय.' ही समीक्षा पद्धती पारंपारिक पुरुषी समीक्षा पद्धतीला नाकारते. साहित्यकृतीतून एक निश्चित असा अर्थ प्रकट होतो. स्त्रीवादी समीक्षा पद्धती पारंपारिक पुरुषी समीक्षा परंपरेला छेद देते. साहित्यकृतीतला अर्थ शोधण्याचे कार्य समीक्षेला करावे लागते. हा पारंपारिक अर्थ मार्क्सवादी समीक्षा नाकारते ही समीक्षा पद्धती उत्पादनाची साधने आणि स्त्रिया यांचा संबंध शोधत असल्यामुळे तुलनेने साहित्य आणि समीक्षा यांचा संबंध फार थोड्या प्रमाणात येतो. या समीक्षा पद्धतीचा भर स्त्रियांच्या आर्थिक बाबींशी जोडला गेल्यामुळे साहित्यकृतीतील कलात्मक आणि वाङ्मयीन गुणांकडे तिचे दुर्लक्ष होते. मार्क्सवादी स्त्रीवादी समीक्षा पद्धतीने साहित्याच्या स्त्रीवादी आकलनाचे कार्य तुलनेने कमी प्रमाणात झालेले आहे हे खरे.

### ४.२.२ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**बहुपर्यायी प्रश्न**

१) कार्ल मार्क्सच्या .................. विचारसारणीच्या आधारे मार्क्सवादी स्त्रीवाद हे तत्त्वज्ञान स्पष्ट केले जाते.

अ) भांडवलवादी ब) साम्यवादी क) समाजवादी ड) साम्राज्यवादी

२) .............. ने मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली आहे.

अ) हायडी हार्टमन ब) फ्रेडरिक एंगल्स

क) सिमॉन-दि-बोव्हा ड) हॅरियट टेलर

३) मार्क्सच्या .................... त्यांच्या स्त्रीवादी सिद्धांताची मुळे आढळतात.

अ) वर्ग सिद्धांत ब) दूरीभवन सिद्धांत

क) आर्थिक विकास सिद्धांत ड) अतिरिक्त मूल्य सिद्धांत

४) मार्क्सवादी सिद्धांताचा पाया ................ यांनी घातला.

अ) मार्क्स आणि हार्टमन ब) मार्क्स आणि टेलर

क) मार्क्स आणि एंजेल ड) मार्क्स आणि बोव्हा

५) मार्क्सवादी स्त्रीवाद समिक्षेची वैचारिक बांधणी .............. यांनी केली.

अ) हॅरियर टेलर ब) हायडी हार्टमन

क) मिशेल बॅरेट ड) फ्रेडरिक एंगल्स

### ४.२.३ मवाळ स्त्रीवाद (Liberal Feminism)

१७ व्या-१८ व्या शतकामध्ये मवाळ स्त्रीवादी तत्त्वातून विचारसारणी आकारास आली. १८ व्या शतकामध्ये मवाळ स्त्रीवादी विचारप्रवाहाने पुरुषांप्रमाणे स्त्रियांना समान शिक्षण मिळावे. १९ व्या शतकात समान नागरी हक्क व आर्थिक विकासाच्या समान संधी तर २० व्या शतकामध्ये स्त्री पुरुषांना समान दर्जा स्त्रियांना पुरुषाप्रमाणे समान वागणूक या मागण्या पुढे आल्या मवाळ स्त्रीवादी तत्त्वज्ञानाच्या आधारे स्त्री-पुरुष समानतेचे विविध मुद्दे पुढे आले. या सर्वांचा हेतू एकच होता की, स्त्रियांचे दुय्यम मिटवून समानतेचा विचार पुढे यावा. यादृष्टीनेच सामाजिक वातावरण बदलणे गरजेचे होते. सामाजिक वातावरण म्हणजे समाजातील लोकांची मानसिकता बदलणे हे एक मोठे आव्हान त्या काळात होते. समाजातील लोकांची मानसिकता बदलण्याच्या दृष्टीने विविध पातळीवर प्रयत्न केले गेले त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक न्यायावर आधारित कायदे व वैचारिक प्रबोधनातून स्त्री-पुरुषांतील लैंगिक व सामाजिक विषमता नष्ट करता येईल. मवाळ स्त्रीवादी

विचारवंताचे मुख्य ध्येय स्त्रियांना राजकीय व कायदेशीर समता प्राप्त करून देणे आहे. शिवाय या स्त्रीवादी विचाराने खाजगी जीवनातील स्वास्थ्य, शांतता व सहकार्य यांचे महत्त्व मान्य केले. भांडवलशाही व्यवस्थेने निर्माण केलेल्या विकासाच्या संधीचा लाभ घेऊन स्त्रियांनी आपला विकास करावा. त्यासाठी भांडवलशाही व्यवस्थेला आव्हान देण्याची आवश्यकता नाही, तर कायदेशीर सुधारणांद्वारे स्त्री मुक्तीचा प्रवास मवाळ स्त्रीवादात अपेक्षित आहे. मवाळ स्त्रीवाद असे मानतो की, स्त्रीमुक्तीमुळे पुरुषांना अनेक सवलतींना मुकावे लागले तरी आर्थिक उत्पादन व देशसंरक्षणाच्या एकाकी जबाबदारीतून त्यांची सुटला होईल. यातून असे स्पष्ट होते की मवाळ स्त्रीवादी विचाराने स्त्रीवादी विचारांना नवी दिशा देण्याचे कार्य केले आहे.

समकालीन स्त्रीवादी सिद्धांतामध्ये मवाळ स्त्रीवादी सिद्धांत हा अल्पसंख्य स्थानावर आहे. ॲकर १९८९-१९९० (Acker), बेम १९९३ (Bem) व इंग्लंड १९९२ (England), एस्टेन १९८८ (Epstein), फ्रायडन १९६३, १९८१ (Fridan), हॉक्चाईल्ड १९८९ (Hochechild) या विचारवंताचा समावेश मवाळ स्त्रीवादी विचारवंत म्हणून करावा लागेल. त्याच सुमारास अमेरिकेतील स्त्रियांच्या चळवळीत मवाळ स्त्रीवादी दृष्टिकोनाचा खूपच प्रसार झाला होता.

मवाळ स्त्रीवादी लिंग असमानतेच्या स्पष्टीकरणाची सुरुवात लिंग विभेदीकरणाऱ्या सिद्धांतानी केली असून यात लिंग भेदावर आधारति श्रम विभाजनाची ओळख, सामाजिक क्रियेचे, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील स्वातंत्र्य अस्तित्व, पुरुषांचे प्राथमिक स्थान सुरुवातीला असणार व त्यानंतर स्त्रियांचे स्थान असणार हे निश्चित करण्यात आले. अशा समाज व्यवस्थेवरच मुलांचे सुव्यवस्थित समाजीकरण केले जाते, की ज्यामुळे मुलांना मोठेपणी त्यांच्या भूमिका काय आहेत हे त्यांना त्या-त्या वयात व्यवस्थितपणे समजू शकते व त्यानुसार लिंगभेदानुसार प्रत्येक जण आपल्या भूमिका त्या त्या क्षेत्रात पार पाडतो. असाच सर्व सामान्यपणे सर्वांचा समज आहे आणि तो योग्यही आहे. अन्य विभिन्न सिद्धांताच्या उलट मवाळ स्त्रीवादी सिद्धांतकार यांना खाजगी क्षेत्रात विशिष्ट मूल्य असल्याचे दिसले नाही. याला अपवाद असा होता की काही विद्वानांनी स्त्रीवादी विचार मांडत असताना स्त्रियांच्या भावनात्मक बाबी उघड करण्यास मान्यता दिली. या भावनात्मक बाबी उघड केल्याने त्यांच भावनिक विश्व समाजासमोर आणण्याचा तो प्रयत्न होता. पण या उलट अशा कितीतरी गोष्टी होत्या ज्या खाजगी क्षेत्रात मनाविरहित विनामोबदला कमी मूल्य असलेले कार्य करावे लागे. या कार्यात घरकाम, मुलांचे संगोपन आणि प्रौढ पुरुषांची भावनात्मक, व्यावहारिक आणि लैंगिक सेवा करावी लागे. सामाजिक जीवनातील खरे बक्षिस म्हणजे पैसा, सत्ता, दर्जा, स्वातंत्र्य, प्रगतीची संधी आणि स्वमूल्य इ. गोष्टी केवळ सार्वजनिक क्षेत्रात आढळतात. आपल्या समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना सार्वजनिक क्षेत्रातील प्रवेश मर्यादित आहे आणि खाजगी क्षेत्रात मात्र त्यांच्या कामाचा भार वाढविला जातो. खाजगी क्षेत्रातील जबाबदाऱ्यांमुळे स्त्रियांचे काम घरापुरतेच मर्यादित राहते. या दोन व्यवस्थामुळे लिंग असमानता निर्माण झाली आहे. असे विचारवंताचे म्हणणे आहे.

मवाळ स्त्रीवादी विचारवंताना या व्यवस्थेचे प्रमुख अधिकार कोणते हे स्पष्ट करताना स्त्रीवादी विचारवंतांनी त्यांचे ''लिंगवाद'' आणि वंश वाद याला समांतर विचारप्रणाली असे सांगितले. लिंगवादाच्या विचारप्रणालीमध्ये काही प्रमाणात पूर्वग्रह आणि स्त्रियांविरुद्ध असलेली विभेदीकरणाची कार्यप्रणाली आणि काही प्रमाणात गृहित

धरलेले स्त्री-पुरुषातील नैसर्गिक भेद की जे त्यांना सामाजिक दैवगतीमुळे प्राप्त झालेले आहेत. लिंग वादाच्या कारणांमुळे स्त्रियांना त्यांच्या लहानपणापासूनच चाकोरीबद्ध जीवन प्रणाली तसेच परावलंबित्व जीवनाबाबत संस्कार केले जातात. अशाच वातावरणात या मुली लहानाच्या मोठ्या होतात तेव्हा त्या त्यांच्या भूमिकांसाठी समर्पित असे जीवन जगत असतात आणि त्यातून त्या मानवापासून मन रहित अवस्थेत जातात. परावलंबी होतात. दबावामुळे त्यांच्यात न कळत का होईना मानसिक खच्चीकरण होत असल्याची जाणीव त्यांच्यात निर्माण होते आणि लिंग निर्देशित विशेष भूमिकांची आवश्यकता त्यांच्या लक्षात येते.

स्त्रीने कुटुंबासाठी झिजले पाहिजे हा विचार 'जेसी बर्नार्ड'' यांनी सन १९८२ साली प्रकाशित केलेल्या ''विवाहाचे भवितव्य'' या ग्रंथातून मांडले आहेत. त्या अमेरिकेतील एक समाजशास्त्रज्ञ असून लिंगभेदावर त्यांनी सन १९४० पासून लिखाणास सुरुवात केली होती. मवाळ स्त्रीवादी विचारांचा पाठपुरावा करणारे आधुनिक काळातील एक सर्वोत्कृष्ट पुस्तक म्हणून जेसी बर्नार्ड यांनी लिहिलेल्या या ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या मते, विवाह ही एक आदर्श सामाजिक व्यवस्था असून त्यामध्ये श्रद्धा आणि आदर्श अशी सांस्कृतिक व्यवस्था आहे. त्यात भूमिका आणि प्रमाणके यांची संस्थात्मक व्यवस्था यांचा पण समावेश होतो. तसेच स्त्री-पुरुष यांच्या परस्पर अनुभवाची गुंतागुंतही याच व्यवस्थेत येते. सांस्कृतिक दृष्ट्या विवाह म्हणजे दैवाप्रमाणेच एक आदर्श घटक असून स्त्रियांसाठी त्यांच्या गरजांपुरतेचे साधन असून घरगुती कामेच्छा पुरुषासाठी पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या, तसेच पुरुषांची जबरदस्ती यांना स्थान देणारी व्यवस्था असून अमेरिकन समाजाच्या दृष्टिने स्त्री पुरुष समानतेवर आधारित पती-पत्नीचे विवाह हे एक मंडळ होय. शेवटी जेसी बर्नार्ड या सर्व परिस्थितीच्या आधारावर असा निष्कर्ष काढतात की, सांस्कृतिक दृष्टीने विवाह हा 'स्त्री' वर पुरुषांकडून होणाऱ्या अत्याचारांचे प्रतीक आहे. म्हणून त्या म्हणतात, विवाह हा पुरुषांसाठी चांगला व स्त्रियांसाठी वाईट आहे.

मवाळ स्त्रीवादी विचारवंताच्या दृष्टिने अमेरिकेतील समाज हा राज्य घटनेने दिलेल्या संस्था आणि हक्क या संदर्भात केलेल्या तरतूदीपेक्षा व्यक्तींना अधिक स्वातंत्र्य देतो व इतर समाजाच्या तुलनेने स्त्रियांना अधिक समान अधिकार प्रदान करतो. परंतु इथे सुद्धा वंशवाद आणि लिंगवाद समान संधीवर मर्यादा आणतात. लिंगवाद हा वंशवादा प्रमाणेच स्त्री पुरुषांना गुंतागुंतीच्या चारित्र्य शास्त्रीय (Characterological) भूमिका पार पाडावयास भाग पाडतो. मवाळ स्त्रीवाद विचारवंत असा दावा करतात की, अमेरिकेतील समाजाने लिंगवादाचे निर्मूलन करून समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणावे ही अपेक्षा केली जाते.

शेवटी मवाळ स्त्रीवादी विचारवंताच्या दृष्टिने आदर्श लिंग व्यवस्था अशी आहे की, प्रत्येक व्यक्तीला तिच्या आवडीप्रमाणे योग्य ती जीवनपद्धती स्त्री किंवा पुरुष असा भेद न करता निवडण्याचे स्वातंत्र्य असावे की ज्या मध्ये समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांना महत्त्व प्राप्त होईल.

### ४.२.३ स्वयं अध्ययनासाठी : बहुपर्यायी प्रश्न

१) ................ शतकामध्ये मवाळ स्त्रीवादी तत्त्वातून ही विचारसारणी आकारास आली.

अ) १६ व्या - १७ व्या　　ब) १७ व्या - १८ व्या

क) १८ व्या - १९ व्या　　ड) १९ व्या - २० व्या

२) .................. विचारवंतांचे मुख्य उद्देश स्त्रियांना राजकीय व कायदेशीर समता प्राप्त करून देणे आहे.

अ) मवाळ स्त्रीवाद　　ब) मार्क्सवादी स्त्रीवाद

क) समकालीन स्त्रीवाद　　ड) आधुनिकोत्तर स्त्रीवाद

३) कायदेशीर सुधारणांद्वारे .............. चा प्रवास मवाळ स्त्रीवादात अपेक्षित आहे.

अ) स्त्री मुक्ती　　ब) स्त्री संघर्ष

क) स्त्री स्वातंत्र्य　　ड) स्त्री शोषण

४) 'विवाहाचे भवितव्य' हा ग्रंथ ............... यांनी लिहिला.

अ) सिमॉन-दि-बोव्हा　　ब) फ्रेडरिक एंजल्स

क) जेसी बनॉर्ड　　ड) हायडी हार्टमन

५) ................ हा समता, स्वातंत्र्य व बंधुता या मुल्यांना महत्त्व देतो.

अ) मवाळ स्त्रीवाद　　ब) मार्क्सवादी स्त्रीवाद

क) आधुनिकोत्तर स्त्रीवाद　　ड) जहाल स्त्रीवाद

### ४.२.४ आधुनिकोत्तर – स्त्रीवादी सिद्धांत (Post-modern Feminist Theory)

स्त्रियांना दुय्यमत्त्व देण्यामागे जी पुरुषी मानसिकता आहे त्यांचा बीमोड करणे हे स्त्रीवादाचे मूळ उद्दिष्ट आहे. स्त्रीवादांतर्गत अनेक गोष्टींचा समावेश होतो. पुरुषांइतकीच आज स्त्रियांनीही स्वतःची म्हणून ओळख निर्माण केली आहे. स्व-विकास, स्वतंत्रता यांची जरूरी आहे. स्वत्वाची ओळख, स्वायत्तता, स्वयंनिर्णय, सक्रिय सहभाग या गोष्टी स्त्रीला व्यक्ती म्हणून परिपक्व बनवितात. त्या मिळवून देण्याचा प्रयत्न स्त्रीवादी चळवळीने केला आहे. आपल्या आजच्या प्रस्थापित समाजातील सांकल्पनिक, सैद्धांतिक चौकटीमध्ये स्त्रियांना मिळणारे गौणत्व, त्यांचे केले जाणारे दमन यांचे स्पष्टीकरण, त्यामागील कारणांचे विश्लेषण स्त्रीवादी विचारवंतानी केले आहे. त्याचप्रमाणे हे सामाजिक वास्तव बदलण्यासाठी काय करावे याचे विवेचनही सविस्तरपणे केले आहे. काळानुसार स्त्रीवादी चळवळीत जहाल, मवाळ, मार्क्सवादी, पर्यावरणवादी, कृष्णवर्णीय अशा प्रकारच्या विविध छटा असलेल्या विचारसरणींचा समावेश सुद्धा स्त्रीवादांमध्ये करण्यात आला आहे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीवादी-सुधारणावाादी महिला अधिक आक्रमक झाल्या. त्यांनी स्त्रियांचे दमन हे ऐतिहासिक दृष्टीकोनातून पाहिले. या स्त्रीवादी विचारवंतानी पुनरुत्पादन, मातृत्व, लैंगिकता या संबंधी अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. त्याचप्रमाणे पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमध्ये असलेली अमर्याद सत्ता, स्पर्धा, श्रेणीबद्धता, वर्चस्ववाद यांचे समूळ उच्चाटन करावे असे सूचविले. जे-जे व्यक्तीगत आहे ते ते राजकीय अशी घोषणा करताना स्त्रियांच्या जाणीव-जागृतीवर भर दिला. स्त्री आणि पुरुष यांच्या विकासाच्या दोन वेगवेगळ्या प्रक्रिया न मानता दोहोंच्या विकासाच्या दृष्टिने एक सर्व समावेशक विचार व्हावा. असे मनोविश्लेषणवादी मानतात. सीमॉन-द-बोव्हा यांनी स्त्रीच्या दमनाचे अस्तित्ववादी दृष्टीकोनातून स्पष्टीकरण देताना असे स्पष्ट केले की, स्त्रीला 'अन्य' किंवा 'इतर', विशेषतः 'पुरुषेत्तर' मानले गेल्यामुळे ती स्वतंत्र, स्वनियंत्रित राहिली नाही. तिच्या अस्तित्वाला ती स्वतः अर्थ देऊ शकत नाही, तर तो म्हणजे पुरुष तिच्यासाठी स्त्रीत्वाच्या एकूणच साराच्या संदर्भात ठरवला जातो. स्त्रीवादाची चळवळ उभी राहिली. ती प्रस्तापित समाज परंपरेतील स्त्री प्रतिमा नाकारण्यासाठी स्त्रियांनी त्यांचे अस्तित्व मर्यादित करणाऱ्या स्त्रीत्वाच्या प्रस्थापित व्याख्या नाकाराव्यात. स्त्री ही माणूस आहे. म्हणून व्यक्ती या स्वरूपात तिचा विचार व्हावा. नरनारी ही व्यवस्था नैसर्गिक आहे. परंतु पुरुष प्रधाान समाजव्यवस्थेमध्ये लिंग भेदभाव मुद्दाम घडविला गेला. संस्कृतीच्या इतिहासाने स्त्रीची सांगड निसर्गाशी घातली. त्यामुळे स्त्रीविषयक प्रश्नांचा विचार निसर्ग सापेक्ष केला पाहिजे. पितृसत्ताक पद्धतीची विचारसारणी ही श्रेणीबद्ध, द्वंद्ववादी आणि वर्चस्ववादी आहे. अशा विचारसारणीमुळे आतापर्यंत स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात शोषणच झाले आहे.

अलीकडे आधुनिकोत्तर स्त्रीवाद, कृष्णवर्णीय स्त्रीवाद, बहुसांस्कृतिक आणि वैश्विक स्त्रीवाद असेही विविध प्रकार पुढे आले आहेत. यांपैकी कृष्णवर्णीय स्त्रीवादाने स्त्रीवादाच्या मुख्य धारेच्या मर्यादा स्पष्ट करताना वर्चस्ववादाशी निगडित असे प्रश्न स्त्रीवादाच्या संदर्भात अधोरेखित केले आहेत. स्त्रीवादाच्या कक्षा श्वेतवर्णीय, मध्यमवर्गीय आणि भिन्नलिंगी संबंध असणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नापलीकडे विस्तारण्याची आवश्यकता त्यातून प्रकर्षाने पुढे आली.

थोडक्यात आपणाला असे म्हणता येईल की, स्त्रीवादाच्या निरनिराळ्या सिद्धांतांमधून आणि त्यांच्या परस्पर संबंधामधून जो विकास घडून आला आहे त्यामध्ये स्त्रीच्या गौणत्वालाा कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, मानसशास्त्रीय इत्यादी घटकांचा सखोल विचार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे स्त्रीत्वाच्या काही सार्वत्रिक व सार्वकालीक व्याख्या करणे शक्य आहे काय? स्त्रीत्व हे नैसर्गिक असते व म्हणूनच ते अपरिवर्तनीय आहे, की ते एक सामाजिक रचना असते व म्हणून परिवर्तनशील असते. असे स्त्रीवादाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व मूलभूत प्रश्नही उपस्थित करण्यात आले आहेत. स्त्री प्रश्नाचे सैद्धांतिक व व्यावहारिक पातळ्यांवर वर्ण, वर्ग, जात इ. शी जे गुंतागुंतीचे संबंध असतात, त्याच्यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. स्त्रीमुक्तीचा लढा हा सर्व शोषित, वंचित मानवसमूहाच्या मुक्तींच्या लढ्यांपासून वेगळा काढता येत नाही. याचे एक सुजाण भान या सर्व मांडणीतून निर्माण झाले आहे.

अविकसित व विकसनशील देशांतील स्त्रियांच्या व्यथा आणि हक्क, शैक्षणिक समस्या, सामाजिक मागासलेपणा इ. विषयांची दखल व चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने कोपनहगेन येथे जागतिक परिषदेचे

आयोजन १९८० साली केले होते. एकूण पाश्चात्य स्त्रीवादाच्या विचारसारणीमध्ये स्त्रीच्या व्यक्तीमत्त्वाचा मानसन्माान, सर्व प्रकारची स्वातंत्र्ये आणि समानता यांवर भर देण्यात आला आहे. तरी अंतिमतः स्त्रीवादाचा साकल्याने विचार केल्यास, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समता व आत्मनिर्भरता या गोष्टी स्त्री उद्धाराच्या दृष्टीने अपरिहार्य ठरतात.

आधुनिकोत्तर स्त्रीवादी सिद्धांताला मान्यता देणाऱ्या विचारवंतानुसार आधुनिकोत्तर सिद्धांतात काही प्रमुख वैशिष्ट्यांचा समावेश केला जातो. फ्लॅक्स यांनी स्त्रीवादी विचारांवर तुलनात्मक जे विवेचन केले. त्यातून काही वैशिष्ट्ये पुढे आली आहेत. ती पुढीलप्रमाणे–

१) सर्वसामान्यपणे असे स्पष्ट केले जाते की, मानवी अनुभव व मानवी प्रगती यांचे स्पष्टीकरण प्रबोधनाच्या पार्श्वभूमीवर शपथपूर्वक पूर्ण करण्याची क्रिया म्हणजे या आधुनिकोत्तर स्त्रीवादाचे पहिले वैशिष्ट्य होय.

२) बुद्धीप्रामाण्यवादी स्व कार्य हे सार्वभौमिक कायद्यानुसार चालते हे आधुनिकोत्तर स्त्रीवादी सिद्धांतांने नाकारले आहे हे याचे दुसरे वैशिष्ट्य होय.

३) आधुनिकोत्तर स्त्रीवाद, विज्ञान आणि त्याचे तत्त्वज्ञान, ज्ञानाची वस्तुनिष्ठता, वास्तव पायाभरणी करणारे साहित्य पुरविते हे विधान नाकारते, हे आधुनिकोत्तर स्त्रीवादी सिद्धांताचे तिसरे वैशिष्ट्य होय.

४) आधुनिकोत्तर स्त्रीवादी विचारवंत, विज्ञान याचे तटस्थ पद्धतीने अध्ययन करून सार्वभौमिक फायद्याचे निष्कर्ष काढतात या विचाराचा उपहास करतात, ते या सिद्धांताचे चौथे वैशिष्ट्य होय.

५) भाषा हे कमी पारदर्शकता असणारे माध्यम असून त्याद्वारे वास्तवतेचे प्रतिनिधीत्व केले जाते. भाषा, वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे डावपेच आखणारा घटक नाही हे या सिद्धांताचे पाचवे वैशिष्ट्य होय.

६) यात कोणकोणत्या विषयांचा समावेश करावा या बाबत स्त्रीवादी आधुनिकोत्तर विचारवंतात मतभेद असून त्यातून सत्य, ज्ञान आणि अधिकार यांचा संघर्ष होण्याची शक्यता असते व त्यावर अनेक कारणांनी मात करता येते. हे या सिद्धांताचे सहावे वैशिष्ट्य होय.

७) कोणतेही सत्य हे तटस्थ असल्याचे दिसत नाही. तसेच या सत्यामध्ये विनाशा शिवाय स्वातंत्र्याकडे वाटचाल करण्याची क्षमता नाही व अधिकार नाही हे या सिद्धांताचे सातवे वैशिष्ट्य होय.

अमेरिकेतील स्त्रीवादी आधुनिकोत्तर विवादावर भाष्य करताना ब्रिट्रिस कॅशूक यांनी असे स्पष्ट केले आहे की अमेरिकेत हे सिद्धांत खूपच वादग्रस्त ठरले आहेत. काही विचारवंत हे सिद्धांताची अभ्यास विषयक प्रक्रिया कशी निर्माण करावी आणि त्याला अनुभवांची जोड कशी द्यावी यावर भर दिला गेला पाहिजे असे सूचवितात. स्त्री-पुरुष असमानतेच्या बाबतीत अजूनही खूप संशोधन होणे आवश्यक आहे. असेही काही विचारवंताचे मत आहे.

### ४.२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**बहुपर्यायी प्रश्न**

१) आधुनिकोत्तर स्त्रीवादाचा कालखंड ........... शतकाचा उत्तरार्ध मानला जातो.

अ) १७ व्या ब) १८ व्या क) १९ व्या ड) २० व्या

२) .................. विज्ञान आणि त्याचे तत्त्वज्ञान, ज्ञानाची वस्तू, निष्ठा, वास्तव पायाभरणी करणारे साहित्य पुरविणे हे विधान नाकारते.

अ) आधुनिकोत्तर स्त्रीवाद ब) मवाळ स्त्रीवाद

क) मार्क्सवादी स्त्रीवाद ड) जहाल स्त्रीवाद

३) ................. यांनी आधुनिकोत्तर स्त्रीवाद यावर भाष्य केले आहे.

अ) फ्रेडरीक एंजेल ब) सिमॉन-दी-बोव्हा

क) ब्रिट्रीस कॅशूक ड) जेसी बर्नार्ड

## ४.३ सारांश

१९ व्या शतकाच्या शेवटी शेवटी व २० व्या शतकात समाजशास्त्रीय अध्ययनात ज्या नवीन विचारांना चालना मिळाली त्यामध्ये 'स्त्रीवादी विचारसरणी' याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले पाहायला मिळते. 'स्त्रीवादी' सिद्धांताची स्त्रियांचे समाजातील स्थान, त्यांची पिळवणूक व त्यांच्यावर होणारे अत्याचार इ. दृष्टिकोनातून जे विचार मांडले गेले ते स्त्रीवादी सिद्धांत म्हणून ओळखले जातात. या प्रकरणात आपण काही महत्त्वपूर्ण स्त्रीवादी सिद्धांतावर चर्चा केली आहे.

या प्रकरणाची सुरुवात आपण स्त्रीवादी सिद्धांताची ऐतिहासिक सुरुवात कशी झाली. या सिद्धांताचा अर्थ व स्वरूप तसेच स्त्रीवाद म्हणजे काय? या महत्त्वपूर्ण आणि मूलभूत विवेचनापासून केली आहे. यानंतर स्त्रीवादी सिद्धांत समाजशास्त्रीय सिद्धांतापासून कसे वेगळे आहेत. याचा आढावा आपण घेतलेला आहे. स्त्रीवादी सिद्धांतामध्ये काही महत्त्वपूर्ण विचारप्रवाहांची मांडणी केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्त्रीवादी सिद्धांताची ऐतहासिक मुळे कशात रुजली आहेत हे पाहिल्यानंतर १) मार्क्सवादी स्त्रीवाद, २) उदार स्त्रीवाद, ३) आधुनिक निकोत्तर स्त्रीवाद यांचा समावेश आहे.

या स्त्रीवादी सिद्धांताच्या अध्ययनानंतर आपल्याला 'स्त्रीयांना' सामोरे जावे लागणाऱ्या विविध समस्या पैलूंचे दर्शन होईल.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.२.१ १) क - १९ व्या २) ब - स्त्री पुरुष समानता ३) ब - दुय्यम

४) ब - दि सेकंड सेक्स ५) अ - सिमॉन-दि-बोव्हा

| | | | |
|---|---|---|---|
| ४.२.२ | १) ब - साम्यवादी | २) अ - हायडी हार्टमन | ३) अ - वर्ग सिद्धांत |
| | ४) क - मार्क्स आणि एंजेल्स | ५) क - मिशेल बॅरेट | |
| ४.२.३ | १) ब - १७ व्या - १८ व्या | २) अ - मवाळ स्त्रीवाद | ३) अ - स्त्री मुक्तीचा |
| | ४) क - जेसी बनॉर्ड | ५) अ - मवाळ स्त्रीवाद | |
| ४.२.४ | १) ड - २० व्या | २) अ - आधुनिकोत्तर स्त्रीवाद | |
| | ३) क - ब्रिट्रीस कॅशूक | | |

## ४.५ स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) स्त्रीवादी सिद्धांताची ऐतिहासिकमुळे स्पष्ट करा.

२) स्त्रीवाद म्हणजे काय हे विशद करा.

३) सिमॉन - दि - बोव्हा यांनी स्त्रीवादाची केलेली मांडणी स्पष्ट करा.

ब) थोडक्यात टिपा लिहा.

१) मार्क्सवादी स्त्रीवाद

२) मवाळ स्त्रीवाद

३) आधुनिकोत्तर स्त्रीवाद

## ४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४

२) ऑमवेट, गेल, 'स्त्रीवाद/स्त्रीमुक्तीचा आशय', लांडे, सुमती, तांबे श्रुती (संपादक), स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर २००७.

३) सुमंत यशवंत, स्त्रीवादाची ओळख, २०१२.

४) रेगे शर्मिला, स्त्रीवाद/जागतिक/स्थानिक द्वैताच्या पलिकडे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, २०१०.

५) गोखले करुणा (अनुवाद) बोव्हा सिमोन, द सेकंड सेक्स, पद्मगंधा प्रकाशन, २०१०.


❑❑❑